७० वर्ष
निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक **संध्या**

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

गुरुवार, दि. ०९ जुलै २०२६

www.dainikesandhya.com
www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : १९४ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ३ रूपये


# शरद पवारांचा पक्ष NDA मध्ये येणार नाही

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचे स्पष्टीकरण, म्हणाले - ती पेरलेली बातमी, आता कोणालाही सोबत जोडणार नाही

### आम्ही एनडीएला पाठिंबा देणार नाही : आमदार रोहित पवार

**मुंबई (दै. संध्या)**

महाराष्ट्राच्या राजकारणात गेल्या काही दिवसांत झालेल्या मोठ्या राजकीय घडामोडींनंतर आता नव्या चर्चांना उधाण आले आहे. ठाकरे गटातील ६ खासदार आणि आमदार सचिन अहिर यांनी एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश केल्यानंतर, आता शरद पवार यांच्या पक्षातही मोठी फूट पडणार असून हा पक्ष 'एनडीए'त (NDA) सामील होणार, अशी चर्चा रंगली होती. मात्र, या सर्व चर्चांवर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी थेट आणि स्पष्ट शब्दांत सांगत पडदा टाकला आहे. "शरद पवार यांचा पक्ष एनडीएसोबत येणार नाही. ही केवळ एक पेरलेली बातमी असून यात कोणतेही तथ्य नाही," असे फडणवीस यांनी स्पष्ट केले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आज दिल्ली दौऱ्यावर होते. या दौऱ्यादरम्यान त्यांनी वरिष्ठ पातळीवर काही राजकीय भेटीगाठी घेतल्याचे समजते. दिल्लीत माध्यमांशी बोलताना त्यांनी महाराष्ट्रातील आगामी राजकीय समीकरणांवर महत्त्वाची भूमिका मांडली. ते म्हणाले, "सध्या महाराष्ट्रातून एनडीएत कोणताही नवा पक्ष येणार नाही. आम्ही आमच्यासोबत आता कोणालाही जोडणार नाही," असे मुख्यमंत्र्यांनी ठामपणे सांगितले. शरद पवार यांच्या पक्षातील संभाव्य फुटीच्या चर्चा फेटाळून लावताना ते म्हणाले, "पवार यांचे आमदार किंवा खासदारही भविष्यात आम्ही फोडणार नाही." यामुळे महायुती सध्या अंतर्गत बदलांच्या मूडमध्ये नसल्याचे स्पष्ट झाले आहे. दरम्यान, गेल्या दोन दिवसांपासून



राजकीय वर्तुळात शरद पवार यांचा पक्ष थेट एनडीएत सहभागी होणार किंवा एनडीए सरकारला बाहेरून पाठिंबा देणार, अशा दोन प्रकारच्या शक्यता वर्तवल्या जात होत्या. या सर्व वावड्यांवर शरद पवार यांच्या पक्षाचे आमदार रोहित पवार यांनीही पक्षाची अधिकृत भूमिका स्पष्ट केली आहे. "आम्ही एनडीएला कोणत्याही प्रकारचा पाठिंबा देणार नाही," असे सांगत रोहित पवारांनी या चर्चा केवळ संभ्रम निर्माण करण्यासाठी सुरू असल्याचा आरोप केला. अजित पवार हयात असताना दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलीनीकरणाची जोरदार चर्चा राजकीय वर्तुळात रंगली होती. जर शरद पवार आणि अजित पवार यांचे पक्ष एकत्र आले असते, तर ते 'एनडीए'सोबत राहणार की 'इंडिया' आघाडीसोबत? हा प्रश्न अजित दादांच्या अपघाती निधनामुळे कायमचा अनुत्तरित राहिला. मात्र, आता दादांच्या पश्चात जयंत पाटील आणि विनोद तावडे यांच्यात झालेल्या या ताज्या आणि महत्त्वाच्या बैठकीमुळे महाराष्ट्राच्या राजकारणाला कोणती नवीन दिशा मिळते आणि शरद पवार गट काय अंतिम निर्णय घेतो, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे. ठाकरे गटाला लागलेल्या मोठ्या गळतीनंतर विरोधकांमध्ये कमालीची अस्वस्थता आहे. त्यातच शरद पवार यांच्या पक्षाबाबत थेट मुख्यमंत्र्यांनीच दिल्लीतून भूमिका स्पष्ट केल्यामुळे या चर्चांना तूर्तास पूर्णविराम मिळाला आहे. मात्र, 'कधी काय होईल हे सांगता येत नाही' अशी स्थिती असलेल्या महाराष्ट्राच्या राजकारणात आगामी काळात नेमके काय घडणार, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

# दुतोंड्या मारुतीच्या छातीपर्यंत पुराचे पाणी

## नाशिकमध्ये गोदावरी दुथडी भरून वाहिली

**नाशिक (दै. संध्या)**

गेल्या काही दिवसांपासून दडी मारून बसलेल्या पावसाने नाशिक शहर आणि जिल्ह्यात आता जोरदार कमबॅक केले आहे. या मुसळधार पावसामुळे संपूर्ण नाशिक शहर जलमय झाले असून, गोदावरी नदीला यंदाच्या हंगामातील पहिला मोठा पूर आला आहे. नदीच्या पाणीपातळीत झपाट्याने वाढ होत असून, पुराचे पाणी रामकुंड परिसरातील प्रसिद्ध 'दुतोंड्या मारुती'च्या छातीपर्यंत पोहोचले आहे.

रामसेतू पुलालाही पाण्याचा स्पर्श झाला आहे. गोदामाईचे हे रौद्र रूप आणि हंगामातील पहिला पूर पाहण्यासाठी नाशिककरांनी नदीकाठी मोठी गर्दी केली आहे. यंदाच्या या पहिल्या पुराचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे, गंगापूर धरणातून नदीपात्रात पाण्याचा एक थेंबही विसर्ग करण्यात आलेला नाही. धरणाचे दरवाजे अद्याप बंदच आहेत. मात्र, गोदावरीच्या पाणलोट क्षेत्रात आणि शहरात सलग सुरू असलेल्या संततधार पावसामुळे नदीत पावसाच्या पाण्याची मोठी आवक झाली. या पावसामुळेच गोदावरीची पाणीपातळी



वेगाने वाढली असून नदी दुथडी भरून वाहू लागली आहे. धरणातून पाणी न सोडताही आलेला हा पूर पावसाचा जोर स्पष्ट करणारा आहे. गोदावरीच्या पाणीपातळीत वाढ झाल्याने रामकुंड परिसरातील बहुतांश घाट पूर्णपणे पाण्याखाली गेले आहेत. पुराची पातळी मोजण्यासाठी ओळखल्या जाणाऱ्या दुतोंड्या मारुतीच्या मूर्तीच्या छातीपर्यंत पाणी आल्याने प्रशासनाची धावपळ उडाली आहे. नदीकाठच्या परिसरामध्ये आता पूरस्थिती निर्माण झाली असून, खबरदारीचा उपाय म्हणून प्रशासनाने नदीकाठच्या नागरिकांना आणि व्यापाऱ्यांना सतर्कतेचा इशारा दिला आहे.

# गृहमंत्रीपद झेपत नसेल तर तसे सांगावे, दिल्लीतून कारभार चालतोय?

**मुंबई (दै. संध्या)**



देवेंद्र फडणवीस यांना गृहमंत्रीपद झेपत नसेल तर त्यांनी तसे सांगावे की मला हे पद झेपत नाही, किंवा माझे गृहमंत्रीपद मी चालवत नसून दिल्लीतील कोणीतरी चालवत आहे ते गुंडगिरीला समर्थन देत आहे हे त्यांनी समोर येत सांगितले पाहिजे, असे उबाठाचे खासदार संजय राऊत यांनी म्हटले आहे. संजय राऊत म्हणाले की, महाराष्ट्र आणि महाराष्ट्रातील इतर काही भाग विकून जी संपत्ती गोळा केली जात आहे ती राजकारणात आणली जात आहे. त्यांचा एकच उद्देश आहे की मला मुख्यमंत्री व्हायचे आहे. त्यासाठी दिल्लीला किंमत मोजण्यासाठी ते तयार आहेत. त्यांनी त्यापैकी 50 टक्के किंमत मोजली आहे, असा दावा करत संजय राऊत यांनी एकनाथ शिंदेंचे नाव न घेता आरोप केला आहे. तुम्ही सांगताल त्या किंमतीला मला मुख्यमंत्रीपद हवे आहे अशी बोली त्यांनी लावली आहे. यापुढे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हतबल झालेले दिसत आहेत.

संजय राऊत म्हणाले की, एकनाथ शिंदे यांना भस्मासूर म्हणत ते अमित शहा आणि देवेंद्र फडणवीस यांच्या मानेवर बसल्याशिवाय राहणार नाहीत. काल उद्धव ठाकरेंनी घेतलेल्या आमदारांच्या बैठकीला 20 पैकी 19 आमदार उपस्थित होते. परभणीचे राहुल पाटील हे जिल्हा बँकेच्या निवडणुकीमुळे उपस्थित राहू शकले नाहीत. त्यांनी तशी परवानगी घेतली होती. 19 आमदार उपस्थित असलेल्या बैठकीत आमदारांच्या भावना समजून घेतल्या. कालच्या बैठकीत एसआयआरबद्दल चर्चा झाली. तर राम मंदिर लुटीसंदर्भात काल चर्चा झाली. आता आम्ही राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात आंदोलन करणार आहोत.

संजय राऊत म्हणाले की, नागपूरमध्ये शिवसेनेचे पुढच्या आठवड्यात आंदोलन आहे. त्यासाठी मी आणि अंबादास दानवे नागपुरात जाणार आहोत त्यानंतर संपूर्ण महाराष्ट्रात आम्ही आंदोलन करणार आहोत. प्रत्येक जिल्ह्यातील आंदोलनाला उद्धव ठाकरे स्वत: उपस्थित राहणार आहेत. तर जिल्हा बँकेकडे राजकारणाच्या दृष्टीने पाहू नये.







# पिंपरी चिंचवडच्या मोशीत इमारत कोसळली

### चौदा-पंधरा जण अडकल्याची भीती

**मुंबई (दै. संध्या)**

पिंपरी चिंचवडच्या मोशीत एक इमारत कोसळली आहे. या इमारतीत चौदा-पंधरा जण अडकल्याची भीती व्यक्त केली जात आहे. मोशी कचरा डेपोला लागून ही इमारत आहे. अतिवृष्टीमुळे हा कचऱ्याचा डोंगर इमारतीवर आला. त्यामुळं ही दुर्घटना घडल्याचा प्राथमिक अंदाज आहे. दुसरीकडे, पुणे शहर, उपनगरे आणि पिंपरी-चिंचवड परिसरामध्ये पावसाचा जोर कमालीचा वाढला आहे. सातत्याने होणाऱ्या मुसळधार पावसामुळे सखल भागांमध्ये पाणी साचण्यास सुरुवात झाली असून, शहरातील मुख्य रस्त्यांवर वाहतूक कोंडी निर्माण झाली आहे. पिंपरी-चिंचवड औद्योगिक पट्ट्यासह निवासी भागांतही पावसाची संततधार सुरू असल्याने नागरिकांना आणि नोकरदारांना प्रवासादरम्यान मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

पुण्याला पाणीपुरवठा करणाऱ्या खडकवासला, पानशेत, वरसगाव आणि टेमघर या धरणांच्या पाणलोट क्षेत्रात जोरदार पाऊस होत आहे. यामुळे धरणांमधील पाणीसाठ्यात झपाट्याने वाढ होत आहे. पिंपरी-चिंचवडमधून वाहणाऱ्या पवना आणि इंद्रायणी नद्यांच्या पातळीतही वाढ झाली आहे. या पार्श्वभूमीवर नदीकाठच्या विशेषतः सखल भागात राहणाऱ्या नागरिकांना प्रशासनाने सतर्कतेचा इशारा दिला आहे आणि नदीपात्रात न उतरण्याचे आवाहन केले आहे.भारतीय हवामान विभागाने (IMD) पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरासाठी पुढील २४ ते ४८ तासांकरिता 'ऑरेंज अलर्ट' जारी केला आहे. घाटमाथ्याच्या परिसरात अत्यंत मुसळधार तर शहरी भागात मध्यम ते तीव्र स्वरूपाच्या पावसाच्या सरी कोसळण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. नागरिकांनी अत्यंत आवश्यक काम असल्याशिवाय घराबाहेर पडू नये आणि जुनाट इमारती, झाडे तसेच वीज वाहक तारांपासून दूर राहावे, अशा सूचना स्थानिक प्रशासनाकडून देण्यात आल्या आहेत.


क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या युट्युब चॅनलला सबस्क्राईब करा
SUBSCRIBE
www.sandhyaepaper.com


### ढिंग-टांग




## महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्नावरील उच्चाधिकार समितीची बैठक

# ३० वर्षांनंतर विधानभवनात शरद पवारांची उपस्थिती

**मुंबई (दै. संध्या)**



महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्नावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी विधानभवनात उच्चाधिकार समितीची अत्यंत महत्त्वाची बैठक पार पडत आहे. आगामी काळात सर्वोच्च न्यायालयात या प्रकरणाची सुनावणी होणार असल्याने या बैठकीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. या बैठकीचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे अध्यक्ष आणि ज्येष्ठ नेते खासदार शरद पवार यांनी अधिवेशन काळात तब्बल 30 वर्षांनंतर विधानभवनात लावलेली उपस्थिती! 1996 नंतर प्रथमच अधिवेशन सुरू असताना शरद पवार विधानभवनात आल्याने राजकीय वर्तुळात याची मोठी चर्चा रंगली आहे. शरद पवार विधानभवनात पोहोचताच त्यांच्या पक्षाच्या आमदारांनी आणि नेत्यांनी त्यांचे उत्साहात स्वागत केले. त्यांच्या स्वागतासाठी माजी प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, जितेंद्र आव्हाड, रोहित पाटील, संदीप क्षीरसागर, उत्तमराव जानकर, अभिजित पाटील, राजू खरे, नारायण पाटील आणि बापू पठारे यांच्यासह अनेक आमदार व पदाधिकारी उपस्थित होते. राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या सर्व आमदारांनी त्यांचे स्वागत करत त्यांना बैठकीसाठी शुभेच्छा दिल्या. आगामी सर्वोच्च न्यायालयातील सुनावणीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्राची भूमिका, कायदेशीर तयारी आणि पुढील रणनीती यावर या बैठकीत सविस्तर चर्चा होत आहे. या बैठकीला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, खासदार शरद पवार, केंद्रीय मंत्री नारायण राणे आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरदचंद्र पवार) प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांच्यासह समितीतील अन्य सदस्य उपस्थित आहेत. एकीकडे या सीमा प्रश्नावर सर्वपक्षीय नेते एकत्र येत असताना, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाकडून कोणताही आमदार किंवा नेता या महत्त्वाच्या बैठकीसाठी उपस्थित नसल्याची माहिती समोर आली आहे. ठाकरे गटाच्या या अनुपस्थितीचीही राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा सुरू झाली आहे.

1956ची राज्य पुनर्रचना: 1 नोव्हेंबर 1956 रोजी भाषिक तत्त्वावर राज्यांची पुनर्रचना करण्यात आली. मात्र, यावेळी बेळगाव, कारवार, निपाणी, बिदर, आणि भालकी यांसारखी तब्बल 865 मराठी भाषिक बहुल गावे तत्कालीन म्हैसूर (आताचे कर्नाटक) राज्याला जोडली गेली. महाराष्ट्राने याला कडाडून विरोध केला आणि तेव्हापासून हा सीमावाद सुरू आहे. महाजन आयोगाचा अहवाल (1966): या वादावर तोडगा काढण्यासाठी केंद्र सरकारने 1966 मध्ये सर्वोच्च न्यायालयाचे माजी सरन्यायाधीश मेहेरचंद महाजन यांच्या अध्यक्षतेखाली एक आयोग नेमला. या आयोगाने कारवार, बेळगाव आणि निपाणी ही महत्त्वाची शहरे कर्नाटकातच ठेवण्याची शिफारस केली.

हा अहवाल अन्यायकारक असल्याचे सांगत महाराष्ट्र सरकारने तो फेटाळून लावला. सर्वोच्च न्यायालयात लढा (2004): अनेक दशके रस्त्यावर लढा दिल्यानंतर आणि केंद्र सरकारकडून कोणताही राजकीय तोडगा न निघाल्याने, महाराष्ट्र सरकारने 2004 मध्ये राज्यघटनेच्या कलम 131 अंतर्गत सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली (Original Suit No. 4/2004). हा कायदेशीर लढा आजही प्रलंबित आहे.

कर्नाटकी दडपशाही आणि महाराष्ट्र एकीकरण समिती: बेळगाव आणि सीमाभागात 'महाराष्ट्र एकीकरण समिती' (MES) गेल्या सहा दशकांहून अधिक काळ लोकशाही मार्गाने लढा देत आहे. मात्र, कर्नाटक सरकारने बेळगावला 'उपराजधानी'चा दर्जा देऊन तिथे 'सुवर्ण विधानसौध' बांधले आहे. याशिवाय मराठी भाषिकांवर कन्नड सक्ती करणे, गावांची नावे बदलणे आणि आंदोलकांवर गुन्हे दाखल करणे असे प्रकार कर्नाटकातून सातत्याने सुरू असतात.

# २२ जुलै ते २२ ऑगस्टदरम्यान राज्यभर ‘कृषी महोत्सव’चे आयोजन – कृषिमंत्री दत्तात्रय भरणे



**मुंबई (दै. संध्या)**

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त राज्यातील शेतकऱ्यांसाठी २२ जुलै ते २२ ऑगस्ट या कालावधीत कृषी विभागामार्फत राज्यभर ‘कृषी महोत्सव’ आयोजित करण्यात येणार असून, या महोत्सवाचे सविस्तर आणि प्रभावी नियोजन करण्याचे निर्देश कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी कृषी विभागाला दिले.

मंत्रालयातील दालनात कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत कृषी महोत्सवाच्या नियोजनाचा आढावा घेण्यात आला. यावेळी कृषी विभागाचे सचिव परिमल सिंह, दूरदृश्य प्रणालीद्वारे कृषी आयुक्त सूरज मांढरे, स्मार्टचे संचालक एम. जे. प्रदीप चंद्रन,नानासाहेब देशमुख कृषी संजीवनी योजना प्रकल्प संचालक मीनल करनवार, कृषी संचालक रफीक नाईकवडी, अविनाश बोरकर, विनयकुमार अवटी, सर्व विद्यापीठांचे कुलगुरू तसेच विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. कृषीमंत्री भरणे म्हणाले की, यंदाचे वर्ष ‘आंतरराष्ट्रीय महिला वर्ष’ म्हणून साजरे करण्यात येत असून, महिला शेतकरी विधेयकही विधिमंडळात सादर करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर कृषी महोत्सवात महिला शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणाला विशेष प्राधान्य देत त्यांच्यासाठी मार्गदर्शन, प्रशिक्षण आणि विविध कृषीविषयक उपक्रमांचे आयोजन करण्यात यावे.

ते पुढे म्हणाले की, पेरणीचा हंगाम पूर्ण झाल्यानंतर आयोजित होणाऱ्या या महोत्सवात आधुनिक कृषी तंत्रज्ञान, अत्याधुनिक कृषी अवजारे, यांत्रिकीकरण, पीक व्यवस्थापन, मूल्यवर्धन आणि कृषी क्षेत्रातील नावीन्यपूर्ण तंत्रज्ञानाचे प्रदर्शन भरविण्यात यावे. या माध्यमातून शेतकऱ्यांना नव्या तंत्रज्ञानाची माहिती मिळून आधुनिक शेतीचा स्वीकार करण्यास चालना मिळेल.राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात शेतकऱ्यांचा व्यापक सहभाग सुनिश्चित करून कृषी महोत्सव प्रभावीपणे राबविण्यात यावा, अशा सूचनाही कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

# संपादकीय

## ‘मुक्काम मोहिमे’त हवे सातत्य

जिल्हाधिकाऱ्यांनी थेट गावात जाऊन स्थानिक समस्या जाणून घेण्याचा, त्या सोडवण्याचा उपक्रम उपयुक्त असून, त्यात सातत्य हवे. ग्रामस्थांच्या अडचणी जाणून घेण्यासाठी प्रशासकीय अधिकाऱ्यांचा एक दिवस मुक्काम खेड्यांमध्ये हा उपक्रम काही राज्यातील काही जिल्ह्यांत राबविला गेला. त्यातून नेमके काय साध्य झाले हे कळेलच. पण छोटे मोठे प्रश्न त्यातून सुटत असल्यास या मोहिमेत सातत्य राहणे आवश्यक आहे. जिल्ह्याचे मुख्यालय म्हणजे जिल्हाधिकारी कार्यालय. सर्वसामान्य नागरिक, शेतकरी यांची जिल्हाधिकाऱ्यांशी भेट होणे तसे दुर्मीळच. राजकीय पाठबळ वा जवळची ओळख असल्यास भेट शक्य होते. एखाद्याला असलेले प्रश्न, अडचणी वरकरणी किरकोळ वाटतात; पण छोट्या प्रशासकीय गुंत्यांमुळे त्या सुटत नाहीत. गाव, तालुका पातळीवर प्रयत्न करूनही ते सुटत नसल्याने जनता दरबार आणि सरतेशेवटी जिल्हाधिकाऱ्यांना भेटणे असे चित्र सामान्यपणे राज्यभरातील बहुतांश जिल्ह्यांत दिसते.

ग्रामीण भागातील, एखाद्या गावातील नेमक्या अडचणी काय आहेत, ग्रामस्थांना कोणते प्रश्न भेडसावत आहेत, त्यातून काय मार्ग काढता येईल, गावात राहण्याची, पाण्याची, विजेची सोय कशी आहे, सरकारी योजनांची प्रभावी अंमलबजावणी होते की नाही, सरकारी अधिकारी नियमितपणे गावदौरा करतात की नाही... अशा अनेक बाबींची पाहणी करून सर्वसामान्यांना भेडसावणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी काय करता येईल, यासाठी जिल्हाधिकारी, प्रशासकीय अधिकाऱ्यांचा एक दिवस गावात मुक्काम हा उपक्रम राबविण्यात येत आहे. अलीकडे अमरावती, नांदेड, सांगली, छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, धाराशिव जिल्ह्यांतील जिल्हाधिकाऱ्यांनी एकेका गावात जाऊन मुक्काम केला आणि अडचणी जाणून घेण्याचा प्रयत्न केला. उपक्रमांतर्गत जिल्हाधिकारी, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी एखादे गाव निवडून तिथे मुक्काम करतात, ग्रामस्थांशी संवाद साधतात. अनेक ठिकाणी संवादातून समस्या सुटल्याचीही उदाहरणे आहेत.

उळुंब (ता. वाई, जि. सातारा) येथे जिल्हाधिकाऱ्यांनी मुक्काम केला व गावकऱ्यांच्या अनेक प्रलंबित समस्या जागेवरच निकाली काढल्या. छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी वेरूळ मुक्कामी आले. तिथे संवादासाठी ग्रामस्थ दिसले नाहीत. जिल्हाधिकारी येणार आणि मुक्काम करणार याची माहितीच मुळात गावकऱ्यांना नव्हती. जिल्ह्याचा प्रशासकीय प्रमुख येणार असल्याची माहिती असूनही खालच्या यंत्रणेतील अधिकारी, कर्मचाऱ्यांनी नियोजन केले नसल्याचे समोर आले. या निमित्ताने जिल्हाधिकाऱ्यांना सरकारी यंत्रणेच्या ढिसाळ कारभाराचा अनुभव तरी आला! जर अधिकाऱ्यांच्या बाबतीत असे असेल, तर सर्वसामान्य जनतेचे काय? असा प्रश्न उपस्थित होतो. नांदेड, बीड, जालन्याच्या अधिकाऱ्यांनीही ग्रामस्थांच्या अडचणी जाणून घेतल्या. जिल्हाधिकाऱ्यांच्या दौऱ्यामुळे ग्रामस्थांना आपले प्रश्न थेट मांडण्याची संधी मिळाली. पण, एका गावात हा उपक्रम राबवून असे प्रश्न सुटणार आहेत काय? प्रत्येक गावात वेगवेगळ्या अडचणी असतात. कुठे रस्ता नाही, कुठे वीज पुरेशी नाही, कुठे वर्षानुवर्षे पाण्याची समस्या आहे, कुठल्या शाळांना पत्रे नाहीत, कुठे प्राथमिक आरोग्य केंद्रात कर्मचारी नाहीत, कुठे डॉक्टर नाहीत... एक ना हजारो प्रश्न आहेत. एक दिवसाच्या मुक्कामभेटीत काही प्रश्न निश्चित सुटतील. पण सगळ्याच अडचणी सोडविण्यासाठी यंत्रणेला कामाला लावावे लागणार आहे. ती जबाबदारी प्रमुख म्हणून निश्चितच जिल्हाधिकाऱ्यांची आहे. पहिल्या टप्प्यात प्रत्येक तालुक्यातून एकेक गाव निवडून अशा भेटी दिल्या तर बऱ्याच अंशी प्रश्न सुटतील. मात्र गावकऱ्यांना योजनांची माहिती मिळत नाही, मार्गदर्शनाचा अभाव असतो, यामुळे समस्या, अडचणी दूर होण्याऐवजी वाढायला लागतात. त्यातून सरकारी यंत्रणांवरील विश्वासाबाबत प्रश्नचिन्ह निर्माण होते. या मोहिमेत सातत्य राहिले तर अनेक अडचणी सुटून ग्रामीण भागातील लोकांच्या पदरात समाधान पडण्यास मदत मिळेल. त्यावर गांभीर्याने विचार होणे आवश्यक आहे.

## संस्कृत सुभाषित

स्वभावो नोपदेशने शक्यते कर्तुमन्यथा।
सुतप्तमपि पानीयं पुनर्गच्छति शीतताम॥

अर्थ : उपदेश केल्याने माणसाच्या स्वभावात होणारे परिवर्तन हे तेवढ्यापुरतेच असते, ते टिकत नाही. खूप तापवलेले पाणी पुन्हा थंड होत असते.

## गुरु वचन

### ज्येष्ठांच्या अनुभवाला कमी लेखू नका

एका शेठजीकडे अपार संपत्ती होती. एकेदिवशी त्याच्या मनात विचार आला की, एक भव्य शिव मंदिर बांधावे. सहा महिन्यात मंदिर बांधून तयार झाले. मंदिर उभारणीसाठी लागलेल्या खर्चाशिवाय जो पैसा शेठजीकडे उरला होता तो त्यांनी मंदिराच्या घुमटात भरून ठेवला.

याचा उल्लेख त्यांनी आपल्या वहीखात्यातही केला. नंतर ते तीर्थयात्रेला निघाले. मात्र वाटेतच त्यांचे निधन झाले. शेठजीचे चार मुले होती आणि चारही जण व्यापारी होते. शेठजीच्या मृत्युनंतर काही दिवसांनी त्यांच्या व्यापारात तोटा झाला. त्यामुळे त्यांना पैशाची आवश्यकता भासू लागली. तेव्हा त्यांनी आपल्या वडिलांची जुनी वहीखाते शोधण्यास सुरूवात केली. त्यापैकी एकात मंदिराच्या घुमटात धन ठेवल्याचा उल्लेख होता.

त्यात असेही लिहिले होते की, धन चैत्र शुक्ल नवमीच्या दिवशी घुमटात भरले होते. चार जणांनी घुमट तोडले. मात्र त्यांना धन मिळाले नाही. तेव्हा त्यांना आपल्या वडिलांचे घनिष्ठ मित्र असलेल्या एका ज्येष्ठ व्यक्तीला गाठले आणि घडलेला प्रकार सांगितला. त्या व्यक्तीने त्यांना चैत्र शुक्ल नवमीच्या दिवशी बारा वाजता येण्यास सांगितले. ठरलेल्या दिवशी व वेळी त्या व्यक्तीने त्या ठिकाणी खोदण्यास सुरूवात केली जिथे घुमटाची सावली पडली होती.

घुमटाची सावली चैत्र शुक्ल नवमीच्या दिवशी दुपारी बारा वाजता धन भरले होते आणि त्याच महिन्यात, दिवशी आणि वेळी घुमटाची सावली पडणाऱ्या ठिकाणी खोदकाम करण्यात आल्यावर धन सापडले. चौघा भावांनी ज्येष्ठ व्यक्तीचे आभार मानले आणि त्या धनातून आपला व्यापार पुन्हा सुरू केला. यावरून ज्येष्ठांच्या ठिकाणी असलेल्या अनुभवाला कमी लेखू नये, हेच ही कथा सांगते.

## उपदेशकथा

एकदा संगीतकार नौशाद सेटवर आले आणि त्यांनी भराभर सूचना करण्यास सुरुवात केली. सोफा या दिशेला ठेवा, फ्लॉवर पॉट इकडच्या टेबलावर ठेवा. गालीचा बदला. त्याऐवजी दुसऱ्या रंगाचा गालीचा आणा. सारेजण चकित होऊन पहायला लागले. दिग्दर्शक मेहबूबखान यांना मात्र याचं कारण कळून चुकलं. आदल्या दिवशी रेकॉर्डिंग रूममध्ये नौशाद साहेबांना गाण्याबद्दल त्यांनी अशाच सूचना दिलेल्या होत्या. त्यावेळी संगीतकार नौशाद यांनी त्यांना प्रत्युत्तर केलं नव्हतं. सर्व सूचना निमूटपणे ऐकल्या होत्या. दुसऱ्या दिवशीच्या या कृतीचा अर्थ फक्त मेहबूबखान यांनाच समजला. मोठ्या मनाच्या मेहबूब खान यांनी आपली चूक मानली. खिलाडूपणानं स्वीकारली. पुढे दोघांची मैत्री प्रदीर्घकाळ टिकली. त्यानंतर मेहबूब खाननी संगीताच्या कामात नौशाद साहेबांवर पूर्ण विश्वास टाकला.

कथा उपदेश : आपल्या कार्यक्षेत्रात काम करीत राहावं. दुसऱ्याच्या कामात ढवळाढवळ करू नये.

## पंचांग

| | |
|---|---|
| पंचांग | १४:५५:५३ |
| ९ जुलै २०२६ | योग:सुकर्मा १०:११:१९ |
| गुरुवार | करण:गर १०:३८:०६ |
| विक्रम संवत्- २०८२ | करण:वणिज २१:३१:४६ |
| निज ज्येष्ठशके | सूर्य:मिथुन |
| संवत्- १९४८ | चन्द्र:मेष |
| संवत्सर -पराभवनाम | हिजरी सन् - १४४८ |
| अयन- दक्षिणयन | मुस्लिम मास - मोहरम |
| मास- निज ज्येष्ठ | तारीख - २३ |
| ऋतु- सौर वर्षा | विशेष |
| कृष्ण पक्ष | राजमाता जिजाऊसाहेब |
| तिथि:नवमी १०:३८:०६ | भोसले पुण्यतिथी |
| नक्षत्र:अश्विनी | - (तिथीप्रमाणे) |

## दै. ‘संध्या’ धमाल सूडोकु क्र. १००५

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | 3 | 1 | | 9 | |
| 4 | 1 | | 9 | | 8 | | | 5 |
| 3 | 6 | | | 5 | | | | |
| | | | | | 7 | 8 | 1 | 6 |
| | 5 | 6 | | 4 | | 7 | 2 | |
| 9 | 7 | 8 | 2 | | | | | |
| | | | | 8 | | | 4 | 7 |
| 6 | | | 7 | | 4 | | 8 | 1 |
| | 4 | | 1 | 6 | | | | |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

- उत्तर उद्याच्या अंकात

सूडोकु क्र. १००४ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 6 | 9 | 7 | 5 | 3 | 1 | 8 | 2 | 4 |
| 5 | 2 | 8 | 9 | 4 | 7 | 3 | 1 | 6 |
| 3 | 1 | 4 | 6 | 8 | 2 | 9 | 5 | 7 |
| 1 | 7 | 2 | 3 | 9 | 4 | 6 | 8 | 5 |
| 8 | 4 | 6 | 7 | 2 | 5 | 1 | 9 | 3 |
| 9 | 5 | 3 | 1 | 6 | 8 | 4 | 7 | 2 |
| 2 | 8 | 5 | 4 | 1 | 3 | 7 | 6 | 9 |
| 4 | 6 | 1 | 2 | 7 | 9 | 5 | 3 | 8 |
| 7 | 3 | 9 | 8 | 5 | 6 | 2 | 4 | 1 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १८१६ - अर्जेंटीनाने स्पेनकडून स्वतंत्र झाल्याचे घोषीत केले
- १९४८ - पाकिस्तानने जीना अंतरराष्ट्रीय विमानतळ, शाही किल्ला आणि घटक सभाचे चित्र असलेले डाक तिकीट जारी केले.
- १९८९ - मक्कामध्ये दोन बॉम्बस्फोटात एक श्रद्धालु ठार तर १६ अन्य जखमी झाले.
- २००६ - फीफा विश्वचषकाचा अंतिम सामन्यात फ्रान्सचा फुटबॉलपटू जैनोद्दीन जिदान यांने इटलीचा मार्को मेटाराजी याला डोक्याने धडक मारली.

### राष्ट्रीय

- १५३३ - थोर वैष्णव संत चैतन्य महाप्रभु यांचे महानिर्वाण.
- १८७३ - मुंबई शेअर बाजार एका वडाच्या झाडाखाली सुरू झाला.
- १९३७ - डॉ. ना. भा. खरे यांच्या नेतृत्वाखाली पहिले काँग्रेस मंत्रिमंडळ स्थापन झाले.

### जन्म

- १९१९ - दुहेरी टाक्याच्या शिवणयंत्राचा संशोधक इपियास होव यांचा जन्म.
- १९२६ - बेन मॉटलसन, अमेरिकन भौतिकशास्त्रज्ञ व नोबेल पारितोषिक विजेताचा जन्म.
- १९३८ - संजीव कुमार, हिंदी चित्रपट अभिनेताचा जन्म.

### निधन

- १८५० - अमेरिकाचे १२वे राष्ट्राध्यक्ष जचेरी टेलर यांचे निधन.
- १८५६ - इटलीचे डॉक्टर अमेडो अवोगड्रो यांचे निधन.
- १९९२ - अमेरिकन पत्रकार इरीक सीवारीड यांचे निधन.
- १९९९ - कॅनडाचा राजनेता रॉबर्ट डी कोटरेट यांचे निधन.

## : SMS :

Shah Jahan Ne
Taj Mehal k
Her Khirki,
Her Deewar,
Her Meenar,
Her Cheez ko Dekha,
Aur Kaha
Maa Qasam,
Sab Filmi Hai.

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | २७.३ | २४.२ |
| अहमदनगर | २६.५ | २४.२ |
| अकोला | ३६.७ | २६.७ |
| अमरावती | ३३.१ | २६.३ |
| बीड | ३५.८ | २९.९ |
| भंडारा | ३३.१ | २७.३ |
| बुलढाणा | ४५.५ | ३१.८ |
| चंद्रपूर | ३७.१ | ३०.४ |
| चेन्नई | ४२.५ | ३१.७ |
| नवी दिल्ली | ४६ | २७.५ |
| धुळे | ३४.५ | २६.१ |
| गोंदिया | ३१.४ | २६.९ |
| जळगाव | ३५.२ | २६ |
| कोल्हापूर | २५.७ | २४.४ |
| लातूर | ३२.४ | २५.१ |
| मुंबई | ३४.९ | ३१.७ |
| नागपूर | ३३.८ | २७.१ |
| नांदेड | ३५.२ | २७.१ |
| नंदूरबार | ३१.२ | २५.६ |
| नाशिक | २५.७ | २४.२ |
| पुणे | २४.७ | २३.६ |
| पंढरपूर | ३२.३ | २५.६ |
| सातारा | २६.९ | २४.१ |
| सांगली | २६.४ | २४.५ |
| सोलापूर | ३३.६ | २५.७ |
| वर्धा | ३४.८ | २७.३ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग : पिवळा, योग्य दिशा : उत्तर
आत्मविश्वास तसेच धैर्यपूर्वक पुढे जावे. यश आवश्य मिळेल.

**वृषभ :** शुभ रंग : काळा, योग्य दिशा : पूर्व
बुद्धिचातुर्याच्या जोरावर कार्यक्षेत्रात यश मिळेल. नव्या योजनांची शक्यता आहे. अधिक लोभ, लालच करु नका.

**मिथून :** शुभ रंग : काळा, योग्य दिशा : उत्तर
सामाजिक स्तरातील परिवर्तन आणि प्रतिष्ठेच्या बाबतीत चिंतीत रहाल. मानसिक अस्थिरता राहिल.

**कर्क :** शुभ रंग : हिरवा, योग्य दिशा : पूर्व
स्वाध्यायात आवड वाढेल. आपली दुरदर्शीता आणि बुद्धिमत्तेनी काही रखडलेली कामे पूर्ण होतील.

**सिंह :** शुभ रंग : पांढरा, योग्य दिशा : पश्चिम
कार्यकुशलता आणि कार्यक्षमता वाढेल. आपसातील विचार विमर्श लाभदायक ठरतील.

**कन्या :** शुभ रंग : हिरवा, योग्य दिशा : पश्चिम
खरेदीचा योग राहिल. व्यापारात लाभ मिळेल. आपली स्थिती, योजनेच्या अनुरुप काम करा.

**तूळ :** शुभ रंग : काळा, योग्य दिशा : उत्तर
योग्य मार्गदर्शन घ्यावे लागेल. कामकाजातील जिज्ञासा वाढेल.

**वृश्चिक :** शुभ रंग : लाल, योग्य दिशा : पूर्व
आपला व्यवहार आणि कार्यकुशलतेनी अधिकारी वर्गाला फायदा मिळेल.


**धनू :** शुभ रंग : गुलाबी, योग्य दिशा : पश्चिम
आर्थिक कामात इच्छित प्रगति न होण्याने मानसिक अशांतता राहिल. शत्रूच्या संख्येत वाढ होईल.

**मकर :** शुभ रंग : निळा, योग्य दिशा : पूर्व
शुभ कार्यात सामिल होण्याने यश आणि मान सन्मान मिळू शकेल. लाभ अधिक प्रमाणात मिळेल.

**कुंभ :** शुभ रंग : पांढरा, योग्य दिशा : उत्तर
व्यवहार चातुर्य आणि सहनशिलतेमुळे येणाऱ्या संकटातुन सुटका होईल. आपल्या कामाशी काम ठेवा.

**मीन :** शुभ रंग : हिरवा, योग्य दिशा : पश्चिम
वेळेचा लाभ जास्तीत जास्त घ्यायला हवा. व्यापारात प्रगतिचे योग आहेत.

## ‘दै. संध्या’ जम्बो शब्दकोडे क्र. १००५



### आडवे शब्द

१.जसा राजा तशीच त्याची प्रजा असते या अर्थी एक म्हण
६.संगर,काला
१०.नवरा मुलगा
११.शहर
१२.पोळया भाजण्याचे साधन
१३.शिजवलेली दाळ
१५.साम्यता,असमानताच्या विरूध्द, १७.कपाळ,ललाट
१८.फळातील द्रव
१९.‘-- पुरता मामा’ एक म्हण
२०.कागद फाटण्याचा आवाज
२१.सावध,दक्ष
२२.आण,कसम मराठीत
२४.खराब उलटा करा
२७.सरळ,तडक
२८.बाण,शर
२९.ह्दय
३०.उपयोग
३२.हिरकणीचा उपयोग ही कापण्यासाठी होतो
३४.कावळयाचा रंग
३५.भार,ओझे
३६.अटीतटीची भाशा
३७.केस काळे करण्याचे साधन
३८.नकली,बनवलेला
३९अ.इंग्रजीत चावी
४०.वडीलांचा भाऊ
४१.दुसऱ्याच्या शरीरात प्रवेश करणे
४४.पहाटे आरवणारा प्राणी,कॉक मराठीत
४६.सुगंध,दरवळ
४८.एक लिपी
४९.मासा पकडण्याचा आकडा
५१.शिवाय,म्हैस
५२.भेट,संगम
५३.सापाने टाकलेली त्वचा
५४.हार,सर
५५.भिंतीवर सरपटणारा सरडयाच्या जातीचा एक प्राणी
५६.प्रजा,जन
५७.वासना,इच्छा
६०.घुसणे,प्रवेश करणे
६२.एक फुल झाड
६३.खाली,रिक्त
६४.फटाक्यांची माळ
६५.योग्य,सुरळीत
६६.एक काटेरी फळ
६९.उणीव,ददात
७२.लकाकी,चमक
७३.पवन,वात
७५.मादीचा जोडीदार
७६.थापा मारणारा
७७.चोप,ताडण
७८.सडेतोड,सणसणीत

### उभे शब्द

१.वेळ मिळेल तसा,सवडीप्रमाणे
२.सिता हरण करणारा राक्षस
३.परस्त्रिशी संग ठेवणारा
४.डामडौल,ऐट
५.माहीतगार,ज्ञात असलेला
६.उन्हाळयातील लिंबु पाणी पेय
७.गोड बोलणारा,भाशण करणारा, ८.प्रश्न हिंदीत
९.खरडुन पूसून,भेदभाव न करता
१४.लक्ष्मीपती,विस्णु
१५.वरचढ,डोईजड
१६.नराचा बळी
१८.रात्री बाहेर फिरायला निघणारा
२३.भितीने होणारा शरीराचा कंप
२५.राजकिर्द,सत्तेचा कालावधी
२६.एक सरपटणारा प्राणी
२९.इच्छा,वासना
३०.स्त्रीया संक्रांतीला हे देतात
३१.धुळकण
३२.ऐन तिन्ही सांजेची वेळ
३३.घराबाहेर न निघुन कुणासोबत ही न मिसळणारा
३८.भिमाने वध केलेला एक खादाड राक्षस
३९.घर,भवन हिंदीत
४१.दुसऱ्यांवर उपकार करणारा
४२.एक विदेशी मदय प्रकार
४३.विकास झालेला,विकसनशील
४५.उपेक्षा करणे,अनादर करणे
४७.हे म्हणजे ते व ते म्हणजे हे
५०.तळे,सरोवर
५४.मालवणी भोशत मला
५५.स्वयंपाक शास्त्र
५८.एकोणचाळीस उभेचे उत्तर पहा
५९.अभंगातील नामदेव महाराज
६१.रडुन सांगीतलेली कथा
६६.मुसलमानी भिक्षुक
६७.एक अधिक पाव
६८.‘देवाची --- अन नारळात पाणी’
७०.ग्रामिण स्वप्न
७१.नेहमी रडणारा
७२.खंदक,खाण
७४.रक्षा,राखुंड
७५.बोटाच्या अग्रभागावरील कठीण आवरण

### जम्बो शब्दकोडे क्र. १००४ चे उत्तर

आडवे उत्तर : १.जवळपास ४.गजवदन ८.पाप १०.तारामती १२.यजमान १३.मरगळ १५.समाधान १७.मग १८.तम १९.यंत्रमाग २१.नवा २२.सदाचार २३.सव २४.शहर २५.रयत २८.सर्वत्र २९.प्रयास ३१.मागे हटणे ३३.कोमट ३५.ज्ञात ३६.कळस ३७.नर ३८.मुद्दाम ३९.नाका ४०.गीत ४२.फटका ४३.लखलखीत ४८.रसातल ५०.दमा ५२.जन ५३.मासा ५५.चल ५६.कम लाकर ५७.महिना ५८.वध ६०.वारुळ ६१.बारदान ६३.धनगर ६५.लगत ६७.मधमाशी ७०.वाळू ७१.आळस ७३.महान ७५.सरणे ७६.घोडनवरा ७९.सल ८०.नात ८१.फारसा ८२.ओळ ८३.सम ानता

उभे उत्तर : १.जनमत २.पाताळयंत्री ३.सरा ४.गती ५.वर्तमानपत्र ६.नयन ७.दिम ाखदार ९.पलंग ११.मलमास १४.रमणीय १६.धावा १७.मरणयातना २०.गवसणे २२.सह २४.शरम २५.रजक २६.तमासगीर २७.दहन २९.प्रज्ञा ३०.सरकारजमा ३२.टरफल ३३.कोमल ३४.टपाल ३८.मुकादम ३९अ.कारनामा ४१.तसाच ४४.खबरबात ४५.खीज ४६.तनमनधन ४७.मामा ४९.तलवार ५१.मालाम ाल ५४.सावध ५६.कळवळणे ५९.धनवान ६२.दाम ६४.गळू ६६.गरुड ६८.शीतलता ६९.साम ना ७१.आरसा ७२.पाव ७४.हात ७५.सर ७६.घोळ ७७.नफा ७८.रास ७९.सन

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे - ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily “Sandhya” News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### खडकवासला जलाशय येथे पुणे महानगरपालिकेतर्फे जलपूजन

■ नागरिकांच्या पाणीपुरवठ्यासाठी चांगल्या पर्जन्याची प्रार्थना

पुणे (दैनिक संध्या) : सालाबादप्रमाणे पुणे महानगरपालिकेतर्फे आज खडकवासला जलाशय येथे जलपूजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. पुणे शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या धरणांमध्ये समाधानकारक पाणीसाठा व्हावा, तसेच नागरिकांना वर्षभर मुबलक पाणी उपलब्ध व्हावे, या उद्देशाने विधिवत जलपूजन करण्यात आले. यावेळी मा. आमदार श्री. भीमराव अण्णा तापकीर आणि पुणे महानगरपालिकेच्या माननीय महापौर श्रीमती मंजुषा ताई नागपुरे यांच्या हस्ते जलपूजन करण्यात आले.

### जाहीर नोटीस

प्रति,

सर्व लोकांस विशेषतः गांव तेजेवाडी, ता. जुन्नर, जि. पुणे येथील व परिसरातील सर्व लोकांस,

आमचे आशील श्री. तुकाराम विष्णू नायकोडी, रा. तेजेवाडी, ता. जुन्नर, जि.पुणे आज समक्ष जुन्नर यांनी प्रत्यक्ष सांगितलेवरून व दिलेल्या माहितीप्रमाणे जाहीररित्या कळविणेत येते ते येणे प्रमाणे :-

**१) मिळकतिचे वर्णन :** अ) तु. व जि. पुणे पो. तु. दु. नि. जुन्नर ता. व पं.स. जुन्नर, जि. पुणे पैकी ग्रामपंचायत तेजेवाडीचे हद्दीतील मिळकत.

| | स.नं./ग.नं. | क्षेत्र. हे. आर. | आकार. रू. पै. | नवीन स.नं./ग.नं |
|---|---|---|---|---|
| १) | ११५/१२. | ०१. ४२. | ३.०७. | ११५/११ |

यापैकी १/२ हिश्याची पश्चिम बाजुची हे ०० आर ६८ खरा. ०३ आर

२) ११६/१३अ. ०१. ३७ नवीन स.नं./ग.नं. ११६/६/अ यापैकी १/२ हिश्याची पश्चिम बाजुची हे ०० आर ६८.५ त्यापैकी पुर्व बाजुची हे ०० आर २६.

येणे प्रमाणे वर्णनाची शेतजमीन त्यातील झाडझाडोरा तदंगभूत वस्तू व जाणेयेणेचे वहिवाटीचे सर्व हक्कासह.

ब) तु. व जि. पुणे पो. तु. दु. नि. जुन्नर ता. व पं. स. जुन्नर, जि. पुणे पैकी ग्रामपंचायत तेजेवाडीचे हद्दीतील मिळकत.

| | ग.नं. | क्षेत्र. हे. आर. | आकार रू. पै. | |
|---|---|---|---|---|
| १) | ११६/५. | ०.१३. | ०.२० | नवीन स.नं./ग.नं. ११६/२ |

यापैकी १/४ हिश्याची पश्चिम बाजुची ३.२५ आर समाईकातील

२) ११८/२. ०.१५. ०. ३८ नवीन स.नं./ग.नं. ११८/२
यापैकी १/२ हिश्यापैकी पश्चिम बाजुची १/४ हिश्याची हे ०० आर ०१.८७

३) ११८/३. ०.३४. ०.७० नवीन स.नं./ग.नं. ११८/३
यापैकी १/४ हिश्याची पश्चिम बाजुची हे ०० आर ८.५

४) ११८/८. ०.१६. ०. ३२ नवीन स.नं./ग.नं. ११८/८
हे एकूण हे ०० आर २९.६२ एव्हढे क्षेत्र

येणे प्रमाणे वर्णनाची शेतजमीन त्यातील झाडझाडोरा तद्रंभूत वस्तू व जाणेयेणेचे वहिवाटीचे सर्व हक्कासह.

२) वर कलम १ यात नमूद केलेल्या जमिनीचे मुळ मालक १) शांताबाई सावळेराम वाघचौरे व २) सोनाबाई बाप बाबाजी गायकवाड यांनी जुन्नर येथील मे. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर यांचेसमोरील रे.मु.नं. २८६/२०१४ चे अंतीम हुकूमनाम्याप्रमाणे आमचे आशिलांस कायमखुष खरेदी देणेचे मान्य व कबूल केले. उपरोक्त मिळकतिचा आमचे आशिलांकडे प्रत्यक्ष व खुला कब्जाही दिलेला असून तो आजपर्यंत कायम आहे. आमचे आशिलांची प्रथमपासूनच वर नमूद मिळकत स्वखर्चाने खरेदी घेणेची इच्छा व तयारी होती व आहे. असे असताना काही आर्थिक, अनुचीत लाभ उठविणेचे इराद्याने व त्याअनुषंगाने आमचे आशिलांस फसविण्याचे हेतुने शांताबाई सावळेराम वाघचौरे हिचे वारस तसेच सोनाबाई बाप बाबाजी गायकवाड ह्या वर नमूद मिळकतिचे संदर्भात काही अनाधिकाराचा, बिनताब्याचा व्यवहार करण्याचे अगर त्याअनुषंगाने करार-मदार करण्याचे प्रयत्नात असल्याचे आमचे आशिलांस खात्रीलायकरित्या समजते. परंतू तसला कुठलाही व्यवहार वर नमूद मिळकतीमधील आमचे आशिलांचे कायदेशीर हक्कावर, सदरहू मिळकती खरेदी घेणेचे अधिकारावर

तसेच उपरोक्त मिळकतीमधील आमचे आशिलांचे असलेल्या ताब्यावर बंधनकारक ठरणार नाहीत. तसेच संबंधीत व्यक्तीस उपरोक्त मिळकतिची मालकी व ताबा मिळणार नाही याची नोंद घ्यावी.

३) तरी सर्व लोकांस अशी समज देणेत येते की, वर नमूद केलेल्या मिळकतिचे संदर्भात शांताबाई सावळेराम वाघचौरे हिचे वारस १) देवेंद्र सावळेराम वाघचौरे ३) निलेश विरेंद्र वाघचौरे ३) शैलेंद्र विरेंद्र वाघचौरे ४) प्रियांका विरेंद्र वाघचौरे विवाहानंतरचे नावे सौ. प्रियांका विशाल रोकडे ५) सुनिता विरेंद्र वाघचौरे ६) सौ. शारदा सुदाम शिशुपाल तसेच सोनाबाई बाप बाबाजी गायकवाड यांचेबरोबर कोणीही खरेदी, विक्री, दान, गहाण, लिज, बक्षीस, अगर त्याअनुषंगाने अन्य कुठल्याही प्रकारे तबदिलीचे व्यवहार व करार-मदार करू नयेत.

तद्वत वित्त पुरवठा करणारे कुठल्याही संस्थांनी वर नमूद मिळकतीवर कर्ज पुरवठा करून तारणाचे व्यवहार करू नयेत. तसले कुठलेही व्यवहार कायदेशीर ठरणार नाहीत याची नोंद घ्यावी.

कुणाचीही फसवणूक होवू नये म्हणून आगावू प्रसिध्दीस दिली असे.

कळावे.
येणे प्रमाणे जाहीर नोटीस.
६/०७/२०२६

तुकाराम विष्णु नायकोडी
श्री. कौस्तुभ पी. कर्पे
बी.एस. एल., एल.एल.एम.
अॅडव्होकेट
"आशियाना" "ईशान", ॐ शक्तीनगर,
किल्ले शिवनेरी पायथा, जुन्नर, जि. पुणे
महा/१८३४/२०१४
मो. ७७६७०९३८६२

# ‘पुणे प्रथम – सेवावारी २०२६’ अंतर्गत वारकऱ्यांसाठी सर्वंकष सुविधा

पुणे (दै. संध्या)

■ संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज आणि जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांच्या पालखी सोहळ्याच्या स्वागतासाठी पुणे महानगरपालिका सज्ज- महापौर मंजुषा नागपुरे

■ सेवाभाव, स्वच्छता आणि आधुनिक व्यवस्थापनाचा संगम



आषाढी वारीचे मंगलमय वातावरण संपूर्ण पुणे शहरात अनुभवायला मिळत असून संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊली आणि जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांच्या पालखी सोहळ्याच्या स्वागतासाठी पुणे महानगरपालिका सर्वतोपरी सज्ज झाली आहे. हजारो वारकरी भाविकांच्या सेवेसाठी ‘पुणे प्रथम – सेवावारी २०२६’ या उपक्रमांतर्गत शहरभर व्यापक नियोजन करण्यात आले असून पालखी मार्ग, मुक्कामस्थळे आणि प्रमुख ठिकाणी आवश्यक सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

महापौर मंजुषा नागपुरे यांच्या संकल्पनेतून राबविण्यात येत असलेल्या ‘पुणे प्रथम – सेवावारी २०२६’ या उपक्रमामध्ये पारंपरिक सेवाभावाला आधुनिक तंत्रज्ञान आणि प्रभावी प्रशासनाची जोड देण्यात आली आहे. दोन्ही पालखी सोहळ्यांच्या पार्श्वभूमीवर महानगरपालिकेच्या सर्व विभागांनी समन्वयाने नियोजन पूर्ण केले असून स्वच्छता, अखंडित पाणीपुरवठा, तात्पुरती स्वच्छतागृहे, वैद्यकीय सेवा, आपत्कालीन प्रतिसाद पथके, प्रकाश व्यवस्था, अग्निसुरक्षा, वाहतूक समन्वय तसेच नियंत्रण कक्ष कार्यान्वित करण्यात आले आहेत.

महापौर मंजुषा नागपुरे यांनी महानगरपालिका आयुक्त, वरिष्ठ अधिकारी आणि संबंधित विभागप्रमुखांसमवेत पालखी मार्ग तसेच विविध मुक्कामस्थळांचा आढावा घेत आवश्यक सूचना दिल्या. वारकऱ्यांना कोणत्याही प्रकारची गैरसोय होऊ नये, यासाठी प्रत्येक विभागाला स्वतंत्र जबाबदाऱ्या निश्चित करण्यात आल्या असून संपूर्ण यंत्रणा सतर्क ठेवण्यात आली आहे.

सध्या शहरात सुरू असलेल्या पावसाच्या पार्श्वभूमीवर विशेष खबरदारी घेण्यात आली आहे. पाणी साचणाऱ्या ठिकाणांवर उपाययोजना, आपत्ती व्यवस्थापन पथके, आरोग्य विभाग, अग्निशमन दल आणि क्षेत्रीय कार्यालयांमधील अधिकारी २४ तास सज्ज ठेवण्यात आले आहेत. पालखी मार्गावर स्वच्छता, सुरक्षितता आणि तातडीची मदत उपलब्ध राहील, यासाठी स्वतंत्र नियंत्रण व्यवस्था उभारण्यात आली आहे.

पालखी सोहळ्यादरम्यान वाहतूक व्यवस्थेतील बदल, प्रशासनाकडून जारी करण्यात येणाऱ्या अधिकृत सूचनांचे पालन करावे. पावसाची परिस्थिती लक्षात घेऊन आवश्यक ती काळजी घ्यावी तसेच पालखी सोहळा सुरक्षित, स्वच्छ आणि भक्तिमय वातावरणात पार पडण्यासाठी प्रशासन आणि पोलिस यंत्रणेला सहकार्य करावे. सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे

> संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊली आणि जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांच्या पालखी सोहळ्याचे पुणे शहरात होणारे आगमन ही प्रत्येक पुणेकरासाठी श्रद्धा, सेवा आणि संस्कृतीचा उत्सव आहे. वारकऱ्यांची सेवा हीच खरी संतसेवा मानून पुणे महानगरपालिकेने सर्व विभागांना सज्ज ठेवले आहे. संतांनी दिलेला समता, बंधुता आणि मानवतेचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्यासाठी ‘पुणे प्रथम – सेवावारी २०२६’ हा उपक्रम अधिक प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. सर्व पुणेकरांनी प्रशासनाला सहकार्य करत सेवाभावाने या पवित्र सोहळ्यात सहभागी व्हावे.
>
> **- मंजुषा नागपुरे, महापौर, पुणे**

## एकता नगर व विठ्ठल नगर तसेच शिवाजी नगर परिसराला पहाटे महापौर यांची भेट



पुणे (दै. संध्या)

खडकवासला धरणातून पाण्याचा विसर्ग सुरू झाल्यानंतर संभाव्य पूरस्थितीचा आढावा घेण्यासाठी पुणे महानगरपालिकेच्या माननीय महापौर मंजुषा ताई नागपुरे यांनी आज पहाटे सिंहगड रस्त्यावरील एकता नगर व विठ्ठल नगर या संभाव्य बाधित परिसरांची प्रत्यक्ष पाहणी केली.

यावेळी महापौरांनी स्थानिक नागरिकांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या तसेच प्रशासनाच्या संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक त्या प्रतिबंधात्मक उपाययोजना तातडीने राबविण्याच्या सूचना दिल्या. नागरिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत परिस्थितीवर सातत्याने लक्ष ठेवण्याचे निर्देशही देण्यात आले.

या प्रसंगी नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने प्रशासनामार्फत आवश्यक सूचना देण्यात आल्या. नदीपात्रालगत तसेच सखल भागात राहणाऱ्या नागरिकांनी सतर्क राहावे, प्रशासनाच्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे आणि आवश्यकता भासल्यास सुरक्षित स्थळी स्थलांतर करण्यासाठी प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन महापौर मंजुषा ताई नागपुरे यांनी केले.

महापौर म्हणाल्या, “पुणे महानगरपालिका आणि जिल्हा प्रशासन परिस्थितीवर सातत्याने लक्ष ठेवून आहे. नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता केवळ अधिकृत सूचनांचे पालन करावे. नागरिकांच्या जीवित व मालमत्तेच्या सुरक्षेसाठी महानगरपालिका पूर्णपणे सज्ज असून आवश्यक ती सर्व मदत तातडीने उपलब्ध करून दिली जाईल.” पाहणीदरम्यान स्थानिक नागरिक उपस्थित होते. त्यांच्या सूचनांची दखल घेत संबंधित यंत्रणांना आवश्यक ती कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले.

# पुणेकर दिग्दर्शक आणि निर्मात्यांचे बॉलीवूडमध्ये यश

## 'बेबी डू डाय डू' चित्रपटाला प्रेक्षकांचा उदंड प्रतिसाद

पुणे (दै. संध्या)



पुणे : चित्रपटसृष्टीमध्ये नावलौकिक मिळवण्याचे अनेकांचे स्वप्न असते, परंतु या क्षेत्रामध्ये संधी मिळणेही अनेकदा आव्हानात्मक ठरते . अशा या बॉलीवूड जगतामध्ये पुणेकर असलेल्या दिग्दर्शक आणि निर्मात्यांनी केवळ संधीच मिळविली नाही तर बॉलीवूडमध्ये " बेबी डू डाय डू" या चित्रपटाच्या निमित्ताने घवघवीत यशही मिळवले. हा चित्रपट प्रेक्षकांच्या पसंतीला उतरला असून पुण्यातील बहुतांश चित्रपटगृहांमध्ये चित्रपटाच्या तिकीट खिडकीवर हाउसफुल बोर्ड झळकले आहेत.

सलीम सिबलिंग आणि पुणे 04 पिक्चर एलाएलपी यांनी निर्मिती केलेला हुमा कुरेशी यांची प्रमुख भूमिका असलेला 'बेबी डू डाय डू' हा हिंदी चित्रपट 3 जुलै रोजी प्रदर्शित झाला. चित्रपटाचे निर्माते आणि दिग्दर्शक नचिकेत सामंत हे पुणेकर आहेत. सामंत यांच्या संकल्पनेतून साकार झालेल्या 'बेबी डू डाय डू' या चित्रपटाला पुण्यासह देशाच्या अनेक चित्रपटगृहांमध्ये प्रेक्षकांनी हाउसफुल गर्दी केली आहे.

पुण्यातील औंध येथील वेस्टएंड मॉल येथे असलेल्या सिनेपोलीस चित्रपटगृहामध्ये अभिनेत्री हुमा कुरेशी, चित्रपटाचे दिग्दर्शक नचिकेत सामंत, अभिनेता, निर्माता साकिब सलीम, अभिनेता रचित सिंग आणि मरुधर शेखावत यांनी भेट दिली. चित्रपट निर्मिती संदर्भात आपले अनुभव सांगत कलाकार आणि निर्मात्यांनी प्रेक्षकांशी संवाद साधला.

हुमा कुरेशी म्हणाल्या, बेबी डू डाय डू या चित्रपटाची निर्मिती आणि या चित्रपटातील भूमिका दोन्हीही माझ्यासाठी आव्हानात्मक होत्या. मी त्या प्रामाणिकपणे पार पाडले आहे. चित्रपट पूर्ण झाल्यानंतर हा चित्रपट आता पूर्णतः प्रेक्षकांचा झाला असून प्रेक्षकांनी या चित्रपटाला अधिकाधिक प्रेम द्यावे असे मी आवाहन करते. पुण्यासह महाराष्ट्र आणि देशाच्या अनेक भागांमध्ये असलेल्या चित्रपटगृहांमध्ये या चित्रपटाचे अनेक शो हाउसफुल झाले आहेत . माझ्यातील कलाकाराला यामुळे प्रोत्साहन मिळाले असून यांसारख्या अनेक कलाकृती भविष्यातही करण्याची प्रेरणा मिळाली आहे.

प्रेक्षकांनी बेबी डू डाय डू हा चित्रपट स्वतःचा आहे असे समजून चित्रपट अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचवावा. चित्रपटाला आता मिळणारे प्रेम असेच कायम राहावे. त्यामुळे एक अभिनेत्री आणि निर्माता म्हणून अशाप्रकारे अनेक कलाकृती भविष्यातही करता येतील असे आवाहनही हुमा कुरेशी यांनी यावेळी प्रेक्षकांना केले.

नचिकेत सामंत म्हणाले , प्रेक्षकांच्या चित्रपटासाठी मिळालेल्या प्रेमाबद्दल मी अत्यंत आभारी आहे. मी ज्या ठिकाणी वाढलो त्या पुण्यामध्ये माझ्यावर एक कलाकार म्हणून प्रेक्षकांचे प्रेम पाहून अत्यंत भारावून गेलो आहे. माझ्या स्वतःच्या शहरांमध्ये मिळणारे हे प्रेम एक प्रकारे माझ्यावर कौतुकाची थाप आहे यामुळे अशा प्रकारचे काम करण्यासाठी प्रोत्साहन मिळते.

साकिब सलीम म्हणाले, चित्रपटाला मिळणारे प्रेम पाहून आम्ही गेल्या तीन वर्षांपासून या चित्रपटासाठी घेतलेल्या मेहनतीचे चीज झाल्यासारखे वाटते. या चित्रपटाच्या निर्मितीसाठी कोणताही मोठा स्टुडिओ अथवा निर्मिती संस्था आमच्या पाठीशी नाही. प्रेक्षकांचे मिळणारे प्रेम आणि प्रतिसाद हीच आमच्यासाठी ऊर्जा असून प्रेक्षक हा चित्रपट निश्चितच सुपरहिट करतील याची मला खात्री आहे.

हुमा कुरेशी यांच्यासह बेबी डू डाय डू या चित्रपटांमध्ये चंकी पांडे सिकंदर खेर, सीमा पहावा यांच्या प्रमुख भूमिका आहेत. अभिनेता साकिब सलीम आणि पुणे 04 पिक्चर्स एलएलपी यांनी चित्रपटाची निर्मिती केली आहे. आमदार सिद्धार्थ शिरोळे, पुण्याचे उपमहापौर परशुराम वाडेकर, नगरसेवक सनी निम्हण यांनीही औंध येथील सिनेपोलीस चित्रपटगृहामध्ये भेट देत चित्रपटाच्या वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# नागरिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य – महापौर मंजुषा नागपुरे

### मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर अण्णा मोहोळ यांच्या अध्यक्षतेखाली आपत्ती व्यवस्थापनाचा आढावा

पुणे (दै. संध्या)



गेल्या काही दिवसांपासून पुणे शहरात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे विविध भागांत झाडे कोसळणे, रस्त्यांवर पाणी साचणे, घरांमध्ये व कॉलनींमध्ये पाणी शिरणे, भिंती व रस्ते खचणे तसेच वाहतुकीवर परिणाम होण्याच्या घटना घडत आहेत. या पार्श्वभूमीवर नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने केंद्रीय राज्यमंत्री मा. श्री. मुरलीधर अण्णा मोहोळ यांच्या अध्यक्षतेखाली पुणे महानगरपालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन विभागात आज आढावा बैठक घेण्यात आली.

बैठकीत शहरातील सद्यस्थितीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. विविध विभागांकडून सुरू असलेल्या उपाययोजना, आपत्कालीन परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी करण्यात आलेली तयारी तसेच विभागांमधील समन्वय यावर सखोल चर्चा करण्यात आली. कोणतीही आपत्ती उद्भवल्यास संबंधित विभागांनी तातडीने घटनास्थळी पोहोचून आवश्यक मदत व उपाययोजना कराव्यात, नागरिकांना त्वरित सहाय्य उपलब्ध करून द्यावे आणि सर्व यंत्रणांनी समन्वयाने कार्य करून परिस्थितीवर प्रभावी नियंत्रण ठेवावे, अशा स्पष्ट सूचना यावेळी देण्यात आल्या.

यावेळी महापौर मा. मंजुषाताई नागपुरे यांनी सांगितले की, पुणे महानगरपालिका नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी पूर्णपणे सज्ज असून सर्व विभागांना सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. पावसाच्या पार्श्वभूमीवर आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा, अग्निशमन विभाग, आरोग्य विभाग, क्षेत्रीय कार्यालये तसेच इतर संबंधित विभाग २४ तास कार्यरत असून नागरिकांना कोणतीही अडचण निर्माण झाल्यास तातडीने मदत उपलब्ध करून देण्यात येईल. नागरिकांनीही अफवांवर विश्वास न ठेवता प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे आणि आवश्यक असल्यास महानगरपालिकेच्या नियंत्रण कक्षाशी संपर्क साधावा, असे आवाहन त्यांनी केले. या बैठकीस पुणे महानगरपालिकेचे आयुक्त श्री. नवल किशोर राम, सभागृह नेते श्री. गणेशजी बिडकर, स्थायी समिती अध्यक्ष श्री. श्रीनाथ भिमाले, उपमहापौर श्री. पुरुषोत्तम वाडेकर, विरोधी पक्षनेते श्री. निलेश निकम, पक्षनेते श्री. नितीन गावडे, श्री. रामचंद्र कदम तसेच सहकारी नगरसेवक, संबंधित विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## मोशी दुर्घटना : बचावकार्य युद्धपातळीवर; उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या तातडीच्या सूचना

पुणे (दै. संध्या)



पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मोशी कचरा डेपो येथे सुरू असलेल्या बांधकामादरम्यान डोंगराचा काही भाग कोसळून झालेल्या दुर्घटनेनंतर बचावकार्य युद्धपातळीवर सुरू करण्यात आले आहे. घटनेची माहिती मिळताच स्थानिक पोलीस, अग्निशमन दल, लष्कर, राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल (NDRF) तसेच अन्य बचाव पथके घटनास्थळी दाखल होऊन बचाव व मदतकार्य सुरू केले आहे. या दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी मदत व पुनर्वसन विभागाच्या अपर मुख्य सचिव विनिता वेद सिंगल, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त विजयकुमार सूर्यवंशी तसेच पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांच्याशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधून बचाव व मदतकार्य युद्धपातळीवर राबविण्याच्या सूचना दिल्या. दुर्घटनेत अडकलेल्या नागरिकांना सुरक्षित बाहेर काढण्यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने कार्य करावे, तसेच जखमींवर तातडीने आणि प्रभावी वैद्यकीय उपचार उपलब्ध करून द्यावेत, असे निर्देश त्यांनी दिले आहेत. उपमुख्यमंत्र्यांच्या निर्देशानुसार एनडीआरएफचे पथक घटनास्थळी दाखल होऊन बचावकार्य सुरू आहे. प्रशासनाकडून परिस्थितीवर सातत्याने लक्ष ठेवण्यात येत असून सर्व संबंधित यंत्रणा समन्वयाने कार्यरत आहेत.

# संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यानिमित्त १० ते १५ जुलैदरम्यान; पुणे ग्रामीणमध्ये वाहतूक बदल : जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश

पुणे (दै. संध्या)

श्री संत ज्ञानेश्वर महाराज यांची पालखी सोहळा सन २०२६ हा १३ जुलै रोजी जेजुरी मुक्काम १४ जुलै रोजी वाल्हा मुक्काम व १५ जुलै रोजी निरा येथे विसाव्यासाठी थांवणार आहे. सदर पालखी पायीबारी सोहळ्यात अंदाजे ७ ते ८ लाख भाविक हे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ९६५ पुणे ते पंढरपुर या मार्गाने पायी चालत असतात. तसेच सदर पालखी सोहळ्यामध्ये दिंड्याची वाहने मोठ्या प्रमाणावर असतात. त्यामुळे पालखी सोहळा कालावधीत वाहतुक कोंडी होवू नये व पालखी सोहळ्यास अडथळा निर्माण होवु नये याकरीता जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी पुणे जितेंद्र डूडी यांनी मोटार वाहन कायदा १९८८ चे कलम ११५ मधील तरतूदीनुसार व शासन गृह विभागाचे दि.१९/०५/१९९० चे अधिसुचनेनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकाराने श्री संत ज्ञानेश्वर महाराज सोहळा सन २०२६, चे अनुषंगाने वाहतुक पर्यायी मार्गाने वळविणेबाबत खालील प्रमाणे वाहतुकीमध्ये बदल करुन पर्यायी मार्गाने वाहतुक वळविण्याचे आदेश दिले आहेत.

जेजुरी पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीणः बेलसर फाटा:- अ) १० जुलै रोजी रात्री २० ते १३ जुलै रोजी रात्री २० वा या वेळेत बारामती, फलटण, सातरा बाजुकडून येणारी पुणे वाजुकडे जाणारी पालखी व्यतिरिक्त सर्व वाहतुक पुर्णपणे बंद करुन बेलसर फाटा- वाघापुर चौक उरुळी कांचन मार्गे पुणे बाजुकडे वळवावी. (ब) १३ जुलै रोजी सकाळी २० वाजता ते १४ जुलै २०२६ रात्री २० वा.पर्यंत सासवड पुणे, उरुळी मार्गे सातरा, फलटण, लोणंद, बारामती येथे जाणारी पालखी व्यतिरिक्त सर्व वाहतुक पुर्णपणे बंद करुन ती बेलसर - कोथळे-नाझरे-काळा ओढा मार्गे मोरगाव कडे वळविण्यात येत आहे.

मोरगाव चौक जेजुरी: अ) ११जुलै रोजी सकाळी २० वा. ते १४ जुलै रोजीचे दुपारी १५ वा. पर्यंत वाहतुक नियमन करणे. (ब) १४ जुलै रोजी दुपारी १५ वा ते १५ जुलै रोजीचे रात्री ११ वा. सासवड, पुणे, उरुळी मार्गे सातारा, फलटण, लोणंद, बारामती येथे जाणारी पालखी व्यतिरिक्त सर्व वाहतुक पुर्ण पुणे बंद करुन ती मोरगाव- लोणीभापकर कोऱ्हाळे मार्गे फलटणकडे वळविण्यात येत आहे. पारगाव मेमाणे चौक पारगावः अ) दि.११जुलै रोजी सकाळी २० ते १३ जुलै रोजीचे दुपारी १७ वा. पुण्याकडे जाणारी सर्व वाहतुक हि सासवड व जेजुरी बाजुकडे जावु न देता ती उरुळी मार्गे वळविण्यात येत आहे. (ब) १४ जुलै रोजी १५ वा. ते १५ जुलै रोजीचे रात्री ११ वा. सासवड, पुणे, उरुळी मार्ग सातारा, फलटण, लोणंद, बारामती येथे जाणारी पालखी व्यतिरिक्त सर्व वाहतुक पुर्णपणे बंद करुन ती पिसर्वे- सुपा-लोणीभापकर कोऱ्हाळे मार्ग फलटण कडे वळविणेत येत आहे.

छत्रपती शिवाजी चौक निरा: दि.१० जुलै रोजी रात्री २० वा. १५ जुलै रोजी ११ वा. यावेळेत सातारा, फलटण, लोणंद येथुन पुणेकडे जाणेसाठी जेजुरी-सासवड वाजुकडे जाणारी सर्व वाहतुक पुर्ण पुणे बंद करणेत येत आहे व सदरची वाहतुक निरा मोरगाव-सुपा-कडेगाव चौफुला मार्गे पुणे बाजुकडे वळविणेत येत आहे बेलसर गाव कोथळे चौक १० जुलै रोजी रात्री २० ते १४ जुलै रात्री ११ वा. या वेळेत जेजुरी मार्गे सातारा, फलटण, लोणंद बाजुकडे सर्व वाहतुक पुर्णपणे बेद करुन सदरची वाहतुक वेलसर कोथळे चौक-कोथळेगाव-नाझरे काळा ओढा गोगाय किंवा नाझरे- पांडेश्वर मार्गे सुपा मोरगाव अशी वळवावी.

जेऊर फाटा नवीन बायपास : १० जुलै रोजी रात्री ११या ते १५ जुलै रोजी रात्री ११ या वेळेत सातारा, फलटण, लोणंद येथुन पुणे बाजुकडे जाणारी पालखी व्यतिरिक्त सर्व वाहतुक पुर्णपणे बंद करुन ती वाहतुक जेऊर फाटा- मांडकी-वीर- सारोळा मार्ग सातारा हायवे पुणे अशी वळविणेत येत आहे. भोरवाडी फाटा जेजुरीः १४ रोजी दुपारी १५ वा. ते १५ जुलै रोजीचे रात्री ११ वा. सासवड, पुणे, उरुळी मार्ग सातारा, फलटण, लोणंद, बारामती येथे जाणारी पालखी व्यतिरिक्त सर्व वाहतुक पुर्णपणे बंद करुन ती कोळविहीरे मोरगाव रोड-मोरगाव- लोणीभापकर कोऱ्हाळे मार्ग फलटण कडे वळविणेत येत आहे.

# संघर्षाची हृदयस्पर्शी कहाणी

**मुंबई (दै. संध्या) :**

मराठी झी५ वर १० जुलैपासून प्रदर्शित होणारा मूळ मराठी चित्रपट ‘फ्रेम’ प्रेक्षकांसमोर व्यावसायिक जबाबदारी आणि मानवी संवेदनशीलता यांच्यातील संघर्षाची प्रभावी कथा घेऊन येत आहे. दिग्दर्शक विक्रम पटवर्धन यांच्या लेखन-दिग्दर्शनाखाली साकारलेल्या या सामाजिक नाट्यात नागराज मंजुळे, अमेय वाघ, मुग्धा गोडसे आणि अक्षया गुरव यांच्या प्रमुख भूमिका आहेत. पुण्यातील एका वृत्तपत्राच्या वृत्तकक्षाच्या पार्श्वभूमीवर घडणाऱ्या या चित्रपटात अनुभवी छायाचित्र वार्ताहर चंदू पानसरे आणि आदर्शवादी नवोदित सिद्धार्थ देशमुख यांच्या विचारांचा संघर्ष केंद्रस्थानी आहे. "आधी छायाचित्र, मग बाकी सगळं" या भूमिकेवर ठाम असलेला चंदू आणि माणुसकी जपत पत्रकारिता करण्यावर विश्वास ठेवणारा सिद्धार्थ यांच्या प्रवासातून पत्रकारितेतील नैतिक मूल्यांचा वेध घेण्यात आला आहे. कथानकाला कलाटणी देणाऱ्या विनाशकारी भूकंपानंतर मृत्यू, विध्वंस आणि जगण्यासाठी धडपडणाऱ्या लोकांचे वास्तव टिपताना या दोघांसमोर कठीण प्रश्न उभे राहतात. छायाचित्र टिपायचे की मदतीसाठी धावायचे, व्यावसायिक कर्तव्याला प्राधान्य द्यायचे की मानवी मूल्यांना, अशा द्वंद्वातून चित्रपट पुढे सरकतो. संकटाच्या काळात प्रसारमाध्यमांची भूमिका, सत्याचे दस्तावेजीकरण आणि त्यासाठी मोजावी लागणारी भावनिक व नैतिक किंमत यांचे वास्तवदर्शी चित्रण या चित्रपटात करण्यात आले आहे. झी मराठीच्या मुख्य वाहिनी अधिकारी आणि मराठी झी५च्या व्यवसाय प्रमुख व्ही. आर. हेमा यांनी सांगितले की, दर्जेदार आणि विचार करायला लावणाऱ्या मराठी कथा प्रेक्षकांपर्यंत पोहोचवण्याच्या प्रयत्नातील 'फ्रेम' हा महत्त्वाचा टप्पा आहे. मनोरंजनासोबत प्रेरणा देणारा आणि दीर्घकाळ प्रभाव टाकणारा हा चित्रपट असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला. दिग्दर्शक विक्रम पटवर्धन म्हणाले, "'फ्रेम' हा केवळ कॅमेऱ्याच्या नजरेतून नव्हे, तर माणुसकीच्या दृष्टीकोनातून जगाकडे पाहण्याचा प्रयत्न आहे. कर्तव्य आणि करुणा यांपैकी एकाची निवड करण्याची वेळ आल्यावर माणसाची खरी परीक्षा कशी होते, हे या चित्रपटातून मांडले आहे."

नागराज मंजुळे यांनी सांगितले की, चंदू ही पारंपरिक नायकाची व्यक्तिरेखा नसून वास्तवाचे दस्तावेजीकरण करणे हेच आपले कर्तव्य मानणारा तो पत्रकार आहे.




**झी५वरील ‘फ्रेम’ १० जुलैपासून**

## कंगना रणौत ‘जनता की आवाज’ म्हणून दाखल!

पुणे (दै. संध्या) : लॉक अप मधल्या कैद्यांसाठी हा प्रवास सोपा नव्हता, नाही का? जसं तुम्हाला वाटलं तसं त्यांनाही वाटलं होतं की आता ते घरात स्थिरावले आहेत. पण हळूहळू ते या सीझनच्या पहिल्या टर्मिनेशनकडे सरकत आहेत. त्यामुळे त्यांना आता खरंच सज्ज व्हावं लागणार आहे, कारण पुढचा टप्पा अजिबात सोपा नाही. या आठवड्यात कंगना रणौत लॉक अप मध्ये ‘जनता की आवाज’ म्हणून दाखल होणार आहे. ‘जनता की आवाज’ म्हणजे काय, असा प्रश्न पडतोय ना? तर हे कैद्यांना त्यांच्या प्रवासात प्रेक्षकांशी आणखी जवळ आणणारं एक महत्त्वाचं पाऊल आहे. कंगना चांगली बातमी घेऊन येईल की वाईट? ती कैद्यांच्या टर्मिनेशनमध्ये भूमिका बजावेल का? लॉक अप: सच या सज़ा नेटफ्लिक्सवर दररोज रात्री 8 वाजता स्ट्रीम होत आहे.

## फॅन्सची मागणी आणि नेटफ्लिक्सने केली पूर्ण

पुणे (दै. संध्या) : निर्णय आला आहे आणि फॅन्सनी आपला आवाज बुलंद केला आहे! सोशल मीडियावर गाजलेला, प्रेक्षकांना खिळवून ठेवणारा स्फोटक ड्रामा, धक्कादायक ट्विस्ट्स आणि अनफिल्टर्ड ट्रुथ्स मुळे आता लॉक अप: सच या सज़ा आपला डेली रन वाढवत आहे. या आठवड्यापासून ट्रेंडिंग कॅप्टिव्ह रिॲलिटी शो शनिवार ते गुरुवार रात्री 8 वाजता स्ट्रीम होणार आहे. म्हणजेच प्रेक्षकांना दर आठवड्यात एक अतिरिक्त दिवस लॉक अप मध्ये डोकावता येणार आहे. लॉन्चपासून चाहत्यांच्या प्रचंड प्रेमामुळे आणि जबरदस्त प्रतिसादामुळे हा शो रिॲलिटी टीव्ही चाहत्यांसाठी मस्ट-वॉच ठरला आहे. प्रत्येक एपिसोड नवीन चर्चा निर्माण करतो आणि अविस्मरणीय क्षण घेऊन येतो. आता, प्रेक्षकांना पुरेसे वाटत नसल्यामुळे, गुरुवारी एक अतिरिक्त एपिसोडसह ड्रामा आणखी मोठा होणार आहे.

## कंगना रणौतची पुनरागमनातली दाद

पुणे (दै. संध्या) : लॉक अप: सच या सजा मधील नाट्य अधिक तीव्र होत असताना, जजमेंट डे एपिसोडमध्ये कंगना रणौत ‘जनता की आवाज’ म्हणून ज्युरीमध्ये सामील झाली. प्रेक्षकांच्या वतीने आवाज उठवणारी कंगना, कठोर पण न्याय्य जेलर्स फराह खान आणि रितेश देशमुख यांच्यासोबत दिसली. फराह खान आणि रितेश देशमुख यांनी स्पर्धकांना सतत जबाबदार ठरवले आहे आणि कुठलेही खोटे किंवा सबब दुर्लक्षित केलेली नाही. त्यांच्या या दमदार उपस्थितीत कंगनाची एन्ट्री झाल्याने शोची stakes आणखी वाढली. फराह खानच्या खास टफ लव्ह आणि तीक्ष्ण विनोदामुळे कैदी सतत सजग राहिले आहेत.

**जाहीर नोटीस**

**मा. उपविभागीय अधिकारी, उपविभागीय दंडाधिकारी जुन्नर-आंबेगाव यांचे कोर्टात.**

क्र. फौज जन्म-मृत्यू/एसआ/703/25 दिनांक:- 29.6.2026.

नोटीस

अब्दुलसमद दाऊद पटेल शेख, मु.पो. नारायणगाव, ता. जुन्नर, जि पुणे- **अपिलार्थी**

विरुध्द

निबंधक, जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी

ग्राम अधिकारी/मुख्याधिकारी ग्रामपंचायत नारायणगाव - **प्रतिवादी**

जाहीर नोटीस देण्यात येते की, वरील नमुद किरकोळ फौजदारी अर्जदार अब्दुलसमद दाऊद पटेल शेख मु.पो.नारायणगाव, ता. जुन्नर. जि पुणे यांची स्वत: नामे **अब्दुलसमद दाऊद पटेल शेख यांचा जन्म 13.05.1961 रोजी मौजे नारायणगाव, ता. जुन्नर जि. पुणे येथे झालेला आहे.** यांचा जन्म नोंदीचा हुकुम मिळविण्याकरीता अर्जदार यांनी या न्यायालयात जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम, कलम १३(३) प्रमाणे फौजदारी किरकोळ अर्ज नं. 703/25 दिनांक 10.12.2025 रोजी दाखल केलेला आहे. सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची कायदेशीर हरकत असल्यास त्यांनी सदरची जाहीर नोटीस वृतपत्रात प्रसिध्द झाल्यापासुन 15 दिवसांचे आत या न्यायालयात स्वत: अथवा आपले वकिलांमार्फत हजर राहून आपले म्हणने कागदपत्रांसोबत मांडावे. सदर कालावधीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर अर्जास कोणाचीही हरकत नसल्याचे समजून पुढील हुकुम करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दि. 29/6/2026 रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यांनीशी ही जाहीर नोटीस दिली असे.

शिक्का

सही/-
(अर्चना तांबे)
अति. उपविभागीय दंडाधिकारी
जुन्नर- आंबेगाव उपविभाग मंचर (पुणे)

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत श्री. महादेव भाऊसाहेब वाघ यांनी श्री. विकास नामदेव खैरे, श्री. विलास रामदास भोर, श्री. संदीप बबन घाडगे व श्री. जोतीराम संपत वगरे यांचे दि. १८/११/२०२५ रोजी मे. दुय्यम निबंधक, नारायणगाव यांच्या कार्यालयात नोंदणीकृत खरेदीखत दस्त क्र. ६६०७/२०२५ अन्वये खरेदी केलेली आहे.

सदर मिळकतीच्या मालकी साखळीतील पूर्वीचे दि.१५/०५/२०२५ रोजी मे. दुय्यम निबंधक, नारायणगाव यांच्या कार्यालयात नोंदणीकृत खरेदीखत दस्त क्र. २७३५/२०२५ याचे मूळ खरेदीखत, सूची क्र. २ (इंडेक्स-२) तसेच नोंदणी पावती ही श्री. महादेव भाऊसाहेब वाघ यांच्याकडून दि. १८/११/२०२५ रोजी प्रवासादरम्यान कोठेतरी पडून गहाळ झाली आहे. त्याबाबत नारायणगाव पोलीस स्टेशन येथे दि. ०४/०७/२०२६ रोजी गहाळ रजिस्टर क्र. ०२३२/२०२६ अन्वये तक्रार नोंदविण्यात आलेली आहे.

त्यामुळे सदर मिळकतीसंदर्भात कोणत्याही व्यक्ती, संस्था, बँक, वित्तीय संस्था, शासन, निमशासकीय प्राधिकरण अथवा इतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, दावा, हितसंबंध, तारण, बोजा, जप्ती, प्रतिबंध, न्यायालयीन वाद, वारसा हक्क, करार, करारनामा, भाडेहक्क, कब्जा हक्क अथवा सदर मिळकतीशी संबंधित कोणतीही मूळ कागदपत्रे कोणाकडे असल्यास, त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत आवश्यक मूळ कागदपत्रांसह आमच्याशी संपर्क साधून आपल्या हक्कासंबंधीचे लेखी निवेदन व त्यासंबंधीचे पुरावे सादर करावेत.

विहित मुदतीत कोणताही दावा, हरकत किंवा आक्षेप प्राप्त न झाल्यास, सदर मिळकतीवर कोणत्याही व्यक्ती, संस्था, बँक, वित्तीय संस्था, शासन, निमशासकीय प्राधिकरण अथवा इतर कोणाचाही कोणताही हक्क, दावा, हितसंबंध, तारण, बोजा, जप्ती, प्रतिबंध अथवा इतर कोणताही अडथळा अस्तित्वात नाही किंवा असल्यास संबंधितांनी तो स्वेच्छेने व जाणीवपूर्वक त्याग केलेला आहे, असे गृहीत धरून सदर मिळकतीबाबत पुढील सर्व व्यवहार करण्यात येतील.

त्यानंतर सदर मिळकतीसंदर्भात कोणत्याही व्यक्ती, संस्था, बँक, वित्तीय संस्था, शासन, निमशासकीय प्राधिकरण अथवा इतर कोणत्याही प्राधिकरणाकडून करण्यात येणारा कोणताही दावा, हरकत किंवा आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही. तसेच, अशा कोणत्याही दावा, हरकत किंवा वादामुळे उद्भवणाऱ्या सर्व कायदेशीर परिणामांची, खर्चाची व जबाबदारी संबंधित दावा करणाऱ्या व्यक्ती अथवा संस्थेवर राहील.

**परिशिष्ट**

तुकडी पुणे, पोट तुकडी जुन्नर, येथील जिल्हा परिषद पुणे, पंचायत समिती जुन्नर येथील मे दुय्यम निबंधक सो. जुन्नर, नारायणगाव यांचे हद्दीतील महसुली गाव मौजे नारायणगाव येथील बिनशेती सर्व्हे नं. २८५/१ यांसी क्षेत्र ०० हे. १३.७० आर व ०० हे. ०.०१ पोट खराबा यासह एकूण क्षेत्र ०० हे १४.७० आर यांसी आकार ०३ रु. ७५ पै. या मिळकती वर बांधलेल्या लँडमार्क ट्रेड सेंटर या गृहप्रकल्पातील तळ मजल्यावरील २१.२९ चौ.मी. / २३० चौ.फु. (१० फुट १० इंच रुंद x २१ फुट २ इंच लांब) चटई क्षेत्राचा अनिवासी गाळा / वेश्म क्र. G-04 या निवासी यांसी चर्तुसिमा (खरेदीखताप्रमाणे)

पूर्वेस: कोल्हेमळा रोड — दक्षिणेस: अनिवासी गाळा नं. जी. ०५
पश्चिमेस: अनिवासी गाळा नं. जी. ०६ — उत्तरेस: अनिवासी गाळा नं. जी.०३

शिक्का

**ॲड. श्रीनाथ सदाशिव काळे**
**ॲडव्होकेट**
**बी.एस. एल, एलएल.बी.**
**ऑफिस नं. २०६, दुसरा मजला, धर्मराज प्लाझा, पुणे-नाशिक हायवे, नारायणगाव, ता. जुन्नर, जि. पुणे ४१०५०४**
**मोबाईल नं. ७४२०८५४७९४**

# मनुष्यबळाच्या समस्यांवर राज्यव्यापी सर्वेक्षण

**'व्हाईट टी-शर्ट रिव्होल्युशन'चा 'कॉर्पोरेट न्याय' उपक्रम**

**पुणे (दै. संध्या) :**

माहिती तंत्रज्ञान आणि कॉर्पोरेट क्षेत्रातील कर्मचाऱ्यांच्या वाढत्या समस्या, नोकरकपात, रोजगाराची असुरक्षितता तसेच मानसिक, आर्थिक आणि सामाजिक अडचणींचा अभ्यास करण्यासाठी 'व्हाईट टी-शर्ट रिव्होल्युशन' या सामाजिक संस्थेने राज्यव्यापी सर्वेक्षण अभियान हाती घेतले आहे. या सर्वेक्षणाच्या माध्यमातून आयटी आणि कॉर्पोरेट क्षेत्रातील कर्मचाऱ्यांच्या समस्या जाणून घेऊन त्यावर धोरणात्मक उपाययोजना सुचविण्यासाठी 'कॉर्पोरेट न्याय' हा उपक्रम राबविण्यात येणार असल्याची घोषणा बुधवारी झालेल्या पत्रकार परिषदेत करण्यात आली.




यावेळी सामाजिक कार्यकर्ते व ज्येष्ठ काँग्रेस नेते गोपाळदादा तिवारी म्हणाले की, जगातील प्रगत देशांकडून भारतीय सॉफ्टवेअर अभियंत्यांची संख्या कमी करण्याच्या धोरणाचा परिणाम देशातील माहिती तंत्रज्ञान क्षेत्रावर होत आहे. हजारो कुटुंबांचा आधार असलेल्या या कर्मचाऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी सुरू करण्यात आलेला हा उपक्रम स्वागतार्ह असून, राज्यभरातील कर्मचाऱ्यांनी क्यूआर संकेताद्वारे उपलब्ध असलेला ऑनलाइन सर्वेक्षण अर्ज भरून आपल्या समस्या मांडाव्यात, असे आवाहन त्यांनी केले.

संस्थेचे संस्थापक ऋत्विक धनवट यांनी उपक्रमाची माहिती देताना सांगितले की, माहिती तंत्रज्ञान आणि कॉर्पोरेट क्षेत्रातील कर्मचाऱ्यांच्या सामाजिक, कौटुंबिक, आर्थिक, आरोग्यविषयक तसेच कामाच्या ठिकाणी येणाऱ्या अडचणींचा अभ्यास करून त्यावरील उपायांसाठी हे सर्वेक्षण करण्यात येणार आहे. काही महिन्यांपूर्वी मुठा नदीपात्रात स्वच्छता अभियान राबविल्यानंतर आता कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांसाठी राज्यव्यापी लोकचळवळ उभारण्याचा संस्थेचा प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले.

**महानिर्मिती**
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

**इ-निविदा सूचना**
**क्र.ना.औ.वि.कें/२०२६-२७/१३**

| अ. क्र. | निविदा क्र./ विभाग | निविदा तपशील | अंदाजे रक्कम (रु.) इसारा रक्कम (रु) |
|---|---|---|---|
| १. | ३००००६९९७१ / बीएम | संच क्र.४ सीओएच दरम्यान बॉयलर टयुबच्या वेल्ड जॉईटसच्या फेज्ड ॲरे अल्ट्रॉसॉनिक टेस्ट (पीएयुटी) साठी कामाचा करार. | ३,४२,९००/- / ६,९३०/- |
| २. | ३००००६९९७५ / बीएम | संच क्र.४ सीओएच दरम्यान डक्ट प्लेटस बदलण्याचे काम, कोळसा मिलसच्या गरम आणि थंड हवेच्या नलिका पॅचिंग/ वेल्डिंगव्दारे दुरूस्ती करणे. | ५,३९,४९४/- / ८,९००/- |
| ३. | ३००००६९९८१ / बीएम | संच क्र.४ सीओएच दरम्यान २१० मेगावॅट बॉयलरच्या आरएलए अभ्यास साहाय्यासाठी कामाचा करार. | ४,४५,३३०/- / ७,९६०/- |
| ४. | ३००००६९९८६ / बीएम | संच क्र.४ सीओएच दरम्यान एचपी वेल्ड जॉइंटस्च्या रेडियोग्राफिक तपासणीसाठी वार्षिक कामाचा करार. | ६,६१,६००/- / १०,१२०/- |
| ५. | ३००००६९९७३ / ओडीपी | संच क्र.४ सीओएच दरम्यान कूलिंग टॉवर ३अ आणि ३ब पॉन्ड क्षेत्रातून साफसफाई/ राख काढण्यासाठी कामाचा करार. | ६,७५,७५८/- / १०,३००/- |
| ६. | ३००००६९९७६ / ओडीपी | संच क्र.४ सीओएच दरम्यान ईएसपीच्या अंर्तगत व बाहय दुरूस्तीचे काम. | २७,६१,९५५/- / ३१,१५०/- |
| ७. | ३००००६९९७७ / ईएम | एनटीपीएस कॉलनी परिसरातील क्वॉर्टरमधील इलेक्ट्रीकल मेंटेनन्सच्या कामांमध्ये दैनंदिन दोष दूर करण्यासाठी वार्षिक कामाचा करार | ७,७८,६९०/- / ११,३००/- |
| ८. | ३००००६९९७८ / टीएम | टीएम २ येथिल डी.जी. सेट व फायर फाईटिंग पंपाच्या कमिन्स डिझेल इंजिन सर्व्हिसिंगसाठी वार्षिक कंत्राट. | १,६५,३८४/- / ५,०००/- |
| ९. | ३००००६९९८३ / ओडीपी | संच क्र.४ सीओएच दरम्यान एसीबी (एस्बेस्टॉस सिमेंट बोर्ड) ड्रिफ्ट एलिमिनेटर आणि कूलिंग टॉवर्सचे काँक्रीट स्पेसर बदलण्यासाठी कामाचे कंत्राट. | ३६,७१,३७३/- / ४०,२५०/- |
| १०. | ३००००६९९९४ / आय ॲन्ड सी | संच क्र. ४ च्या ओव्हरहॉल दरम्यान आवश्यक असलेल्या HP/LP बायपास आणि PRDS प्रणालीच्या सुट्या भागांचा पुरवठा. | २४,५०,९७४/- / २८,०१०/- |
| ११. | ३००००६९९५१ / टीएम | इंस्ट्रुमेंट एअर कॉम्प्रेसर चे इंटरकूलर आणि आफ्टरकूलर टयूब नेस्टचा पुरवठा (मॉडेल- 2HA2TERT). | ९,४५,०००/- / १२,९५०/- |
| १२. | ३००००६९९४० / सिव्हिल | सिव्हिल देखभाल विभागात ऑटो रिक्षा सेवा पुरवणे. | ३,९९,७०१/- / ७,५००/- |
| १३. | ३००००७०१७४ / बीएम | संच क्र.४ सीओएच दरम्यान पेंट हाऊस, डॉग हाऊस, कॅट हाऊस आणि एअर प्री हिटर टॉप गाईड बेअरिंग एरियामध्ये एअरसील चा पुरवठा आणि इनस्टॉलेशन. | ४६,८४,७६६/- / ५०,३५०/- |
| १४.. | ३००००७०१७६ / सीएचपी | सीएचपी मध्ये एलटी मोटर्सचे रिवायडींग/दुरूस्तीचे कामाचा करार (आवश्यकतेनुसार). | २०,०४,७७५/- / २३,५५०/- |
| १५. | ३००००७०१७७ / ईएम | एनटीपीएस येथे रेक्टिफफॉर्मर्स हलवणे/ उचलणे/ खाली उतरवणे यासाठी वार्षिक कामाचा करार (आवश्यकतेनुसार). | ११,६९,४५४/- / १५,२००/- |
| १६.. | ३००००७०२४० / बीएम | संच क्र.४ सीओएच दुरूस्तीच्या वेळी आरएफईटी तंत्राचा वापर करून बॉयलर ट्यूब्सचे इन्सिटू गंज मॅपिंग. | २१,२९,०२६/- / २४,८००/- |
| १७. | ३००००७०२७९ / ओएस | संच क्र. ५ आरसीएफ, इनलेट पाईप व बंकर नेकमधील चोक अप काढण्यासाठी कामाचे कंत्राट. | ३३,६८,५४४/- / ३७,१९०/- |
| १८. | ३००००७०४५४ / ओडीपी | युनिट ३,४,५ येथिल सीटी फॅन्सची दैनंदिन प्रतिबंधात्मक देखभाल, ब्रेकडाउन दुरूस्ती आणि नियतकालिक दुरूस्ती करून त्यांची कार्यक्षमता टिकवून ठेवण्यासाठी वार्षिक कामाचे कंत्राट. | २७,२२,२८१/- / ३०,७२५/- |

नविन विक्रेते/ नोंदणी नसलेल्या विक्रेत्यांना विनंती आहे की त्यांनी त्यांच्या कंपनीची ई-टेंडरिंगसाठी नोंदणी करावी. अधिक तपशीलांसाठी वेबसाइटवर लॉग इन करा.

प्रत्येक निविदा किंमत: रु. ११८०/-, अधिक माहिती व अद्यतनांसाठी कृपया https://eprocurement.mahagenco.in येथे भेट द्यावी.

मुख्य अभियंता, नाशिक
औ.वि.केंद्र, एकलहरे

**जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्रमांक निविदा/०४१७/प्र. क्र.२४७/मोप्र-१ दिनांक १८/१०/२०२३.**
**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता,**
**द्वार निर्मिती विभाग अ, यांत्रिकी भवन, दुसरा मजला, दापोडी, पुणे - ४११ ०१२.**
**ई-मेल: - eegmd_pn@yahoo.in दुरध्वनी क्रमांकः- (०२०)- २९५२११६०**
**ई-निविदा सूचना क्रमांक ०४ सन २०२६- २०२७.**

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, द्वार निर्मिती विभाग अ, दापोडी, पुणे-१२, जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम निविदाकारांकडून खालील कामाकरीता ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहे.

निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ **https://mahatenders.gov.in** येथून डाऊनलोड करण्यांत यावीत, सविस्तर निविदा सूचना व ई-निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे. निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, द्वार निर्मिती विभाग अ, दापोडी, पुणे-१२ यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास **https://mahatenders.gov.in** या संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

| अ. क्र. | कामाचे नांव | जिल्हा | निविदेची किंमत रुपये |
|---|---|---|---|
| ०१. | डिंभे धरणावरील वक्रव्दारे १२ X ८ मी-०५ नग, उच्चालक ४२ मे. टन क्षमता आपत्कालिन व्दारे (पी.ओ.इ.जी) ४.६८ X २.५ मी ०१ नग, व त्यांचे उच्चालक इ. ची दुरूस्ती करणे, विद्युत जनित्र दुरूस्ती करणे व अनुषंगिक विद्युत यांत्रिकी कामे करणे. | पुणे | रू. १,३७,२०,९५८/- |

**ई-निविदा उपलब्ध कालावधी** :- दिनांक ०९/०७/२०२६ ते दिनांक १७/०७/२०२६.
**ई-निविदा उघडण्याचा दिनांक** :- दिनांक २१/०७/२०२६

**महाराष्ट्र शासन, जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण/१२१७/प्र.क्र.११४/१७)/यांत्रिकी दिनांक ०५/०७/२०१८ आणि शासन परिपत्रक क्रमांकः संकीर्ण ०५२३/(प्र.क्र.२५/२०२३)/यांत्रिकी दिनांक १४/१०/२०२४. शासन निर्णय निविदा ४१७/प्र.क्र.२४७/१७ दि. १८/१०/२०२३ अन्वये करारनाम्यात अनुक्रमे पश्चात अर्हता निकष व इतर सर्व अटी लागू राहतील.**

**खालील संकेतस्थळावर ई-निविदा बाबत सर्व माहिती उपलब्ध आहे.**

http://mahatenders.gov.in. (सदर निविदासूचनेमध्ये काही बदल होत असल्यास सदर वेबसाईटवर कळविण्यात येईल.). निविदा सादर करणारे कंत्राटदार जलसंपदा विभागातील यात्रिकी संघटनेकडे पंजीकृत असणे आवश्यक नाही.

**जावक क्र./द्वा.नि.वि.अ/लेखा-२/निविदा/१२३५ /सन २०२६.**
**कार्यकारी अभियंता, द्वार निर्मिती विभाग अ, दापोडी, पुणे-१२, यांचे कार्यालय. दिनांक - २९/०६/२०२६**
**आरओसी-2026-27/क्र-5/C१५६६**

**सही/-**
**कार्यकारी अभियंता**
**द्वार निर्मिती विभाग अ. दापोडी, पुणे-१२**

# एचडीएफसी अर्गो करणार बिमा योजनेची अंमलबजावणी

**नवी दिल्ली (दै. संध्या) :**

एचडीएफसी अर्गो जनरल इन्शुरन्स कंपनी या भारतातील खाजगी क्षेत्रातील आघाडीच्या सर्वसाधारण विमा कंपनीला प्रधान मंत्री फसल बिमा योजना (पीएमएफबीवाय) च्या अंमलबजावणीसाठी प्राधिकृत केले असून ही योजना २०२६ च्या खरीप हंगामातील पिकांसाठी असून अकोला, धुळे, हिंगोली, जळगाव, पुणे सातारा आणि सोलापूर जिल्ह्यांसाठी कर्जधारक आणि कर्ज न घेतलेल्या शेतकऱ्यांसाठी लागू असेल. ही योजना महाराष्ट्र शासनाने योजनेअंतर्गत अधिसूचित केलेल्या खाली नमूद पिकांसाठी संबंधित जिल्ह्यांमध्ये राबविण्यात येईल. सर्व पिके आणि जिल्ह्यांसाठी अंतिम मुदत ३१ जुलै २०२६ आहे. पीएमएफबीवाय योजना शेतकऱ्यांना दुष्काळ, पूर, पावसाने ओढ घेणे, भूस्खलन, चक्रीवादळे, वादळे, गारपीट, पुरस्थिती, कीड, रोग आणि इतर अशा विविध बाह्य जोखमींमुळे होणाऱ्या पीक उत्पादनातील नुकसानीविरुद्ध विमा संरक्षण प्रदान करते.

जेजुरी नगरपरिषद कार्यालय
जावक क्र. जेनपा/कावी/१५३१/२६
दिनांक : ०८/०७/२०२६

**जेजुरी नगरपरिषद, जेजुरी**
**जाहिर निविदा २०२६-२०२७**

जेजुरी नगरपरिषद, जेजुरी ता. पुरंदर जि. पुणे खाली नमुद केलेल्या कर विभागाकडील कामांकरिता अनुभवी मान्यता प्राप्त व शासनाकडुन योग्य त्या वर्गातील ठेकेदारांकडुन सीलबंद निविदा/दरपत्रक मागवित आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | फॉर्म फी | बयाणा रक्कम |
|---|---|---|---|
| १) | जेजुरी नगरपरिषद कार्यालयीन कामकाजाकरिता स्टेशनरी पुरविणे व तद्अनुषंगिक कामे करणे बाबत वार्षिक | ५००/- | २०००/- |

सदरील कामाचे टेंडर फॉर्म/दरपत्रक सुटीचे दिवस सोडुन दिनांक ०९/०७/२०२६. ते १६/०७/२०२६ पर्यंत दुपारी २.०० वाजे पर्यंत स्वीकारल्या जातील त्या नंतर आलेल्या निविदा स्वीकारल्या जाणार नाहित. कामासंबधी अधिक माहिंती जेजुरी नगरपरीषद कार्यालयात कार्यालयीन वेळेत मिळेल.

शिक्का

सही/-
मुख्याधिकारी
जेजुरी नगरपरिषद, जेजुरी

**महावितरण**
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

**ई-निविदा**

कार्यकारी अभियंता, महावितरण, पुणे नगर रोड विभाग, यांनी प्रकाशित केलेल्या निविदा क्र. (EE/NRD/T-02/2026-27) साठी मुदतवाढ करण्यात येत आहे. निविदा दस्तऐवज विक्रीसाठी अंतिम तारीख दिनांक १४.०७.२०२६, दुपारी ३ वाजेपर्यंत व निविदा सादर करण्याची अंतिम तारीख दिनांक १४.०७.२०२६, रात्री २३:५५ वाजेपर्यंत असून वरील ई निविदा महावितरणच्या http://www.mahadiscom.in/eTender/etender या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आली आहे.

PRO No.PZ/066 / 2026-27 — कार्यकारी अभियंता (नगर रोड विभाग) पुणे

**जाहीर नोटीस**

**तमाम लोकांस विशेषतः गाव मौजे बेल्हे, ता.जुन्नर, जि.पुणे येथील व आसपासचे सर्व लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. महंमद हुसेन कासम आतार, रा. बेल्हे, जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे यांनी सांगितलेवरुन व पुरविलेल्या माहितीनुसार जाहिरपणे कळविण्यात येते की, गाव मौजे बेल्हे, ता.जुन्नर, जि.पुणे येथील जमिन गट नं. १५० क्षेत्र १ हे ०३ आर पोटखराबा २० आर पैकी ५१.५० आर पोटखराबा १० आर ही मिळकत आमचे अशिलांची मालकी वहिवाटीची आहे व ५१.५० आर पोटखराबा १० आर ही मिळकत आमचे अशिल यांचे चुलते अन्वर महंमद आतार यांचे नावे आहे. असे असताना आमचे अशिल यांचे चुलते अन्वर आतार यांनी जुन्नर येथील दिवाणी न्यायालयात रे.मु.नं. २४५/२०१७ निरंतर मनाईसाठी व जाहिरठरावासाठी दाखल केलेला असुन तो अद्यापपर्यंत प्रलंबित आहे. असे असताना आमचे अशिल यांचे चुलते अन्वर महंमद आतार हे सदर मिळकत विक्री करण्याची भाषा करत आहे. अद्यापपर्यंत आमचे अशिल व अन्वर आतार यांचे वादाचा निवाडा झालेला नाही तसेच कोर्टात दावा प्रलंबित असल्यामुळे कोणीही सदर मिळकत खरेदी, दान, गहाण, विक्री, लिज, वुईल, साठेखत, गहाणखत, मुखत्यारपत्र अथवा कोणताही हस्तांतरक्षम दस्त करण्याचा प्रयत्न करु नये सदर मिळकतीचे हस्तांतर केल्यास ते आमचे अशिल यांच्यावर बंधनकारक राहणार नाही, कोणाचीही फसवणुक होऊ नये म्हणुन आमचे अशिलांना मुद्दामहून सदरची नोटीस प्रसिध्द करणे भाग झाले आहे.**

**येणेप्रमाणे जाहिर नोटीस**
**ता.७/७/२०२६**

**नोटीस देणार तर्फे ॲडव्होकेट**
**शरीफ रफीक कोयते**
**ऑफीस : राहील कॉम्प्लेक्स, ऑफीस नं. ११२, पहिला मजला, नेहरूबाजार पेठ, जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे ४१० ५०२**
*** निवास : बादशाह तलाव, ता. जुन्नर, जि. पुणे - ४१० ५०२**
**मोबाईल नं. ९८६०१४८०७७**

**जाहीर नोटीस**

परिशीष्ट

मिळकतींचे वर्णनः- तु. व जि.प.पुणे, पोट तुकडी तालुका जुन्नर, पं.स. जुन्नर व मे. दुय्यम निबंधक सो. जुन्नर तसेच गाव मौजे पिंपळगाव तर्फे नारायणगाव येथिल शेतजमिन मिळकती खालीलप्रमाणे,


| खाते क्र. | गट नं | क्षेत्र हे. आर | आकार रू. पै |
|---|---|---|---|
| 106 | 150 | 0. 30.00 / पो.ख 0. 01.00 / एकुण 0. 31.00 | 1. 10 |
| | 151 | 0. 20.00 / पो.ख 0. 00.67 / एकुण 0. 20.67 | 0.73 |
| | 163/1 | 0. 28.00 | 1.30 |
| | 286/1 | 2. 40.00 / पो.ख 0. 09.00 / एकुण 2. 49.00 | 5. 29 |

वर परिशिष्ठात नमुद मिळकतीबाबत आमच्या अशिल श्री. ज्ञानेश्वर तुकाराम चव्हाण यांची सामाईक मालकीची असून सदर मिळकतीबाबत कोणीही या मिळकतींचे अंतर्गत कुटुंबातील इतर भावंडांसोबत वाटप होई पावेतो व कागदोपत्री हिस्से पृथ्थक होई पावेतो कोणीही वर नमुद मिळकतींबाबत गहाण, दान, लीज, लिन, बक्षिस, खरेदी-विकी, साठेखत इत्यादी स्वरूपाचे अथवा इतर कोणत्याही प्रकारचे हक्क व अधिकार निर्माण होतील असे दस्त ऐवज अस्तित्वात आणू नये. तसेच याच गटातील सहधारक भावंडे जर तो हिस्सा विकणार असतील तर तो हिस्सा नोटीस देणार हे चालु बाजार भावाप्रमाणे घेण्यास तयार असल्यामुळे इतर कोणाचीही फसगत होवू नये म्हणून सदर मिळकतीबाबत कोणतेही व्यवहार तिईत इसमांनी अगर संस्थांनी अस्तित्वात आणू नये. याकरीता सदरची नोटीस आजरोजी देत आहेत.

जुन्नर.
दि. 07/06/2026

येणेप्रमाणे जाहिर नोटीस असे.
**श्री. सचिन यशवंत चव्हाण**
**ॲडव्होकेट**
**बी.कॉम. एल.एल.बी.डी.सी.एल.**
**पत्ता :- मु. सुराळे, पो. खानगाव ता. जुन्नर, जि. पुणे 410 502.**
**मो.नं. 9960999060**

## थोडक्यात पण महत्वाचे...




### पिंपळे सौदागरमधील बहुतांश भागांचा वीजपुरवठा पूर्ववत

पिंपरी (दैनिक संध्या) : गेल्या दोन-तीन दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे पिंपळे सौदागर परिसरासह शहरातील अनेक भागांमध्ये पाणी साचल्याने वीजपुरवठा विस्कळीत झाला होता. मात्र, प्रशासन आणि महावितरणच्या तातडीच्या प्रयत्नांमुळे पिंपळे सौदागरमधील बहुतांश भागांतील वीजपुरवठा पूर्ववत करण्यात आला असून उर्वरित काही भागांमध्ये युद्धपातळीवर दुरुस्तीचे काम सुरू असल्याची माहिती भाजपा शहराध्यक्ष तथा नगरसेवक शत्रुघ्न काटे यांनी दिली आहे.मिळालेल्या माहितीनुसार, व्हेंटेज सोसायटी, पीस व्हॅली सोसायटी, साई श्री सोसायटी आणि शिवराज नगर परिसरात तांत्रिक बिघाड तसेच पाणी साचल्यामुळे वीजपुरवठा अद्याप खंडित आहे. या भागांतील वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी महावितरणचे अधिकारी आणि कर्मचारी सातत्याने प्रयत्न करत आहेत. स्थानिक लोकप्रतिनिधींनी महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संपर्क साधून परिस्थितीचा आढावा घेतला असून, वीजपुरवठा लवकरात लवकर पूर्ववत करण्यासाठी आवश्यक उपाययोजना सुरू असल्याचे सांगितले आहे. पावसाचा जोर आणि सुरक्षेच्या कारणास्तव दुरुस्तीच्या कामाला काहीसा वेळ लागत असला तरी वीजपुरवठा लवकरच सुरळीत होईल, असा विश्वास शत्रुघ्न काटे यांनी व्यक्त केला आहे. दरम्यान, नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता संयम बाळगावा आणि प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन देखील शत्रुघ्न काटे यांनी केले आहे. आपत्कालीन परिस्थितीत मदतीसाठी प्रशासन आणि लोकप्रतिनिधी तत्पर असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले आहे.




### महावितरणच्या डीपी बॉक्सचा करंट लागून गाईचा मृत्यू; दोषींवर कारवाईची मागणी

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी गावातील तपोवन मंदिर रोड परिसरात महावितरणच्या डीपी बॉक्सचा करंट लागून एका गाईचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना मंगळवारी (दि.७ जुलै) दुपारी सुमारे १२.१५ वाजण्याच्या सुमारास घडली. गणेश मंदिराजवळ, किर्ती हॉस्पिटल शेजारी ही घटना घडल्याने परिसरात संताप व्यक्त केला जात आहे. स्थानिकांच्या माहितीनुसार, महावितरण कंपनीच्या डीपी बॉक्समध्ये मोठ्या प्रमाणावर विद्युत प्रवाह असल्याने गाईला करंटचा जबरदस्त धक्का बसला. करंट लागल्यानंतर गाय काही फूट दूर फेकली गेली आणि तिचा जागीच मृत्यू झाला. या घटनेनंतर परिसरातील नागरिकांनी महावितरणच्या सुरक्षाव्यवस्थेवर गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. दरम्यान, यापूर्वीही पिंपरी गावातील वैभवनगर येथे १२ मे २०२५ रोजी अशाच प्रकारची घटना घडून गाईचा मृत्यू झाला होता. त्या प्रकरणात संबंधित अधिकाऱ्यांवर एफआयआर दाखल करण्यासाठी अद्याप पाठपुरावा सुरू असल्याचे सांगण्यात आले. या नव्या घटनेबाबत युवा सामाजिक कार्यकर्ते यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. “महावितरणच्या निष्काळजीपणामुळे मुक्या जनावराचा बळी गेला आहे. या घटनेस जबाबदार अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर तातडीने कायदेशीर कारवाई करण्यात यावी. वैभवनगर आणि किर्ती हॉस्पिटल परिसरातील दोन्ही प्रकरणांमध्ये दोषींवर कारवाई होईपर्यंत पाठपुरावा सुरू ठेवणार,” असे त्यांनी म्हटले आहे. या घटनेची चौकशी करून जबाबदारांवर कठोर कारवाई करण्याची मागणी स्थानिक नागरिक आणि प्राणीप्रेमींकडून करण्यात येत आहे.

### पिंपरी-चिंचवडमधील पूरपरिस्थितीवर तातडीची आढावा बैठक

पिंपरी (दैनिक संध्या) : गेल्या काही दिवसांपासून झालेल्या मुसळधार पावसामुळे पिंपरी-चिंचवड शहरातील अनेक भागांमध्ये पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. सखल भागांमध्ये मोठ्या प्रमाणावर पाणी साचल्याने नागरिकांना विविध अडचणींचा सामना करावा लागत असल्याच्या पार्श्वभूमीवर आमदार शंकर जगताप यांनी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त व संबंधित विभागांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसमवेत तातडीची आढावा बैठक घेतली. या बैठकीस सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे, स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे, उपमहापौर शर्मिला बाबर तसेच नगरसेवक व पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी आमदार शंकर जगताप यांनी शहरातील पूरग्रस्त व पाणी साचणाऱ्या भागांचा सविस्तर आढावा घेत प्रशासनाला तात्पुरत्या उपाययोजनांऐवजी कायमस्वरूपी तोडगा काढण्याचे निर्देश दिले. शहरातील सर्व पूरप्रवण ‘हॉटस्पॉट्स’चे प्रत्यक्ष सर्वेक्षण करून पावसाच्या पाण्याचा जलद निचरा होण्यासाठी प्रभावी उपाययोजना युद्धपातळीवर राबविण्याचे आदेश देण्यात आले. तसेच, ज्या ठिकाणी विद्यमान पाइपलाइनची क्षमता अपुरी पडत आहे, त्या ठिकाणी भविष्यात ‘पाईप टू बॉक्स कल्व्हर्ट’ पद्धतीने नाल्यांची रचना करण्याचा प्रस्ताव तयार करून त्याची टप्प्याटप्प्याने अंमलबजावणी करण्याचे निर्देश देण्यात आले. वाढती लोकसंख्या आणि वेगाने होणारे शहरीकरण लक्षात घेऊन पुढील ३० वर्षांचा विचार करून सांडपाणी व पावसाळी पाण्याच्या निचऱ्यासाठी आधुनिक ‘इन्फ्रास्ट्रक्चर मास्टरप्लान’ तयार करण्यावरही भर देण्यात आला. शहरातील जुन्या नाल्यांचे पुनरुज्जीवन, नैसर्गिक जलप्रवाहातील अडथळे दूर करणे आणि निचरा व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी प्रशासनाने ठोस पावले उचलावीत, असे निर्देशही बैठकीत देण्यात आले. भविष्यात अशा आपत्कालीन परिस्थितीत महापालिका, महावितरण, आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा, अग्निशमन दल, पोलीस प्रशासन आणि इतर संबंधित विभागांनी परस्पर समन्वय ठेवून काम करावे, असेही सांगण्यात आले.

### “दादा.. तुम्ही असता तर प्रशासन 24 तासांत जागे झाले असते”, भावनिक साद..!

पिंपरी (दैनिक संध्या) : पावसामुळे घरकुल परिसरात निर्माण झालेल्या गंभीर समस्यांच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते मारुती गणपत जाधव यांनी दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना उद्देशून एक भावनिक व्हिडिओ प्रसिद्ध केला आहे. या व्हिडिओत त्यांनी हातात अजितदादांचा फोटो घेऊन घरकुलमधील नागरिकांच्या व्यथा मांडत प्रशासनाकडे तातडीने लक्ष देण्याची मागणी केली आहे. व्हिडिओमध्ये मारुती जाधव म्हणतात, “अजितदादा, तुम्ही इथे असता तर प्रशासन अवघ्या २४ तासांत खडबडून जागे झाले असते. आज घरकुलमधील नागरिकांना वारंवार पाणी तुंबणे, ड्रेनेजचे पाणी घरात शिरणे आणि विविध समस्यांचा सामना करावा लागत आहे. आम्ही जणू पोरके झाल्यासारखे वाटत आहे. आमच्या वेदना ऐकणारे आणि कायमस्वरूपी न्याय देणारे कोणी तरी हवे आहे.” घरकुल परिसरात दरवर्षी पावसाळ्यात पाणी साचणे, जलनिस्सारण व्यवस्थेचा बोजवारा उडणे आणि नागरिकांच्या घरांमध्ये सांडपाणी शिरण्याच्या घटना घडत असल्याचे जाधव यांनी नमूद केले.

# नाल्यांचा नैसर्गिक प्रवाह रोखणाऱ्यांवर करणार कारवाई

## आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी शहराचा विभागनिहाय आराखडा तयार करणार : आयुक्त डॉ. सूर्यवंशी

पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी चिंचवड शहरात उद्भवणाऱ्या पूरस्थितीसह कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीचा प्रभावीपणे सामना करण्यासाठी शहराच्या भौगोलिक रचनेचा, नैसर्गिक नाल्यांचा, पर्जन्यमानाचा तसेच वातावरणीय बदलांचा सखोल अभ्यास करून विभागनिहाय सर्वंकष आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करण्यात येणार असल्याची माहिती महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिली. तसेच नैसर्गिक नाल्यांचा प्रवाह अडविणारे अतिक्रमण अथवा अडथळे आढळल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

नुकत्याच झालेल्या मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर शहरात निर्माण झालेल्या पूर व पाणी साचण्याच्या परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी चिंचवड येथील ऑटो क्लस्टर येथे आयुक्त डॉ. विजय



सूर्यवंशी यांच्या अध्यक्षतेखाली विशेष बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस आमदार शंकर जगताप, उपमहापौर शर्मिला बाबर, स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे, अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, तृप्ती सांडभोर, विक्रम बगाडे, मुख्य अभियंता संजय कुलकर्णी, प्रमोद ओंभासे, सह शहर अभियंते मनोज सेठिया, अजय सूर्यवंशी, अनिल भालसाकळे, आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, उपायुक्त प्रदीप ठेंगल, अण्णा बोदडे, व्यंकटेश दुर्वास, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, आपत्ती व्यवस्थापन अधिकारी ओमप्रकाश बहिवाल, विशेष अधिकारी किरण गायकवाड यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. यावेळी आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी नुकत्याच उद्भवलेल्या आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांना मदत करण्यासाठी अहोरात्र कार्यरत राहिलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचे कौतुक केले. त्यांनी सांगितले की, अशा प्रत्येक आपत्कालीन परिस्थितीतून प्रशासनाला महत्त्वाचे धडे मिळतात. त्या अनुभवांच्या आधारे भविष्यातील नियोजन अधिक सक्षम करणे आवश्यक आहे. यासाठी प्रत्येक विभागाने आपल्या कार्यपद्धतीतील उणिवा दूर करून समन्वयाने कार्य करावे.

बैठकीत साधनसामग्रीची उपलब्धता, मनुष्यबळाचा समन्वय, क्षेत्रनिहाय प्रतिसाद व्यवस्था आणि पूरनियंत्रण उपाययोजनांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. शहरातील काही भागांमध्ये नैसर्गिक नाल्यांचा प्रवाह अडथळ्यांमुळे बाधित झाल्याने पाणी साचल्याचे निदर्शनास आले. याची गंभीर दखल घेत सर्व नाल्यांची प्रत्यक्ष पाहणी करून अतिक्रमणे तातडीने हटविण्याच्या तसेच एमआयडीसी परिसरातील नाल्यांचा प्रवाह सुरळीत करण्याच्या सूचना आयुक्तांनी संबंधित विभागांना दिल्या. आपत्ती व्यवस्थापन अधिक प्रभावी करण्यासाठी क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी इन्सिडेंट कमांडर तर कार्यकारी अभियंत्यांनी सहाय्यक इन्सिडेंट कमांडर म्हणून जबाबदारी पार पाडावी, असे निर्देश देण्यात आले. प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयाने क्विक रिस्पॉन्स टीम सतत कार्यरत ठेवावी, आपत्ती व्यवस्थापन कक्ष अधिक सक्षमपणे सुरू ठेवावा आणि कोणत्याही परिस्थितीत नागरिकांना तातडीने सेवा व सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशा सूचनाही आयुक्तांनी दिल्या.

यावेळी आमदार शंकर जगताप यांनी शहराच्या वाढत्या नागरीकरणाचा विचार करून दीर्घकालीन आणि वैज्ञानिक दृष्टिकोनातून आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करण्याची आवश्यकता व्यक्त केली. त्यांनी पोलीस प्रशासनाशी समन्वय, नाल्यांची नियमित पाहणी, पावसाचे पाणी साठविण्यासाठी रेन वॉटर हार्वेस्टिंग, मुख्य रस्त्यांवर पाणी साचू नये यासाठी उपाययोजना, स्थलांतरित नागरिकांना आरोग्य सुविधा, मॉकड्रिलद्वारे अधिकारी, कर्मचारी व नागरिकांना प्रशिक्षण तसेच बांधकाम परवानगी देताना नैसर्गिक जलप्रवाहाचा विचार करण्याच्या सूचना दिल्या.

यावेळी पक्षनेते प्रशांत शितोळे यांनी आपत्ती व्यवस्थापनासाठी सर्व घटकांचा सहभाग घेऊन सक्षम यंत्रणा उभारण्याची आवश्यकता व्यक्त केली. स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांनी आपत्कालीन परिस्थितीत प्रशासनाने अधिक तत्परतेने घटनास्थळी पोहोचून नागरिकांना तातडीने मदत उपलब्ध करून द्यावी, असे मत व्यक्त केले.

बैठकीत शहरातील पूरप्रवण भाग, आपत्कालीन प्रतिसाद यंत्रणा, मनुष्यबळाचे नियोजन, यंत्रसामग्रीची उपलब्धता, विभागनिहाय जबाबदाऱ्या आणि दीर्घकालीन उपाययोजनांबाबत सविस्तर आढावा घेण्यात आला. शहरात भविष्यात उद्भवणाऱ्या कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीला अधिक प्रभावीपणे सामोरे जाण्यासाठी समन्वयित, सक्षम आणि सर्वसमावेशक आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा उभारण्यावर बैठकीत भर देण्यात आला.

### पिंपळे सौदागर, रहाटणीतील पूरग्रस्तांना उन्नतीचा मदतीचा हात..!

पिंपरी (दै. संध्या)

मागील तीन ते चार दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे पवना नदीच्या पाणीपातळीत मोठी वाढ झाली. त्यामुळे पिंपळे सौदागर आणि रहाटणी परिसरातील अनेक घरांमध्ये पाणी शिरले. पूराचा धोका वाढल्याने अनेक कुटुंबांना सुरक्षितस्थळी हलविले. रहाटणी येथील महापालिका शाळा क्रमांक ५५ आणि पिंपळे सौदागरमधील महापालिका शाळा क्रमांक ५१ येथे पूरग्रस्तांची राहण्याची व्यवस्था केली. तेथे नागरिकांना उन्नति सोशल फाऊंडेशनच्या वतीने राहण्यासह जेवणाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली.

संकटकाळात उन्नती सोशल फाउंडेशन तातडीने मदतीचा हात पुढे करत आले आहे. फाउंडेशनच्या वतीने पूरग्रस्त नागरिकांना नाश्ता, पिण्याचे स्वच्छ पाणी, ब्लँकेट, बिस्किटे तसेच जीवनावश्यक साहित्याचे वाटप करण्यात आले. यावेळी फाउंडेशनच्या अध्यक्षा तथा नगरसेविका डॉ. कुंदाताई भिसे आणि संस्थापक संजय (आबा) भिसे यांनी मदत केंद्रांना भेट देऊन पूरग्रस्त नागरिकांची विचारपूस केली. त्यांच्या अडचणी जाणून घेत प्रशासनाच्या मदतकार्यातही सहकार्य केले. फाउंडेशनचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि स्वयंसेवकांनी दिवसभर मदतकार्य करून नागरिकांना दिलासा दिला.

### पवना धरणातील पाणीसाठा ७० टक्क्यांवर

- शहरातील १५ टक्के पाणी कपात तात्काळ रद्द करा
- माजी विरोधी पक्षनेते विठ्ठल उर्फ नाना काटे यांची मागणी

पिंपरी (दै. संध्या)

पवना धरणातील पाणीसाठ्यात मोठ्या प्रमाणात वाढ होऊन तो सुमारे ७० टक्क्यांपर्यंत पोहोचला असतानाही पिंपरी-चिंचवड शहरातील पाणीपुरवठ्यावर लागू असलेली १५ टक्के कपात अद्याप कायम असल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर महापालिका आयुक्तांकडे पाणीपुरवठ्यावरील निर्बंध तात्काळ हटवून पूर्ववत पाणीपुरवठा सुरू करण्याची मागणी माजी विरोधी पक्षनेते विठ्ठल उर्फ नाना काटे यांनी केली आली आहे.

काही दिवसांपूर्वी पवना धरणातील पाणीसाठा केवळ १५ टक्क्यांवर आल्याने संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेऊन महानगरपालिकेने शहरातील



पाणीपुरवठ्यात १५ टक्के कपात केली होती. तसेच पाणीपुरवठ्याच्या वेळेतही कपात करून पाण्याचे नियोजन करण्यात आले होते. त्यावेळी नागरिकांनी प्रशासनाच्या निर्णयाला सहकार्य करत पाणी बचतीसाठी सकारात्मक प्रतिसाद दिला होता.

मात्र, गेल्या काही दिवसांपासून धरण परिसरात झालेल्या मुसळधार पावसामुळे पवना धरणातील पाणीसाठ्यात झपाट्याने वाढ झाली असून तो आता ७० टक्क्यांच्या घरात पोहोचला आहे. त्यामुळे शहरावर ओढावलेली पाणीटंचाईची शक्यता मोठ्या प्रमाणात कमी झाली असल्याचे चित्र आहे.


असे असतानाही शहरातील अनेक भागांमध्ये नागरिकांना कमी दाबाने पाणीपुरवठा, कमी कालावधीचा पुरवठा आणि अनियमित वितरण अशा समस्यांना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे पाणीपुरवठ्यावरील १५ टक्के कपात रद्द करून पूर्वीप्रमाणे नियमित वेळेनुसार आणि पुरेशा दाबाने पाणीपुरवठा सुरू करण्याची मागणी नागरिकांकडून जोर धरू लागली आहे. याबाबत महापालिका प्रशासनाने पवना धरणातील सध्याच्या पाणीस्थितीचा आढावा घेऊन शहरातील पाणीपुरवठ्यावरील निर्बंध तात्काळ हटवावेत आणि नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी नाना काटे यांनी केली आहे.

### पर्यटकांना अंमली पदार्थांच्या खोट्या गुन्ह्यात अडकविण्याची धमकी

पिंपरी (दै. संध्या)

पुणे-लोणावळा प्रवासादरम्यान पर्यटकांना अडवून त्यांना अंमली पदार्थांच्या खोट्या गुन्ह्यात अडकविण्याची धमकी देत पाच लाख रुपयांची खंडणी मागितल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी महामार्ग पोलीस दलातील तीन पोलीस कर्मचारी आणि तीन वॉर्डनवर कामशेत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

राज्य महामार्ग पुणे विभागाचे दोन पोलीस शिपाई, एक पोलीस नाईक यांच्यासह तीन वॉर्डन अशा सहा जणांवर कामशेत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. पोलीस कर्मचाऱ्यांना निलंबित केले जाणार असल्याचे राज्य महामार्गचे पोलीस अधिक्षक डॉ. शिवाजी पवार यांनी सांगितले.



**तीन पोलिसांसह सहा जणांवर गुन्हा**

याप्रकरणी पुण्यातील विमाननगर येथील २८ वर्षीय तरुणाने कामशेत पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. कामशेत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ५ जुलै २०२६ रोजी सायंकाळी फिर्यादी हे त्यांचे मित्र, मित्राचे कुटूंबिय यांच्यासह मोटारीने लोणावळ्याकडे फिरायला जात होते. रात्री साडेआठच्या सुमारास कामशेत जवळील ताजे गाव येथे अंबर दिवा असलेल्या मोटारीमधील पोलिसांचा गणवेश परिधान केलेल्या सहा पोलिसांनी त्यांची मोटार तपासणीच्या नावाखाली अडवली. ‘आम्ही महामार्ग वाहतूक पोलीस आहोत. तुमच्या मोटारीतील गांजा, अंमली पदार्थ काढून द्या, नाही तर आम्ही तपासणी केल्यावर तुमच्यावर कारवाई करावी लागेल’, अशी धमकी दिली. फिर्यादीच्या मित्राकडे सिगारेटचे पाकीट सापडले. या पाकिटावरून पोलीस कारवाई नको असेल तर पाच लाख रुपयांची मागणी केली. पोलिसांनी या सर्वांना पैसे देण्यासाठी तळेगाव दाभाडे येथील एका एटीएम केंद्रावर नेले. यावेळी फिर्यादीने पोलिसांशी संपर्क करण्याचा प्रयत्न केला. ही बाब त्यांच्या निदर्शनास आली. त्यानंतर फिर्यादी आणि त्यांच्या सहकाऱ्यांना आहे तिथेच सोडून पोलिसांनी तेथून त्यांच्या मोटारीतून पलायन केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. कामशेत पोलीस ठाण्यातील सहायक पोलीस निरीक्षक आकाश पवार पुढील तपास करीत आहेत.

### संतप्त चिखली घरकुलवासीयांचा स्पाईन रोडवर रस्ता रोको



चिखली (दै. संध्या)

पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे चिखली घरकुल परिसरातील नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. गेल्या दोन दिवसांपासून साचलेल्या पावसाच्या पाण्याचा निचरा न झाल्याने संतप्त नागरिकांनी भक्ती-शक्ती चौक ते खडी मशीन चौक या स्पाईन रोडवर रस्ता रोको आंदोलन सुरू केले. दोन दिवसांपासून साचलेल्या पावसाच्या पाण्यामुळे घरकुल परिसरातील नागरिकांचे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले असून ये-जा करणेही कठीण झाले आहे. अनेक वेळा तक्रारी करूनही प्रशासनाने दखल घेतली नसल्याचा आरोप आंदोलकांनी केला. याआंदोलनामुळे स्पाईन रोडवरील वाहतुकीवर परिणाम झाला असून दोन्ही बाजूंना वाहनांच्या रांगा लागल्या आहेत. नागरिकांनी तातडीने पाणी निचऱ्याची व्यवस्था करून कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

# पाणी तुंबण्याच्या समस्येवर कायमस्वरूपी उपाययोजनांची गरज

## नैसर्गिक जलप्रवाहांचे संवर्धन करण्याचे भाऊसाहेब भोईर यांचे आवाहन

पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी चिंचवड शहरात अल्पकालीन पाऊस झाला तरी अनेक प्रमुख रस्ते, चौक, महामार्ग आणि निवासी भागांमध्ये मोठ्या प्रमाणावर पाणी साचत असल्याने नागरिकांना दरवर्षी त्रास सहन करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर यांनी नैसर्गिक जलप्रवाह, नाले-ओढे आणि पाणी मुरण्याच्या व्यवस्थेचे संवर्धन करून पावसाळी पाणी तुंबण्याच्या समस्येवर कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

भाऊसाहेब भोईर यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, शहरातील पाणी तुंबण्याची समस्या केवळ अतिवृष्टीमुळे निर्माण




होत नसून नैसर्गिक जलमार्गांवरील अतिक्रमणे, वाढते काँक्रीटीकरण, पेव्हिंग ब्लॉकचा अतिवापर आणि अनियंत्रित शहरीकरण यामुळे ती अधिक गंभीर बनत आहे. पूर्वी रस्त्यांच्या कडेला असलेले मातीचे चर, नैसर्गिक नाले, ओढे आणि खुल्या जागा पावसाचे पाणी वाहून नेण्यास व जमिनीत मुरविण्यास मदत करत होत्या. मात्र या नैसर्गिक व्यवस्थेचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्याने पावसाचे पाणी थेट रस्त्यावर साचत असल्याचे त्यांनी नमूद केले.

शहरातील अनेक भागांमध्ये मोकळी माती शिल्लक नसल्याने पावसाचे पाणी जमिनीत मुरण्याची क्षमता कमी झाली आहे. रस्ते, पदपथ, सोसायट्यांचे आवार तसेच सार्वजनिक जागांचे मोठ्या प्रमाणावर काँक्रीटीकरण झाल्यामुळे जलनिस्सारण यंत्रणेवर अतिरिक्त ताण निर्माण होत असल्याचेही त्यांनी सांगितले.

तसेच अनेक नैसर्गिक नाले, ओढे, तलाव आणि जलमार्गांचे मूळ स्वरूप बदलले असून काही ठिकाणी त्यांची रुंदी कमी झाली आहे तर काही ठिकाणी प्रवाहात अडथळे निर्माण झाले आहेत. त्यामुळे भविष्यातील शाश्वत विकासासाठी या नैसर्गिक जलस्रोतांचे सर्वेक्षण करून त्यांचे संरक्षण व संवर्धन करणे अत्यावश्यक असल्याचे भाऊसाहेब भोईर यांनी स्पष्ट केले आहे.

महानगरपालिकेने शहरातील सर्व नैसर्गिक जलप्रवाह, नाले, ओढे, तलाव आणि पावसाच्या पाण्याचे मार्ग यांचे वैज्ञानिक मॅपिंग करावे, तसेच नवीन विकासकामे, गृहप्रकल्प आणि सार्वजनिक प्रकल्पांना मंजुरी देताना नैसर्गिक जलप्रवाह अबाधित राहतील याची सक्तीने अंमलबजावणी करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. याशिवाय रेन वॉटर रिचार्ज झोन, जैविक जलनिस्सारण व्यवस्था (बायो-स्वेल्स), खुल्या मातीच्या जागांचे संरक्षण आणि पर्यावरणपूरक जलव्यवस्थापन उपाययोजनांना प्रोत्साहन देण्याची गरज असल्याचेही त्यांनी नमूद केले आहे. शहराचा विकास केवळ रस्ते, उड्डाणपूल आणि इमारती उभारण्यात नसून पर्यावरणीय संतुलन, जलव्यवस्थापन आणि नैसर्गिक साधनसंपत्तीचे संवर्धन यामध्येही असल्याचे सांगत प्रशासनाने याबाबत तातडीने व्यापक आणि दीर्घकालीन उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत असल्याचे भोईर यांनी म्हटले आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### देहूत जगद्गुरु संत तुकाराम महाराज पालखी प्रस्थान सोहळा उत्साहात

■ उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रा वहिनी अजितदादा पवार यांची प्रमुख उपस्थिती

देहू (दैनिक संध्या) : जगद्गुरु संत तुकाराम महाराजांच्या पालखी प्रस्थान सोहळ्याला महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रा वहिनी अजितदादा पवार यांनी प्रमुख उपस्थिती लावून संत तुकाराम महाराजांच्या पादुकांचे दर्शन घेतले व भाविक वारकऱ्यांना आषाढी वारीच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी त्यांनी संत तुकाराम महाराजांच्या विचारांचे स्मरण करत, वारी ही महाराष्ट्राच्या संस्कृतीची, भक्तीची आणि सामाजिक ऐक्याची महान परंपरा असल्याचे सांगितले. तसेच वारकऱ्यांच्या सुविधा, सुरक्षितता आणि आवश्यक सर्व व्यवस्था प्रशासनामार्फत प्रभावीपणे करण्यात आल्याची माहितीही यावेळी घेण्यात आली. या सोहळ्यास विविध मान्यवर, लोकप्रतिनिधी,प्रशासनातील अधिकारी,मंदिर संस्थानचे पदाधिकारी तसेच हजारो वारकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### माजी सरपंच अंकुश लकडे यांचे निधन



सोमेश्वरनगर (दैनिक संध्या) : बारामती तालुक्यातील खंडोबाचीवाडीचे माजी सरपंच अंकुश लकडे यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक भाऊ असा परिवार आहे. सरपंच म्हणून कार्यरत असताना अंकुश लकडे यांनी गावाच्या सर्वांगीण विकासासाठी उल्लेखनीय योगदान दिले होते.

### शिवनगर विद्या प्रसारक मंडळाच्या मानस सदस्य पदी पार्थ पवार व युगेंद्र पवार





माळेगाव (दैनिक संध्या) : माळेगाव सहकारी साखर कारखाना संचलित शिवनगर विद्या प्रसारक मंडळाच्या मानद सदस्यपदी खा.पार्थ अजित पवार व युवा नेते युगेंद्र पवार यांची निवड करण्यात आली आहे. जिल्ह्यात शैक्षणिक क्षेत्रात नावलौकिक मिळवलेल्या शिवनगर विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष खा.शरद पवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या विश्वस्तांच्या बैठकीत हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला.तसेच संस्थेच्या पोटनियमानुसार माळेगाव कारखान्याचे अध्यक्ष हे या संस्थेच्या उपाध्यक्ष असतात.यानुसार कारखान्याच्या अध्यक्षा व उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी या संस्थेचा उपाध्यक्ष पदाचा पदभार स्वीकारला. यावेळी विश्वस्त ॲड.राजेंद्र काटे,धन्यकुमार जगताप,विराज खलाटे, प्रवीण पोंदकुले,ॲड.मोहन नेवसे, रोहन देवकाते,सचिव डॉ.धनंजय ठोंबरे,निमंत्रीत सदस्य गणपतराव देवकाते,आशा जराड उपस्थित होते. दरम्यान पार्थ पवार व युगेंद्र पवार या दोन युवकाची निवड करण्यात आल्याने संस्थेच्या सर्वांगीण विकासासाठी व प्रगतीसाठी,तसेच विद्यार्थ्यांच्या उन्नतीसाठी मोठी मदत होईल असा विश्वास अध्यक्ष खा.शरद पवार यांनी बैठकीत व्यक्त केला.

### सुधारित प्रधानमंत्री पिक विमा योजना लागू; 31 जुलै अंतिम मुदत; लाभ घेण्याचे आवाहन

बारामती (दैनिक संध्या) : राज्यात सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी सुधारित प्रधानमंत्री पिक विमा योजना ३ जुलै २०२६ अन्वये शासन निर्णयानव्ये लागू करण्यात आली आहे, विमा योजनेत भाग घेण्यासाठी अंतिम ३१ जुलै २०२६ असून या योजनेचा अधिकाधिक शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन तालुका कृषी अधिकारी सचिन हाके यांनी केले आहे. या शासन निर्णयामुळे अधिसूचित महसूल मंडळात, अधिसूचित पिकाचे चालू वर्षीचे सरासरी उत्पादन हे उंबरठा उत्पादनाच्या तुलनेत कमी आल्यास विमा नुकसान भरपाई लागू होणार आहे. बाजरी, तुर, मका ,भुईमूग, खरीप कांदा,सोयाबीन या ६पिकांसाठी खरीप हंगामामध्ये शेतकऱ्यांना विमा योजने सहभागी होता येणार आहे. यासाठी शेतकऱ्यांना विमा संरक्षित रकमेच्या २ टक्के विमा हप्ता भरून सहभाग घ्यावा लागेल. कांदा या व्यापारी पिकांसाठी हा विमा हप्ता विमा संरक्षित रकमेच्या ५ टक्के राहील. केंद्र शासनाच्या पिक विमा पोर्टलवर ऑनलाईन सहभाग नोंदवता येईल. यामध्ये भाग घेण्यासाठी बँक, कॉमन सर्विस सेंटर, किंवा स्वतः शेतकरी ऑनलाइन अर्ज भरून भाग घेऊ शकतो. योजनेत भाग घेण्यासाठी शेतकऱ्याकडे ॲग्री स्टाक नोंदणी क्रमांक बंधनकारक आहे. जमिनीची कागदपत्रे, पीक लागवड घोषणापत्र, आधार क्रमांक, आधार संलग्न पेमेंट साठी ते बँक खात्यात जोडलेले असावे. शेतकऱ्यांनी आपल्या पिकाचे डिजिटल क्रॉप सर्वे करणे बंधनकारक आहे. डिजिटल क्रॉप सर्वेमधील पीक व विमा घेतलेले पीक यामध्ये तफावत आढळल्यास डिजिटल क्रॉप सर्वेमध्ये नोंदवण्यात आलेले पीक अंतिम गृहित धरण्यात येईल तसेच तफावत असल्यास विमा अर्ज रद्द होईल. योजनेत चुकीच्या मार्गाने अर्ज करून गैरफायदा घेत असल्याशिवाय निदर्शनास आल्यास त्यांना पुढील पाच वर्ष कृषी विषयक योजनांपासून वंचित रहावे लागेल. योजनेत भाग घेण्यासाठी किमान ०.१० हेक्टर पिका खालील क्षेत्र मर्यादा आहे. या संदर्भात काही अडचण आल्यास शेतकरी संबंधित विमा कंपनी Emailno.pmfby.maharashtra@hdfcergo.com, तालुका कृषी अधिकारी कार्यालय किंवा १४४४७ क्रमांक वर फोन करून माहिती घेता येईल. चालू वर्षी हवामान खात्याने पावसा संदर्भात दिलेल्या माहितीच्या अनुषंगाने शेतकऱ्यांचे आर्थिक संरक्षणाच्या दृष्टीने पिक विमा योजना अत्यंत महत्त्वपूर्ण आहे, असे आवाहन श्री. हाके यांनी केले आहे.

### कालपासून सुरु असलेल्या जोरदार पावसामुळे शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान



कोळवण (दैनिक संध्या) : रविवार पासून सुरु असलेल्या पावसाने फक्त मंगळवारी दिवसभर विश्रांती घेतली आणि रात्री पासून पुन्हा जोरदार पाऊस बरसला यामुळे कोळवण खोर्यातील भात शेती,भात रोपवाटिका यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. जोरदार पावसामुळे शेतीचे बांध तुटल्याने एका शेतातील सुपीक माती वाहून गेली असून जमीन खरडून गेली आहे पुन्हा बांध बंदिस्ती करायला मोठा खर्च येणार आहे. जोरदार पावसामुळे डोंगर रांगेतील पाण्याच्या ओहळ दगड गोटे चिखल माती गाळ यासोबतच शेतात घुसल्या डोंगर रांगेतील शेती या पाण्यामुळे तुटत तुटत पार नदीच्या काठापर्यंत आली आहे. ज्या शेतात भाताची पुनर्लागवड करायची ती शेती पार खरडून गेली आहे व भात रोपवाटिका गाळ दगड गोटे यांनी गाडल्या आहेत भाताची पुनर्लागवड कशी करावी हा मोठा प्रश्न शेतकऱ्यांना सतावत आहे.

# रस्त्यावर उतरण्याची वेळ आली

## नाशिक-पुणे रेल्वेसाठी आमदार सत्यजीत तांबे यांचा एल्गार

नाशिक (दै. संध्या)



नाशिक-पुणे रेल्वे हा केवळ वाहतुकीचा नव्हे, तर नाशिकच्या विकासाचा आणि भविष्यातील आर्थिक प्रगतीचा महत्त्वाचा प्रश्न आहे. त्यामुळे या रेल्वे मार्गासाठी आता सर्वसामान्य नागरिकांनी रस्त्यावर उतरून जनआंदोलन उभारण्याची वेळ आली आहे, असे आवाहन आमदार सत्यजीत तांबे यांनी नाशिक येथे झालेल्या पत्रकार परिषदेत केले.

यावेळी त्यांनी जाहीर केले की, ९ ऑगस्ट क्रांतीदिनाच्या निमित्ताने नाशिक-पुणे रेल्वे मार्गाच्या मागणीसाठी व्यापक जनआंदोलन उभारण्यात येणार असून, नाशिककरांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे. नाशिककरांनी आता जागे होण्याची वेळ आली असून, या रेल्वेमार्गासाठी सर्वसामान्यांनी पुढाकार घेतला पाहिजे. राजकारण असो की काही, नाशिक-पुणे रेल्वेसाठी आता नागरिकांनीच पुढे आले पाहिजे, असेही त्यांनी सांगितले.

आमदार तांबे म्हणाले की, नाशिक-पुणे दरम्यान थेट रेल्वेमार्गाची गरज अनेक वर्षांपासून अधोरेखित होत आहे. अवघ्या १५० किलोमीटरच्या अंतरासाठी आज नागरिकांना मोठा वळसा घालावा लागतो. अनेकदा रस्ते वाहतुकीवरील ताणामुळे पुणे गाठण्यासाठी सात-सात तास लागतात. आज चाकणचा रस्ताही बंद असल्याने नाशिककरांना पुणे गाठण्यासाठी मोठा त्रास सहन करावा लागत आहे. अवघ्या दीडशे किलोमीटरच्या अंतरासाठी ही अनास्था का, असा सवालही त्यांनी उपस्थित केला.

ते पुढे म्हणाले की, या रेल्वे प्रकल्पाच्या बाबतीत राजकीय इच्छाशक्तीचा अभाव दिसून येतो. मूळ अपेक्षित मार्गाऐवजी शिर्डीमार्गे नियोजन करण्यात आल्याने अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. "पुण्याहून पुणतांबा" या म्हणीप्रमाणे ही रेल्वे झाली आहे, अशी उपरोधिक टिप्पणी करत त्यांनी सांगितले की, लोकप्रतिनिधींसोबतच आता सर्वसामान्य नागरिकांनी संघटितपणे दबाव निर्माण करण्याची गरज आहे. सर्वसामान्यांनी दबाव निर्माण करून ही रेल्वे नाशिकच्या पदरात पाडून घेतली पाहिजे.

आमदार तांबे यांनी स्पष्ट केले की, पूर्वी इंडियाबुल्स प्रकल्पाच्या प्रश्नावर सातत्याने आंदोलन, भूमिका आणि पाठपुरावा केल्यानंतरच कामाला गती मिळाली. त्याचप्रमाणे नाशिक-पुणे रेल्वेच्या मागणीसाठीही लोकशक्ती उभी राहिल्यास शासनाला निर्णय घ्यावाच लागेल. विविध ठिकाणी रस्ता रोकोसह वेगवेगळ्या स्वरूपातील आंदोलने करण्यात येणार असल्याची माहितीही त्यांनी दिली.

यावेळी त्यांनी समृद्धी महामार्गाच्या कनेक्टरच्या रखडलेल्या कामाकडेही लक्ष वेधले. समृद्धी महामार्गाचा नाशिककरांना अपेक्षित फायदा झालेला नाही. नाशिक ते साकूर फाटा या कनेक्टरचे टेंडर अद्याप निघालेले नाही. समृद्धी महामार्गाच्या कनेक्टरचे काम लवकरात लवकर सुरू झाले पाहिजे.

तसेच इगतपुरी-घोटी टोल आणि इगतपुरी टोल असे दोन्ही टोल भरावे लागत असल्याने नागरिकांवर अतिरिक्त आर्थिक भार पडत असल्याचे त्यांनी सांगितले.

नाशिकला या रेल्वेमार्गाचा थेट फायदा होणार असल्याने प्रत्येक नाशिककराने या जनआंदोलनात सहभागी झाले पाहिजे. ९ ऑगस्ट रोजी होणाऱ्या क्रांतिदिनाच्या आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी होऊन नाशिक-पुणे रेल्वे मार्गासाठी जनदबाव निर्माण करावा, असे आवाहन आमदार सत्यजीत तांबे यांनी केले.

> नाशिक-समृद्धी कनेक्टरसाठी सुमारे ५०० कोटी रुपयांच्या प्रकल्पाचे भूसंपादन पूर्ण झाले असून निधीही मंजूर आहे, मात्र नाशिक ते साकूर फाटा या कनेक्टरचे टेंडर अद्यापही निघालेले नाही. त्यामुळे प्रत्यक्ष काम सुरू होण्यास विलंब होत आहे. या विलंबाचा फटका नाशिककरांना बसत आहे. समृद्धी महामार्गावर जाण्यासाठी नागरिकांना आधी मुंबई-आग्रा महामार्गाचा टोल आणि त्यानंतर समृद्धी महामार्गाचा टोल भरावा लागतो. एका प्रवासासाठी दोन टोल भरावे लागत असल्याने नागरिकांवर दुहेरी आर्थिक भार पडत आहे. तसेच भरवीर टोलनाक्यापर्यंत पोहोचण्यासाठी मोठा वेळ खर्च होतो आणि वाहतूक कोंडीचाही सामना करावा लागतो. या प्रश्नाकडे आमदार सत्यजीत तांबे यांनी यापूर्वी १० जुलै २०२५ रोजी विधिमंडळात लक्ष वेधले होते. कनेक्टरचे काम तातडीने सुरू करून नाशिककरांना समृद्धी महामार्गाचा प्रत्यक्ष लाभ मिळावा, अशी त्यांनी पुन्हा एकदा मागणी केली.

## ७२ तासांत उत्तर प्रदेशातून आरोपीला अटक

### १२ लाखांचे सोन्याचे दागिने १०० टक्के हस्तगत




विक्रोळी (दै. संध्या)

विक्रोळी पोलीस ठाण्याच्या हद्दीत पार्किंगमध्ये उभ्या असलेल्या कारमधून सुमारे साडेआठ तोळे सोन्याचे दागिने (किंमत अंदाजे 12 लाख रुपये) चोरी करणाऱ्या आरोपीला विक्रोळी पोलिसांनी अवघ्या 72 तासांत उत्तर प्रदेशातील झांसी येथून अटक करून चोरीचा संपूर्ण मुद्देमाल (100 टक्के रिकव्हरी) हस्तगत केला आहे.

याप्रकरणी विकास रामीनिवाश यादव (वय 24, रा. ग्राम सिमरा, झांसी, उत्तर प्रदेश) याला अटक करण्यात आली असून त्याच्याविरुद्ध विक्रोळी पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक 418/2026 अंतर्गत भारतीय न्याय संहिता कलम 303(3) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी विवेक बैजनाथ लोधी व त्यांच्या पत्नी यांनी 29 जून रोजी सायंकाळी घरी परतल्यानंतर सोन्याच्या दागिन्यांची बॅग चुकून कारमध्येच ठेवली आणि वाहन पार्क करून घरी गेले. दुसऱ्या दिवशी दुपारी ही बाब लक्षात आल्यानंतर त्यांनी सर्वत्र शोध घेतला; मात्र दागिने न मिळाल्याने विक्रोळी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

गुन्हा दाखल होताच संशयित विकास यादव फरार झाला होता. त्याचा मोबाईलही बंद असल्याने पोलिसांनी तांत्रिक विश्लेषण आणि गोपनीय माहितीच्या आधारे त्याचा माग काढला. पोलीस उपनिरीक्षक सचिन चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली पोलीस हवालदार राजन शिंदे, कैलास चव्हाण आणि विशाल सोनजे यांचे विशेष पथक तातडीने उत्तर प्रदेशात रवाना झाले.

झांसी परिसरात दोन दिवसांच्या अथक शोधमोहीमेनंतर आरोपीला ताब्यात घेण्यात आले. चौकशीदरम्यान त्याने मित्राच्या शेतात पुरून ठेवलेले साडेआठ तोळे सोन्याचे दागिने पोलिसांनी जप्त केले. त्यामुळे चोरीस गेलेला सुमारे 12 लाख रुपयांचा मुद्देमाल पूर्णपणे हस्तगत करण्यात पोलिसांना यश आले.

या कारवाईत पोलीस उपनिरीक्षक सचिन चव्हाण व विकास चव्हाण यांनी तपास केला. ही कारवाई वरिष्ठ पोलीस निरीक्षक विक्रम चव्हाण आणि पोलीस निरीक्षक (गुन्हे) महेश जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

## भांडगावमध्ये अवैध गावठी पिस्तूल व १५ काडतुसेसह तिघांना अटक

खुटबाव (दै. संध्या)

भांडगाव (ता. दौंड )येथे तीन आरोपींना पोलिसांनी तीन अवैध गावठी पिस्तूल, १५ काडतुसे ताब्यात घेत अटक केली आहे. पोलिसांनी आरोपींकडून बलेनो चार चाकी वाहनासह ५,३७,५०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा व यवत पोलीस ठाणे यांच्या मार्फत वरील कारवाई करण्यात आली. आरोपी मंगेश शंकर मासोळे (वय २४ वर्षे) सुरज संजय शेलार (वय २६ वर्षे) रोहित प्रेमदास भुजवणे (वय २४ वर्षे) तिघेही (राहणार यवत ता . दौंड)यांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. मंगळवार दि. ७ रोजी विशेष मोहिमेअंतर्गत कारवाई करण्याच्या अनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखेचे पथक यवत पोलीस स्टेशन हद्दीमध्ये पेट्रोलिंग करत असताना या पथकाला खबऱ्यामार्फत भांडगाव परिसरात नंबर नसलेली पांढऱ्या रंगाची बलेनो कार असल्याचे समजले. या कारमध्ये तिन्ही इसम असून त्यांच्याजवळ अवैध गावठी पिस्तूल आहेत अशी खात्रीशीर माहिती मिळाली. त्यानंतर या पथकाने कारवाईचे आदेश प्राप्त केले. या पथकाने भांडगाव येथील सोनाक्षी मंगल कार्यालयासमोरील परिसरात सापळा रचून संशयित बलेनो कार थांबवुन त्या कारमधील तीन इसमांकडे चौकशी चौकशी केली.

## पावसाच्या संकेताने मेंढ्यांचा परतीचा प्रवास सुरू

नारायणगाव (दै. संध्या)

यंदा मान्सूनचा पाऊस जवळपास महिनाभर लांबल्यामुळे सह्याद्रीच्या पर्वतरांगांमध्ये मुक्कामाला असलेल्या मेंढपाळांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला होता. पाऊस नसल्याने मेंढ्यांच्या चाऱ्याचा आणि पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला होता. मात्र, आता अखेर बहुप्रतीक्षित पावसाचे आगमन झाल्यामुळे या मेंढपाळांना मोठा दिलासा मिळाला आहे. पाऊस सुरू होताच मेंढपाळांनी आपल्या गावी परतण्याचा प्रवास सुरू केला आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील संगमनेर तालुक्यातील साकुर,मांडवे व पारनेर तालुक्यातील ढवळपुरी,वनकुटे, गावडेवाडी,मांडवे,खडकवाडी, ढोकी आदी गावांमधील आणि राहुरी तालुक्यातील शेरी चिखलठाण परिसरात आजही अनेक कुटुंबाचा मुख्य व्यवसाय मेंढपालन आहे. हे मेंढपाळ सध्या आपल्या कुटुंबासह, मेंढ्यांचे कळप, घोडे आणि संसारोपयोगी साहित्य घेऊन मूळ गावी चालले आहेत. अहिल्यानगर-कल्याण आणि पुणे-नाशिक महामार्गावरून जाणाऱ्या या मेंढ्यांच्या मोठमोठ्या कळपांनी (तांड्यांनी) रस्त्यावरील प्रवाशांचे लक्ष वेधून घेतले आहे. पावसाच्या संगीतमय आगमनासोबतच मेंढपाळांची ही निसर्गाभिमुख जीवनशैली महामार्गावर एक वेगळेच चित्र उभे करत आहे. निसर्गाच्या लहरीपणामुळे मेंढीपालनाचा व्यवसाय दिवसेंदिवस अत्यंत कष्टाचा आणि आव्हानात्मक होत चालला आहे. उन्हाळा, पाऊस, थंडी आणि वादळ अशा सर्व प्रतिकूल परिस्थितीशी सामना करत मेंढपाळांना भटकंती करावी लागते. त्यातच वन्य प्राण्यांचे हल्ले, चाऱ्याची टंचाई आणि वाढत्या खर्चामुळे हा व्यवसाय आर्थिकदृष्ट्या अनिश्चिततेचा बनला आहे.

## पाटसला मिळणार हक्काचे कृषी बाजार आवार; १० एकर जमीन मंजूर

### आमदार ॲड. राहुल कुल यांनी मानले मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे आभार

यवत (दै. संध्या)

दौंड तालुक्यातील शेतकऱ्यांच्या आणि व्यापाऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. मौजे पाटस (ता. दौंड, जि. पुणे) येथील गट नं. ८९० मधील १० एकर इतकी शासकीय गायरान जमीन कृषी उत्पन्न बाजार समिती, दौंड यांना 'बाजार आवार उभारणी' या सार्वजनिक प्रयोजनासाठी मंजूर करण्यात आली आहे. आमदार ॲड. राहुल कुल यांच्या सातत्यपूर्ण आणि यशस्वी पाठपुराव्यामुळे हा महत्त्वपूर्ण प्रलंबित प्रश्न अखेर मार्गी लागला आहे.



या संदर्भातील अधिकृत शासन ज्ञापन महसूल व वन विभागामार्फत प्रसिद्ध करण्यात आले आहे. ही जमीन केवळ नाममात्र १ रुपया या दराने कब्जेहक्काने प्रदान करण्यास शासनाने पूर्वमंजुरी दिली आहे. दौंड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या माध्यमातून पाटस परिसरातील शेतकऱ्यांना शेतमाल विक्रीसाठी हक्काची जागा आणि अत्याधुनिक सोयी-सुविधा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी आमदार ॲड. राहुल कुल गेल्या अनेक दिवसांपासून शासन दरबारी सातत्याने प्रयत्नशील होते. त्यांच्या या मागणीची दखल घेत राज्य शासनाने ही १० एकर जमीन पणन संचालक, पुणे यांच्या नावावर 'भोगवटादार वर्ग-२' म्हणून मंजूर केली आहे. या जागेवर पुढील ३ वर्षांच्या आत बाजार आवाराचे काम सुरू होणे बंधनकारक असणार आहे.


हा महत्त्वपूर्ण निर्णय झाल्याबद्दल आमदार ॲड. राहुल कुल यांनी समाधान व्यक्त केले असून, दौंड तालुक्यातील शेतकऱ्यांच्या विकासाला गती दिल्याबद्दल राज्याचे मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस जी आणि महसूल मंत्री ना. चंद्रशेखर बावनकुळे जी यांचे विशेष आभार मानले आहेत. या निर्णयामुळे संपूर्ण दौंड तालुक्यातून, विशेषतः शेतकरी आणि व्यापारी वर्गातून आमदार ॲड. राहुल कुल यांच्या कार्यपद्धतीचे कौतुक होत असून, राज्य शासनाचे आभार मानले जात आहेत.

> पाटस आणि परिसरातील शेतकरी बांधवांसाठी हे नवीन बाजार आवार मैलाचा दगड ठरेल. शेतकऱ्यांना त्यांच्या हक्काच्या ठिकाणी शेतमालाला योग्य भाव मिळण्यासाठी आणि व्यापार वाढवण्यासाठी या जागेचा मोठा फायदा होईल. आमच्या मागणीला तातडीने मंजुरी देऊन निधी आणि जमिनीचा प्रश्न सोडवल्याबद्दल मी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा मनापासून आभारी आहे.
> - आमदार ॲड. राहुल कुल, दौंड विधानसभा मतदारसंघ

# मुसळधार पावसाने खेड तालुक्याला ही झोडपले

## जनजीवन विस्कळीत, पावसामुळे पुणे नाशिक महामार्गाला आले नदीचे स्वरूप

राजगुरुनगर (दै. संध्या)



मुसळधार पावसाने संपूर्ण पुणे जिल्ह्यात हाहाकार उडाला असून खेड तालुक्यातील राजगुरुनगर, चाकण आणि आळंदी परिसराला त्याचा मोठा फटका बसला आहे. सलग कोसळणाऱ्या पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले असून अनेक ठिकाणी पाणी साचल्याने वाहतुकीवर मोठा परिणाम झाला आहे. पुणे-नाशिक महामार्गावरील वाकी येथे मोठ्या प्रमाणात पाणी साचल्याने महामार्गाला नदीचे स्वरूप प्राप्त झाले. त्यामुळे या मार्गावरील वाहतूक काही काळ पूर्णपणे ठप्प झाली होती. अनेक वाहने पाण्यात अडकल्याने स्थानिक ग्रामस्थ तसेच अग्निशामक दलाच्या जवानांनी अडकलेल्या नागरिकांना सुरक्षितस्थळी हलवून मदतकार्य केले. पावसामुळे प्रथमच एवढ्या मोठ्या प्रमाणावर पुणे नाशिक महामार्गावर पाणी आल्याने वाहतूक ठप्प झाली त्यामुळे दैनंदिन कामाला जाणारे कामगार वर्ग,विद्यार्थी,तसेच प्रवाशांचे मोठे हाल झाले .तर अनेक वाहने पाण्याखाली आल्याने त्यातील प्रवाशांना स्थानिकांच्या मदतीने सुखरूप सुरक्षित स्थळी हलविण्यात आले.

दरम्यान, या परिसरातील नैसर्गिक पाण्याचा प्रवाह अडविल्यामुळेच ही गंभीर परिस्थिती निर्माण झाल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे. पाणी निचऱ्याची प्रभावी व्यवस्था नसल्याने दरवर्षी नागरिकांना अशा समस्यांना सामोरे जावे लागत असल्याचीही भावना व्यक्त होत आहे. या घटनेनंतर प्रशासन याची गंभीर दखल घेऊन कायमस्वरूपी उपाययोजना करणार का, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

दोन दिवस चाललेल्या मुसळधार पावसामुळे तीर्थक्षेत्र आळंदी येथे इंद्रायणी नदीवरील चार ही पूल पाण्याखाली गेल्याने पुलावरून वाहतूक तूर्तास बंद करण्यात आली असून आळंदी येथे येणाऱ्या वारकरी,व भाविकांना पावसामुळे न येण्याचे आव्हान देवस्थान समितीकडून करण्यात आले आहे.पावसामुळे तीर्थक्षेत्र आळंदी येथील जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे.तीच परिस्थिती

राजगुरुनगर येथेही झाली असून येथील भीमा नदीला मोठ्या प्रमाणात पाणी आल्याने येथीलबंधारे ओसंडून वाहत असल्याचे चित्र आहे.तसेच काही भागातील बंधाऱ्याचे ढापे न काढल्याने बंधारे वरून पाण्याचा प्रवाह जोरात सुरू आहे.तालुक्याच्या रेटवडी भागात पाण्याचा अंदाज न आल्याने एका तरूण पाण्याच्या प्रवाहात वाहून गेल्याचे समजते.

पावसामुळे नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. नदी-नाल्यांच्या परिसरात जाणे टाळावे, तसेच आवश्यक असल्याशिवाय घराबाहेर पडू नये, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## माळशेज घाट धबधब्यांनी बहरला


नारायणगाव (दै. संध्या)



जुन्नर तालुक्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे प्रसिद्ध पर्यटन स्थळ असलेल्या माळशेज घाटातील धबधबे आता वेगाने वाहू लागले आहेत. निसर्गाच्या या सुंदर रूपामुळे घाटात पर्यटकांची मोठी गर्दी होत आहे.या वाढत्या पर्यटनामुळे स्थानिक तरुणांना रोजगाराच्या नवीन संधी मिळाल्या आहेत. घाटातील विविध ठिकाणी गरम मक्याची कणसे, चहा, भजी आणि नाश्त्याचे स्टॉल्स लावले असून, त्यांची चांगली आर्थिक उलाढाल होत आहे. हा तात्पुरता व्यवसाय पावसाळा संपेपर्यंत स्थानिक लोकांसाठी मोठा आर्थिक आधार ठरणार आहे. तालुक्याच्या पश्चिम भागात समाधानकारक पाऊस झाल्याने भात लावणीच्या कामांनी वेग घेतला आहे. अनेक शेतकऱ्यांनी भाताच्या आवणीला सुरुवात केल्यामुळे शेतांमध्ये लगबग वाढली आहे. तसेच, कांदाच्या बारकींना पाण्याचा चांगला वेढा पडल्याचे दिसून येत आहे.दुसरीकडे, बाजारात टोमॅटोला चांगला भाव मिळत असल्याने शेतकरी सुखावले होते. मात्र, सतत पडणाऱ्या पावसामुळे टोमॅटोच्या फुलांची गळती सुरू झाली आहे. परिणामी, टोमॅटोच्या उत्पादनावर आणि गुणवत्तेवर विपरीत परिणाम होत असून, दर्जेदार उत्पादन टिकवून ठेवण्याचे मोठे आव्हान शेतकऱ्यांसमोर उभे राहिले आहे.




दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक



# शवविच्छेदन प्रक्रियेत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर

## अहवालांतील विलंबही कमी होणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

■ मुंबई (दै. संध्या)

राज्यातील शवविच्छेदन प्रक्रिया अधिक आधुनिक, पारदर्शक आणि कार्यक्षम करण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येणार असून, मुंबईत लवकरच नॉन-इन्वेसिव्ह पोस्टमॉर्टेम (शरीराला चिरफाड न करता शवविच्छेदन) तंत्रज्ञान सुरू करण्यात येणार आहे. राज्यातील शवविच्छेदन अहवाल वेळेत उपलब्ध व्हावेत यासाठी शासनाने व्यापक उपाययोजना हाती घेतल्या असून, गेल्या दोन ते तीन वर्षांत प्रलंबित अहवालांची संख्या लक्षणीयरीत्या कमी करण्यात आल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली. याबाबत सदस्य चित्रा वाघ यांनी प्रश्न उपस्थित केला. तर सदस्य सतेज पाटील, अंबादास दानवे, प्रज्ञा सातव, डॉ. नीलम गोऱ्हे यांनी उपप्रश्न उपस्थित केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, राज्यात सध्या ५३३ शवविच्छेदन केंद्रांमधून कामकाज सुरू असून या वर्षात मे महिन्यापर्यंत १०,९०५ शवविच्छेदन प्रक्रिया पूर्ण करण्यात आल्या आहेत. त्यामुळे या केंद्रांवरील कामाचा ताण लक्षात घेऊन कर्मचारी, पायाभूत सुविधा आणि इतर कमतरता यांचा आढावा घेऊन त्या समयबद्ध पद्धतीने दूर करण्यात येतील.

अत्याधुनिक नॉन-इन्वेसिव्ह पोस्टमॉर्टेम तंत्रज्ञानामुळे शरीराला चिरफाड न करता तपासणी करता येणार आहे. या तंत्रज्ञानामुळे वेळेची बचत, कमी मनुष्यबळाची गरज, मानवी चुका कमी होणे आणि अत्यंत सूक्ष्म बदलांचे अचूक निदान करणे शक्य होईल. मुंबईतील जे. जे. रुग्णालय व केईएम रुग्णालयात हे तंत्रज्ञान सुरू करण्यासाठी




आवश्यक यंत्रसामग्रीची खरेदी प्रक्रिया आणि निविदा प्रक्रिया पूर्ण झाली आहे.

पूर्वी शवविच्छेदन अहवाल मिळण्यासाठी सहा महिने ते वर्षभराचा कालावधी लागत असे. मात्र, गेल्या दोन ते तीन वर्षांत न्यायवैद्यक प्रयोगशाळांमधील कामकाज गतीमान करून प्रलंबित अहवालांची संख्या सुमारे तीन लाखांवरून ७५ हजारांपर्यंत कमी करण्यात आली आहे. पुढील तीन ते चार महिन्यांत ही प्रलंबित प्रकरणे नियमित पातळीवर आणण्याचा प्रयत्न सुरू आहे. मेडिको-लीगल स्वरूपाच्या प्रकरणांना आणि ज्या प्रकरणांमध्ये व्हिसेरा जतन करण्यात आला आहे, त्यांना प्राधान्य दिले जाणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

राज्यातील काही शवविच्छेदन केंद्रांमध्ये नियमितपणे मृतदेह येत नसले, तरी अपघातप्रवण भागांतील केंद्रांवर मोठा ताण असतो. आवश्यक त्या ठिकाणी शीतगृहांची सुविधा उपलब्ध असून, सर्व शवविच्छेदन केंद्रांच्या सुविधांचा सर्वंकष आढावा घेऊन आवश्यक सुधारणा करण्यात येतील, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

पोस्टमॉर्टेम प्रक्रियेतील माहिती गोपनीय ठेवणे हे नियमांनुसार बंधनकारक आहे. शवविच्छेदन अहवाल पोलिसांकडे सादर होईपर्यंत कोणतीही माहिती सार्वजनिकपणे देणे चुकीचे आहे. अशा प्रकारचे नियमभंग करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिला.

---

# थोडक्यात पण महत्वाचे




## कचरावेचक महिलांसाठी ‘टीबी मुक्त मुंबई’ अभियान

मुंबई (दैनिक संध्या) : महाराष्ट्र लोकभवनच्या पुढाकाराने व बृहन्मुंबई महानगर पालिकेच्या सहकार्याने सुरु करण्यात आलेल्या ‘टीबी मुक्त मुंबई’ अभियान अंतर्गत कचरा वेचक महिलांसाठी फाईन आर्ट सोसायटी चेंबूर मुंबई येथे मोफत आरोग्य तपासणी शिबीर व ‘नमस्ते’ योजनेचा शुभारंभ करण्यात आला. राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांच्या उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमात राज्यपाल तसेच अभिनेते जॅकी श्रॉफ यांच्या हस्ते कचरा वेचक महिलांना ‘आयुष्यमान कार्ड’ व आरोग्य रक्षणासाठी पीपीई किट देण्यात आले. कार्यक्रमाला कचरा वेचक महिलांच्या उत्थानासाठी कार्य करीत असलेल्या सुशीला साबळे, नगर सेविका व प्रभाग समितीच्या अध्यक्षा आशा मराठे, पालिकेच्या अतिरिक्त आयुक्त प्राजक्ता लवंगारे वर्मा, अतिरिक्त आयुक्त डॉ विपीन शर्मा, ज्योती म्हापसेकर, राज्यपालांचे सचिव डॉ प्रशांत नारनवरे, उपायुक्त (घनकचरा व्यवस्थानं) डॉ. किरण दिघावकर व देवनार परिसरातील कचरा वेचक महिला आदी उपस्थित होते.

## राज्यात पुढील पाच दिवस वादळी पावसाचा इशारा

मुंबई (दैनिक संध्या) : मुंबई वेधशाळेने राज्यासाठी पुढील पाच दिवसांचा हवामान अंदाज जाहीर केला असून, विविध भागांत मेघगर्जना, विजांचा कडकडाट आणि काही ठिकाणी उष्णतेच्या लाटेचा इशारा देण्यात आला आहे.७ जुलै रोजी पालघर, नाशिक घाट आणि पुणे घाट परिसरासाठी रेड अलर्ट देण्यात आला आहे. ७ जुलै रोजी मुंबई शहर, मुंबई उपनगर, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड, कोल्हापूरघाट,अहिल्यानगर, धुलेजळगाव, वाशीम आणि वर्धा, नागपूर येथे यलो अलर्ट देण्यात आला आहे. तर ठाणे, रायगड, नाशिक, नंदुरबार, बुलडाणा, अकोला, सातारा घाट आणि अमरावती येथे ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. ८ जुलै रोजी पालघर, नाशिक घाट, रायगड, रत्नागिरी, कोल्हापूर घाट, बुलडाणा, अकोला, अमरावती आणि वर्धा येथे यलो अलर्ट राहणार असून, पुणे घाट आणि सातारा घाट परिसरात ऑरेंज अलर्ट असेल. ९ जुलै रोजी रत्नागिरी, सातारा घाट, पुणे घाट, खंडाळा घाट, चंद्रपूर आणि गडचिरोली येथे यलो अलर्ट देण्यात आला आहे. १० जुलै रोजी वर्धा, चंद्रपूर, गडचिरोली आणि यवतमाळ जिल्ह्यांसाठी यलो अलर्ट कायम राहणार आहे. ११ जुलै रोजी अमरावती, वर्धा, नागपूर आणि चंद्रपूर येथे यलो अलर्ट देण्यात आला आहे. मुंबई वेधशाळेने नागरिकांनी स्थानिक प्रशासन व हवामान विभागाच्या सूचनांचे पालन करून आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन केले आहे.

## अहवाल केंद्रास पाठवावा

मुंबई (दैनिक संध्या) : भारत सरकारच्या चार नवीन श्रम संहितांच्या अनुषंगाने राज्य शासनाने तयार केलेल्या ‘महाराष्ट्र वेतन संहिता नियम’, ‘महाराष्ट्र औद्योगिक संबंध संहिता नियम’, ‘महाराष्ट्र व्यावसायिक सुरक्षा, आरोग्य व कामाची स्थिती नियम’ आणि ‘महाराष्ट्र सामाजिक सुरक्षा संहिता नियम’ या चारही नियमावलींवर कामगार आणि कर्मचारी संघटनांशी कामगार विभागाच्या चार स्वतंत्र तज्ज्ञ समित्यांनी कामगार संघटनांच्या संयुक्त कृती समितीसोबत चर्चा घडवून आणावी. कामगार संघटनांचे मत आणि सूचना पूर्णपणे जाणून घेतल्यानंतरच याचा एकत्रित संयुक्त अहवाल केंद्रीय श्रम मंत्रालयाला पाठवावा, असे निर्देश कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी दिले. कामगार मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात या संदर्भात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीला कामगार विभागाच्या अप्पर मुख्य सचिव आय. ए. कुंदन, उपसचिव दीपक पोकळे, स्वप्नील कापडणीस, रोशनी कदम यांच्यासह ‘कामगार कर्मचारी संघटना संयुक्त कृती समिती’चे अध्यक्ष डॉ. कैलास कदम आणि सरचिटणीस गोविंदराव मोहिते प्रामुख्याने उपस्थित होते. याशिवाय कामगार चळवळीतील प्रमुख संघटनांचे प्रतिनिधी म्हणून इंटक, आयटक, एचएमएस, सीटू, एआयसीसीटीयु, एनटीयुआय आणि बीकेएस या संघटनांचे पदाधिकारीही या बैठकीस उपस्थित होते.

---

# पालघरमधील पूरस्थितीची मंत्री गिरीश महाजन यांच्याकडून पाहणी

■ पालघर/ मुंबई (दै. संध्या)

पालघर जिल्ह्यात मुसळधार पावसामुळे गावांमध्ये पाणी शिरून जनजीवन विस्कळीत झाले आहे. अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी सोमवारी पालघर जिल्ह्याचा दौरा करून पूरस्थितीचा आढावा घेतला. प्रशासनाकडून सुरू असलेल्या मदत व बचावकार्याची त्यांनी प्रत्यक्ष पाहणी केली.

दौऱ्यादरम्यान मंत्री महाजन यांनी जव्हार, मनोर तसेच जिल्ह्यातील विविध पूरग्रस्त भागांना भेट दिली. अतिवृष्टीमुळे वाहतुकीवरही परिणाम झाला तसेच पालघर–जव्हार मार्गावरील विक्रमगड तालुक्यातील पाचमाड नाल्यावरील उड्डाणपुलाची पाहणी करून संबंधित अधिकाऱ्यांकडून परिस्थितीची माहिती घेतली. यावेळी खासदार हेमंत सावरा, जिल्हाधिकारी डॉ. इंदूराणी जाखड, जिल्हा पोलीस अधीक्षक यतीश देशमुख, जव्हारच्या प्रांताधिकारी अपूर्वा बासुरे, सहायक जिल्हाधिकारी अमोल पी., जलसंपदा विभागाच्या अभियंता वैशाली नारकर,



वाडा येथील प्रांताधिकारी संदीप चव्हाण यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. जिल्हाधिकारी डॉ. इंदूराणी जाखड यांनी सांगितले की, प्रशासनाने आतापर्यंत सुमारे १,२०० नागरिकांचे सुरक्षितस्थळी स्थलांतर केले असून त्यांची तात्पुरत्या निवारा केंद्रांमध्ये व्यवस्था करण्यात आली आहे. या नागरिकांना अन्न, पिण्याचे पाणी आणि इतर आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. तसेच पावसाशी संबंधित विविध घटनांमध्ये आतापर्यंत १० जणांचा मृत्यू झाल्याची माहिती त्यांनी दिली. यावेळी मंत्री महाजन यांनी नागरिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देण्याच्या सूचना अधिकाऱ्यांना दिल्या. पूरग्रस्त भागातील प्रत्येक नागरिकाला सुरक्षितस्थळी हलविणे, जीवितहानी टाळण्यासाठी आवश्यक ती सर्व खबरदारी घेणे तसेच मदत व बचावकार्य अधिक प्रभावीपणे राबविण्याचे निर्देश त्यांनी दिले. पालघर जिल्ह्यात वारंवार उद्भवणाऱ्या पूरस्थितीची कारणमीमांसा करून त्यावर कायमस्वरूपी उपाययोजना निश्चित करण्यासाठी आपत्ती व्यवस्थापन विभागामार्फत नामांकित संस्थेच्या सहकार्याने वैज्ञानिक अभ्यास केला जाणार आहे.

यासाठी विशेष अभ्यासगट स्थापन करण्यात येणार असून, त्याच्या अहवालाच्या आधारे शासन दीर्घकालीन उपाययोजना राबविणार असल्याची माहिती मंत्री महाजन यांनी दिली. यानंतर मंत्री महाजन यांनी माहीम–केळवा (झांझरोली) धरणाचीही पाहणी केली. मुसळधार पावसामुळे धरणाच्या मातीभरावावरील अश्मपटल (पिचिंग) काही ठिकाणी ढासळल्याच्या पार्श्वभूमीवर जलसंपदा विभागाने केलेल्या प्रतिबंधात्मक उपाययोजनांचा त्यांनी आढावा घेतला.

---

# इयत्ता ११ वी प्रवेश प्रक्रियेची विद्यार्थिनींसाठी विशेष फेरी-२ जाहीर

■ मुंबई (दै. संध्या)

राज्यातील इयत्ता ११ वी केंद्रीय ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेअंतर्गत विद्यार्थिनींसाठी विशेष फेरी-२ चे वेळापत्रक जाहीर करण्यात आले असून या फेरीची प्रक्रिया १० जुलैपासून सुरू होणार आहे. विद्यार्थिनींना प्रवेशाची अतिरिक्त संधी उपलब्ध करून देण्यासाठी ही विशेष फेरी राबविण्यात येत असल्याची माहिती माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालयाने दिली आहे. २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी राज्यातील ९ हजार ६८८ कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये इयत्ता ११ वीची ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया सुरू आहे. विशेष फेरी-२ अंतर्गत १० ते ११ जुलैदरम्यान नवीन विद्यार्थिनींची नोंदणी, अर्जातील दुरुस्ती तसेच पसंतीक्रम भरण्याची सुविधा उपलब्ध राहणार आहे. विद्यार्थिनींना किमान एक आणि कमाल दहा कनिष्ठ महाविद्यालयांचे पसंतीक्रम नोंदविता येणार आहेत. या फेरीतील प्रवेश वाटप प्रक्रिया १२ जुलै रोजी राबविण्यात येईल. त्यानंतर १३ जुलै रोजी प्रवेश वाटप यादी प्रसिद्ध केली जाणार असून विद्यार्थिनींना त्यांच्या लॉगिनद्वारे वाटप झालेल्या कनिष्ठ महाविद्यालयाची माहिती उपलब्ध होईल. प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या विद्यार्थिनींना १३ ते १४ जुलैदरम्यान संबंधित कनिष्ठ महाविद्यालयात कागदपत्र पडताळणी करून प्रवेश निश्चित करता येणार आहे. विशेष फेरी-२ नंतरच्या प्रवेश प्रक्रियेचे पुढील वेळापत्रक १४ जुलै रोजी जाहीर करण्यात येणार आहे. तसेच राज्यातील सर्व उच्च माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालये १५ जुलै २०२६ पासून नियमितपणे सुरू होणार आहेत. विद्यार्थिनी, पालक तसेच कनिष्ठ महाविद्यालयांनी जाहीर करण्यात आलेल्या वेळापत्रकानुसार सर्व कार्यवाही विहित मुदतीत पूर्ण करावी, असे आवाहन शिक्षण संचालनालयाने केले आहे.

---

# राजशिष्टाचार विभाग आणि ‘एसआयडीएम’, ‘सीआयआय’मध्ये गुंतवणुकीसंदर्भात सामंजस्य करार

■ मुंबई (दै. संध्या)

राजशिष्टाचार विभागाची परकीय थेट गुंतवणूक व प्रवासी भारतीय संपर्क शाखा (पीएफडीओ) आणि सोसायटी ऑफ इंडियन डिफेन्स मॅन्युफॅक्चरर्स (एसआयडीएम) आणि कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्री (सीआयआय) यांच्यात संरक्षण क्षेत्रातील सामंजस्य करार करण्यात आला.

संरक्षण क्षेत्रातील विमान व अवकाश उद्योग,द्वि-उपयोगी तंत्रज्ञान, अत्याधुनिक उत्पादन, निर्यात व आंतरराष्ट्रीय संरक्षण उद्योग भागीदारीसाठी महाराष्ट्राला पसंतीचे गुंतवणूक ठिकाण म्हणून विकसित करण्यासाठी सामायिक सहकार्यासंदर्भातील हा करार आहे.

करारावर राजशिष्टाचार विभागाच्या परकीय थेट गुंतवणूक व प्रवासी भारतीय संपर्क विभागाचे सचिव डॉ. राजेश गवांदे, अवर सचिव अविनाश सोलवट, एसआयडीएमचे अध्यक्ष अरुण टी. रामचंदानी आणि सीआयआयची पश्चिम विभागीय संचालक डॉ. अल्पा अंताणी यांनी स्वाक्षऱ्या केल्या. सीआयआयचे संचालक पुष्कर हाते यावेळी



उपस्थित होते. या कराराद्वारे आंतरराष्ट्रीय संरक्षण व विमान क्षेत्रातील प्रतिनिधि मंडळे, गुंतवणूकदार व राजनयिक संपर्क, धोरण संवाद, विषयवार परिसंवाद, आंतरराष्ट्रीय रोडशो आणि ज्ञानविनिमय कार्यक्रमांच्या माध्यमातून महाराष्ट्रातील धोरणात्मक उत्पादन क्षेत्राला अधिक बळकटी देण्याचा उद्देश आहे.

राजशिष्टाचार विभागाची परकीय गुंतवणुक व प्रवासी भारतीय संपर्क शाखा महाराष्ट्र शासनाच्या विविध विभागांशी समन्वय साधून आंतरराष्ट्रीय संपर्क व गुंतवणूकदारांशी संवाद यांना प्रोत्साहन देईल, तर ‘एसआयडीएम’आणि ‘सीआयआय’ आपल्या औद्योगिक जाळ्याद्वारे उद्योग सहभाग, विषयविशेष मार्गदर्शन आणि संस्थात्मक तसेच व्यवसायिक दुवे मजबूत करतील.

---

# ‘विद्यार्थी गुण-गौरव सोहळा २०२६’ उत्साहात संपन्न

## गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान, नैतिक मूल्यांवर ॲड. धनराज वंजारी यांचे मार्गदर्शन

■ मुंबई (दै. संध्या)

पुणे जिल्हा रहिवाशी सेवा संघ, मुंबई यांच्या वतीने आयोजित ‘विद्यार्थी गुण-गौरव सोहळा २०२६’ उत्साहात छत्रपती शिवाजी महाराज नाट्य मंदिर, दादर येथे संपन्न झाला. या सोहळ्यात इयत्ता १० वी व १२ वीच्या गुणवंत विद्यार्थ्यांसह विविध क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांना मोफत वह्यांचेही वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक ज्येष्ठ साहित्यिक, व्याख्याते,माजी सहायक पोलिस आयुक्त एडव्होकेट धनराज वंजारी यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना सांगितले की, "केवळ गुण मिळविणे म्हणजे यश नव्हे. समाजात आदर्श नागरिक म्हणून उभे राहण्यासाठी नैतिक मूल्ये, सत्यशोधक दृष्टी आणि वैज्ञानिक विचारसरणी अंगीकारणे गरजेचे आहे. कोणत्याही व्यक्तीच्या सांगण्यावर विश्वास ठेवण्यापेक्षा प्रत्येक गोष्टीची पडताळणी करून सत्य स्वीकारण्याची वृत्ती विद्यार्थ्यांनी विकसित केली पाहिजे." ते पुढे म्हणाले, "आजच्या काळात कृत्रिम बुद्धिमत्ता (AI), जनुकशास्त्र आणि नवीन




तंत्रज्ञान झपाट्याने विकसित होत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी अंधश्रद्धा, अफवा आणि दिशाभूल करणाऱ्या माहितीपासून दूर राहून विवेकाने निर्णय घेण्याची सवय लावावी. आपल्या अस्तित्वाला ओळखून न्याय मिळविण्यासाठी ज्ञान आणि वैज्ञानिक दृष्टिकोन हीच खरी ताकद आहे."

यावेळी इयत्ता १२ वी (एच.एस.सी.) मध्ये उत्कृष्ट यश मिळविलेल्या भक्ती संजय चौधरी (९३.८३%), अस्मिता विलास परहाड (८७.२९%) आणि कादंबरी महेश गाडगे (८५.८३%) यांचा सत्कार करण्यात आला. तसेच इयत्ता १० वी (एस. एस.सी.) मध्ये उल्लेखनीय यश मिळविणाऱ्या श्रवण गणेश जेजुरकर (९७.६०%), दर्शन तुकाराम शिंदे (९५.२०%) आणि साक्षी संदीप लोंढे (९४.४०%) यांचाही गौरव करण्यात आला.

याशिवाय एमबीबीएस शिक्षण पूर्ण करून वैद्यकीय क्षेत्रात यश मिळविलेल्या डॉ. अक्षदा महेंद्र गडगे यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमास संघाचे अध्यक्ष बाबासाहेब ठाकूर, उपाध्यक्ष रोहिदास टाव्हरे, सचिव दत्तात्रय वाळुंज, खजिनदार महेंद्र गडगे यांच्यासह पदाधिकारी, पालक, विद्यार्थी आणि मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी गुणवत्तेबरोबरच चारित्र्य, नैतिकता आणि सामाजिक बांधिलकी जपत देशाच्या प्रगतीत योगदान द्यावे, असा संदेश या सोहळ्यातून देण्यात आला.

---

# कल्याण अहिल्यानगर बीड परळी रेल्वेमार्गासाठी संघर्ष उभारणार

■ मुंबई (दै. संध्या)

ऐतिहासिक वारसा लाभलेले विद्येचे माहेरघर पुणे व धार्मिक ऐतिहासिक परंपरांनी पावन क्षेत्र नाशिक या दोन्ही शहरांना जोडणारा पुणे-नाशिक रेल्वेमार्ग अर्थात पुणे, हडपसर, चाकण, अहिल्यानगर, राहुरी, शिर्डी आणि नाशिक असा प्रस्तावित आहे. वेळ आणि गती: गाड्या ताशी १६० ते २०० किमी वेगाने धावतील, ज्यामुळे २३५ किमीचे अंतर सुमारे २ तासांत पार करणे शक्य होईल हा रेल्वेमार्ग मंजूर केल्याबद्दल केंद्र सरकार,मा. रेल्वेमंत्री व मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांचे हार्दिक अभिनंदन करण्यात येत आहे.

आता प्रास्तावित मुंबई लातूर एक्स्प्रेसवे जनकल्याण महामार्गाच्या समांतर कल्याण-मुरबाड-माळशेज(दाऱ्याघाट)शिवनेरी-वासुंदे मार्गे अहिल्यानगर रेल्वेमार्गाला मंजूरी देऊन ट्रँगल पूर्ण करावा.अहिल्यानगर-बीड-परळी रेल्वेमार्ग गतीमान व्हावा.ज्यामुळे हा रेल्वेमार्ग बीड-परळीसह मराठवाड्याच्या विकासाचा राजमार्ग ठरेल.हा रेल्वेमार्ग झाला तर देशाची पश्चिम-पूर्व किणारपट्टी




मुंबई-विशाखापट्टनम जोडणारा देशातला सर्वात मोठा रेल्वे प्रकल्प साकारला जाईल. तसेच कोंकण,प.महाराष्ट्र, मराठवाड्याला नजिकच्या मार्गाने मुंबईशी जोडणारा हा रेल्वेमार्ग साकारेल. या रेल्वेमार्गामुळे देशाच्या वैभवात भर पडेल. बीड, परळी, अहिल्यानगर, जुन्नर, मुरबाडच्या शेतकऱ्याला उत्पन्नाचे जोडमार्ग प्राप्त होतील.अकोले-संगमनेरच्या दक्षिण डोंगराळ भागाचा कायापालट होईल. माळशेज-शिवनेरी-ओ लेण्याद्री,भिमाशंकर या परिसरात पर्यटन उद्योग वाढेल व त्यातून मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होईल.शेतकऱ्याला जोडव्यावसायाच्या संधी प्राप्त होतील.पर्यटन उद्योगाला वाव मिळेल,साखर,भाजीपाला, फळे आदी कृषी उत्पादने मुंबई मार्गे देश विदेशात निर्यात करता येतील. त्यातून शेतकऱ्याच्या उत्पन्नात भर पडेल. विदेशी लक्ष्मी समृद्धीच्या मार्गांनी बळीराजाचे दार ठोठावेल. मुंबई-ठाणेची श्रीमंती, पुण्याची विद्वत्ता व अहिल्यानगरचा सहकार या त्रिवेणी संगमातून महाराष्ट्राचे भाग्य रेखाटले जाईल.असा दावा माळशेज रेल्वे कृती समितीचे अध्यक्ष दिनेशचंद्र हुलवळे यांनी पत्रकार परिषदेत केला.स्वातंत्रसेनानी स्व.गोविंदभाई श्रॉफ,स्व.खासदार केशरकाकू क्षीरसागर,पत्रकार सुधाकर डोईफोडे, स्व.आमदार श्रीकृष्णराव तांबे, स्व.निवृत्तीशेठ शेरकर,स्व.प्रकाश परांजपे,स्व. शांतारामबापू घोलप,स्व.प्रो.रामभाऊ कापसे,स्व. गोपीनाथ मुंढे,स्व.बाळासाहेब विखेपाटील,स्व. दिलीप गांधी,स्व. स्वॉलि.गुलाबराव शेळके अशा अनेक दिग्गज नेत्यांनी मागणी केलेल्या या रेल्वेप्रकल्पाच्या मंजूरीसाठी

सन १९९६ पासून माळशेज रेल्वे कृति समितीच्या माध्यमातून पाठपुरावा करित आहोत. हा रेल्वेमार्ग व्हावा म्हणून निर्धार मेळावे, रेल्वे परिषदा,जनजागरण यात्रा, रेल्वेरथयात्रा, ५ लाख सहयांची मोहिम,दिल्ली यात्रा असे सर्व सोपस्कार माळशेज रेल्वे कृति समितीने पार पाडले.त्यातून सन २००६ साली सर्वेक्षण झाले. तर सन २०१९ पासून मुरबाड पर्यंत पहिला टप्प्या मंजूर झाला. (हा पहिला टप्पा मढ-शिवनेरी पर्यत होणं हे व्यावहारिकदृष्ट्याही सोयीचे आहे.त्यातून मुरबाड, शिवनेरीपर्यंत ५ वी मुंबई विकसीत होईल.)

या रेल्वेमार्गासाठी माजी मुख्यमंत्री व खासदार शरद पवार व अण्णा हजारे यांचे आशिर्वाद लाभले. खा.सुप्रियाताई सुळे,शिवाजीराव आढळराव पाटील,खा.भाऊसाहेब वाकचौरे,बाळासाहेब थोरात,शिवाजीराव नलावडे यांच्यासह अनेक मान्यवरांनी माळशेज रेल्वे कृति समितीला कायम सक्रिय साथ दिली.

महाराष्ट्राच्या सर्वांगिन हितासाठी कल्याण-अहिल्यानगर अर्थात Third Ghat Relwe Project मंजूरीसाठी भविष्यात बीड,परळी पासून सर्वपक्षीय कार्यकर्त्यांना बरोबर घेऊन तरुणांचे संघटीत करून संघर्ष उभारणार असा निर्धार माळशेज रेल्वे कृति समितीचे अध्यक्ष दिनेशचंद्र हुलवळे, उपाध्यक्ष मुरलीधर गुंजाळ,दादा भालेकर, मिलिंदराव गंधे यांनी व्यक्त केला आहे.या पत्रकार परिषदेला जि.प.सदस्या कल्पना वैभवराव काळे आवर्जून उपस्थित होत्या.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### 2004-05 बॅचचा स्नेहमेळावा व सेवानिवृत्ती सत्कार समारंभ उत्साहात

माळेगाव (दैनिक संध्या) : शारदाबाई पवार विद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांचा वीस वर्षांनंतरचा स्नेहमेळावा तसेच इंग्रजी विषयाचे माजी शिक्षक एच.एन.जगताप सर यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त सत्कार सोहळा उत्साहात पार पडला.कार्यक्रमास जगताप सर व त्यांच्या सौभाग्यवती प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.पाचवी ते दहावीपर्यंत लाभलेल्या त्यांच्या मोलाच्या मार्गदर्शनाबद्दल विद्यार्थ्यांनी कृतज्ञता व्यक्त करत त्यांचा शाल,श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन सन्मान केला. अनेक वर्षांनी एकत्र आलेल्या मित्र-मैत्रिणींनी शालेय आठवणींना उजाळा देत स्नेहबंध अधिक दृढ करण्याचा संकल्प केला. कार्यक्रमासाठी ओम साई लॉन्सचे अजित तावरे यांनी माफक दरात सभागृह उपलब्ध करून दिल्याबद्दल सर्व माजी विद्यार्थ्यांनी त्यांचे मनःपूर्वक आभार मानले.शेवटी स्नेहभोजन व समूह छायाचित्राने कार्यक्रमाची सांगता झाली.



### राष्ट्रीय मानव अधिकार संघाच्या वतीने शालेय साहित्य वाटप

जेजुरी (दैनिक संध्या) : राष्ट्रीय मानव अधिकार सुरक्षा संघ दिल्ली व महाराष्ट्र प्रदेशच्या वतीने बारामती तालुक्यातील सायबाची वाडी येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. यावेळी राष्ट्रीय मानव अधिकार सुरक्षा संघाचे प्रदेश अध्यक्ष संदीप लोंढे,पुरंदर तालुका अध्यक्ष मनोज कुदळे,उपाध्यक्ष समय निकुडे,सचिव मंगेश गायकवाड व पदाधिकारी उपस्थित होते. ग्रामीण भागातील विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये यासाठी हा उपक्रम राबविण्यात येत असल्याचे मनोज कुदळे यांनी सांगितले.



### मित्राची हत्या करुन गायब झालेल्या तरुणास अटक; निघोजे येथील घटना

चाकण (दैनिक संध्या) : मोबाईल चोरीवरून खेड तालुक्यातील निघोजे येथील गणेश गृहनिर्माण सोसायटी परिसरात झालेल्या टोकाच्या वादातून मित्राच्या हत्येप्रकरणी गायब झालेल्या परप्रांतीय तरुणास दक्षिण महाळुंगे इंगळे एमआयडीसी पोलिसांनी रविवारी अटक केली. दक्षिण महाळुंगे इंगळे एमआयडीसी पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, खेड तालुक्यातील निघोजे येथील गणेश गृहनिर्माण सोसायटी भागात बंद बंगल्याच्या व्हरांड्यात गुरुवारी (दि.२ जुलै) रात्री अकरा वाजण्याच्या दरम्यान एका व्यक्तीचा मृतदेह आढळून आला होता. दक्षिण महाळुंगे इंगळे एमआयडीसी पोलिसांना याबाबतची माहिती मिळताच वरिष्ठ पोलिस निरीक्षक सोमनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली तपास पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. मृताची ओळख चाँद याकूब शेख (वय ४२, रा. चिंचवड) अशी पटली. दरम्यान, मृताची पत्नी गीता यांनी दिलेल्या फिर्यादीवरून दक्षिण महाळुंगे इंगळे एमआयडीसी पोलिस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला. तपासात मृत चाँद शेख हा हिरालाल सुभाषचंद्र गौतम याच्यासोबत राहत असल्याचे समोर आले. घटनेनंतर हिरालाल गौतम फरार झाल्याने पोलिसांचा संशय अधिक बळावला. तांत्रिक विश्लेषण, गोपनीय माहिती आणि स्थानिक माहिती दारांच्या मदतीने पोलीस पथकाने आरोपीचा शोध घेतला. अखेर ४ जुलैला आरोपी हिरालाल सुभाषचंद्र गौतम (वय ४२, मूळ रा. उत्तर प्रदेश) याला ताब्यात घेण्यात आले. त्याच्याकडे अधिक चौकशी केली असता चौकशीत त्याने मोबाईल चोरीच्या कारणावरून वाद झाल्याचे सांगितले. हिरालाल याने चाँद शेख यास जबर मारहाण करून त्याची हत्या केल्याचा प्रकार उघडकीस आल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले. आरोपी हिरालाल यास अटक करण्यात आली असून, दक्षिण महाळुंगे इंगळे एमआयडीसी पोलीस याप्रकरणी अधिक तपास करत आहेत.

# खेड तालुक्यात पावसाचा कहर, पश्चिम पट्ट्यात मोठे नुकसान

राजगुरुनगर (दै. संध्या)



खेड तालुक्यात कोपुन्हा एकदा मुसळधार पावसाने कहर केला असून जनजीवन विस्कळीत झाले आहे. सततच्या पावसामुळे तालुक्यातील अनेक भागांत मोठ्या प्रमाणावर पर्जन्यवृष्टी झाली असून नागरिकांचे मोठे नुकसान झाले आहे. तालुक्यातील अनेक ओढे, नाले आणि बंधारे दुथडी भरून वाहत असल्याने अनेक ठिकाणी पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. विशेषतः तालुक्याच्या पश्चिम पट्ट्यात पावसाचा सर्वाधिक फटका बसला असून अनेक घरे आणि शेती पाण्याखाली गेली आहेत. त्यामुळे अनेक गावांचा संपर्क तुटल्याने दैनंदिन व्यवहार ठप्प झाले आहेत. तालुक्याच्या पश्चिम पट्ट्यात सततधार पावसामुळे येथील नदी नाले दुथडी भरून वाहू लागले.गुंडाळवाडी येथील पुलावरून पाणी गेल्याने येथील रस्ता वाहतुकीसाठी बंद करण्यात आला.तर पाईट येथील बंधारा पाण्याच्या जोरदार प्रवाहाने वाहून गेला.त्यामुळे परिसरातील शेती पाण्याखाली येऊन शेतकऱ्याचे मोठे नुकसान झाले असून घटनेची माहिती मिळताच प्रशासनाने घटनास्थळी जाऊन परिस्थितीचा आढावा घेतला . तसेच कोहिंडे, वाशिरे, औदर,वाजवणे,येथील रस्ते पावसामुळे पूर्णपणे बंद ठेवण्यात आले.कडूस चास येथील पूल देखील पाण्याखाली आल्याने येथील दळणवळण ठप्प झाले. खेड तालुक्याचा पश्चिम भागातील भोरगिरी,भीमाशंकर हा परिसर निसर्गरम्य वातावरणासाठी प्रसिद्ध असा ठिकाण असून या परिसरात भात पिका बरोबर इतर पिके घेतली जातात.मात्र गेली दोन दिवसापासून पडत असलेल्या सततधार पावसामुळे येथील शेतीचे मोठे नुकसान झाले आहे. राजगुरुनगर शहरातील वाडा रोड रस्त्यावरील हौद ओढ्याला पावसामुळे पूरसदृश परिस्थिती निर्माण झाल्याने या ओढ्यावरील पुलावरून प्रथमच पाणी गेले. शहरातील ओढ्यालगत झालेल्या बेकायदा बांधकामे, अतिक्रमण मुळे ओढ्याचे पात्र कमी झाल्याने ही परिस्थिती निर्माण झाली असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.भविष्यात ही परिस्थिती कायम राहिल्यास आजू बाजूच्या नागरिकांना मोठा धोका निर्माण होऊ शकतो.दोन दिवसांपूर्वी पडलेल्या जोरदार पावसाने पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्गावरील वाकी खुर्द परिसरातील महामार्ग पाण्याखाली गेल्याने वाहतूक विस्कळीत झाली होती. त्यामुळे पुणे आणि राजगुरुनगर कडे येणारे जाणारे प्रवासी ,नोकरदार वर्ग ,तसेच विद्यार्थ्यांचे मोठे हाल झाले होते हीच पुनरावृत्ती आजच्या पावसाने झाल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. या परिसरात झालेली बेकायदा प्लॉटिंग,अतिक्रमणे आदी कारणामुळे पाण्याचा नैसर्गिक प्रवाह रोखल्याने व अपुरी जलनिस्सारण व्यवस्था मुळे ही परिस्थिती उद्भवल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे. सततधार पावसामुळे शहरातील अनेक सोसायट्या,व सखल भागात व पाणी साचल्याने नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागला .प्रशासनाकडून परिस्थितीवर लक्ष ठेवण्यात येत असून नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले आहे. अतिवृष्टी झालेल्या गावांमध्ये तात्काळ पंचनामे होऊन सदर बाधित शेतकरी व नागरिकांना तात्काळ नुकसान भरपाई मिळावी. तसेच रस्ते वाहून जनजीवन विस्कळीत झालेल्या ठिकाणच्या रस्त्यांची दुरुस्ती करावी.

दरड प्रवण क्षेत्रात राहणाऱ्या नागरिकांचे तात्काळ स्थलांतरण करण्यासाठी संबंधितांना योग्य ते आदेश निर्गमित करावेत. अशी मागणी माजी आमदार दिलीप मोहिते पाटील यांनी पत्राद्वारे जिल्हाधिकारी डुडी यांच्या कडे केली आहे.

## स्वरूपा कड-देशमुखची राष्ट्रीय आइस स्केटिंग स्पर्धेत तिहेरी सुवर्णकामगिरी

पुरंदर (दै. संध्या)



डेहराडून येथे झालेल्या २१ व्या राष्ट्रीय आइस स्केटिंग स्पर्धेत पुरंदर तालुक्यातील नायगाव येथील मूळ रहिवासी असणाऱ्या व सध्या पुणे येथे असणाऱ्या स्वरूपा नचिकेत कड-देशमुख हिने तीन सुवर्णपदके पटकावून महाराष्ट्रासह पुण्याच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे. २५ ते ३० जून २०२६ या कालावधीत डेहराडून येथील हिमाद्री स्टेडियमवर पार पडलेल्या या स्पर्धेत स्वरूपाने वैयक्तिक १००० मीटर, १५०० मीटर आणि ३००० मीटर रिले या प्रकारांत सुवर्णपदके जिंकत उल्लेखनीय कामगिरी केली. स्वरूपा ही बी.एम.सी.सी. महाविद्यालयाची विद्यार्थिनी असून तिने आतापर्यंत राष्ट्रीय स्तरावरील 'खेलो इंडिया' स्पर्धांमध्ये १३ सुवर्ण, ७ रौप्य आणि २ कांस्यपदके जिंकली आहेत. तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर ४ सुवर्ण,२ रौप्य आणि ७ कांस्यपदकांची कमाई करत तिने भारताचे नाव उज्ज्वल केले आहे.

तिच्या सातत्यपूर्ण उत्कृष्ट कामगिरीची दखल घेत १७ ते २८ जुलै २०२६ या कालावधीत चीनमधील हार्बिन येथे होणाऱ्या ऑलिंपिक कौन्सिल ऑफ एशिया आणि इंटरनॅशनल स्केटिंग युनियन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शॉर्ट ट्रॅक युथ कॅम्पसाठी तिची निवड करण्यात आली आहे.

## राजकीय पक्षांनी निष्ठापूर्वक सहकार्य करावे - मीनल कळसकर

पुणे (दै. संध्या)



भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशाप्रमाणे जिल्ह्यात मतदार याद्यांचे विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम सुरु असून याद्या परिपूर्णरित्या तयार व्हाव्यात यासाठी प्रशासन पूर्णपणे प्रयत्न करत आहे. याद्या परिपूर्ण होण्याकामी राजकीय पक्षांनी देखील निष्ठापूर्वक योगदान द्यावे, असे आवाहन उप जिल्हा निवडणूक अधिकारी मीनल कळसकर यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित राजकीय पक्षाच्या बैठकीत त्या बोलत होत्या. यावेळी तहसीलदार शीतल मुळे तसेच जिल्ह्यातील नॅशनल पीपल्स पार्टी, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार गट),राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित पवार गट), भारतीय जनता पक्ष, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट), बहुजन समाज पार्टी, महाराष्ट्र नवनिर्माण सेना अशा विविध राजकीय पक्षांचे जिल्हाध्यक्ष,शहर प्रमुख, सचिव तसेच प्रतिनिधी उपस्थित होते.

श्रीमती कळसकर म्हणाल्या, एकूण ९० लाख ८० हजार गणना अर्ज वितरित करावयाचे आहेत. त्यामुळे मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांना प्रत्येकी दोन सहाय्यक देण्यात आले आहेत. गणना अर्ज वाटपाचे काम २९ जुलै पर्यंत पूर्ण करायचे आहे. या कामात मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधींची भूमिका महत्त्वाची आहे. या पुनरीक्षण कार्यक्रमानंतर मतदार केंद्रांचे सुसूत्रीकरण करण्यात येणार आहे. त्यासाठी मतदारांचा पत्ता आणि संपर्क क्रमांक घेण्याचे कामही गणना फॉर्म द्यायला जाणारा केंद्रस्तरीय अधिकारी करत आहे. त्यामुळे एकाच पत्त्यावरील मतदार एकाच मतदान केंद्रात येतील.

त्या म्हणाल्या, सखोल पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत अनुपस्थित, स्थलांतरित मतदार, मयत तसेच दुबार मतदार याप्रमाणे माहिती घेण्यामुळे या मतदारांची नावे आपोआपच प्रारूप मतदार यादीत येणार नाहीत. राजकीय पक्षांनी ५ ऑगस्ट रोजी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध झाल्यानंतर आपल्या मतदारसंघातील नावे बारकाईने तपासून घ्यावी, त्यामुळे पात्र मतदाराचे नाव यादीत समाविष्ट व्हायचे राहणार नाही असे सांगून कोणत्याही परिस्थितीत गणना फॉर्म वितरणाचे काम २९ जुलै पर्यंत पूर्ण करायचे आहे, त्यासाठी मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधींनी सहकार्य करावे, असेही त्या म्हणाल्या. यावेळी राजकीय पक्षांनी उपस्थित केलेल्या शंकांचे श्रीमती कळसकर यांनी निरसन केले.

## महावितरण कर्मचाऱ्यांची भरपावसात कामगिरी : येलवाडी, सांगुर्डी गावांचा वीजपुरवठा पूर्ववत

पुणे (दै. संध्या)



मुसळधार पाऊस आणि पूर परिस्थितीवर मात करत महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी येलवाडी आणि सांगुर्डी गावांचा खंडित झालेला वीजपुरवठा रात्रभर अखंड परिश्रम घेऊन यशस्वीरित्या पूर्ववत केला आहे. वीज कर्मचाऱ्यांच्या या प्रयत्नांचे गावभर कौतुक होत आहे.

चाकण एमआयडीसी उपविभागांतर्गत येणाऱ्या येलवाडी व सांगुर्डी गावांना जोडणारे वीज खांब पूराच्या तीव्र प्रवाहात वाहून गेले होते. त्यामुळे या दोन्ही गावांचा वीजपुरवठा पूर्णपणे खंडित झाला होता. घटनेची माहिती मिळताच महावितरणच्या चाकण एमआयडीसी उपविभागाचे अभियंता प्रकाश शेळके, वासुलीचे शाखा अभियंता प्रमोद जाधव व कर्मचाऱ्यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली आणि दुरुस्तीचे काम हाती घेतले.

सतत चाललेला मुसळधार पाऊस आणि परिसरात मोठ्या प्रमाणात साचलेल्या चिखलामुळे महावितरणची वाहने घटनास्थळापर्यंत पोहोचू शकत नव्हती. अशा अत्यंत बिकट परिस्थितीतही कर्मचाऱ्यांनी हार न मानता नवीन वीज खांब आणि इतर आवश्यक अवजड साहित्य स्वतःच्या खांद्यावरून वाहून नेले.

अंधार, पाऊस आणि चिखलाचे साम्राज्य अशा अत्यंत प्रतिकूल वातावरणात कर्मचाऱ्यांनी रात्रभर थांबून युद्धपातळीवर दुरुस्तीचे काम पूर्ण केले. महावितरणच्या या तत्परतेमुळे आणि कर्मचाऱ्यांच्या अथक परिश्रमांमुळे येलवाडी व सांगुर्डी गावांमधील वीजपुरवठा सुरक्षितपणे पूर्ववत करण्यात यश आले आहे.

पुणे परिमंडलाचे मुख्य अभियंता सुनिल काकडे, अधीक्षक अभियंता सुरेश सवाईराम, कार्यकारी अभियंता केशव काळुमाळी यांनी कठीण परिस्थितीत कर्तव्य बजावणाऱ्या कर्मचाऱ्यांचे अभिनंदन व कौतुक केले आहे. तसेच स्थानिक नागरिकांनी महावितरणच्या या कामगिरीचे आणि कर्मचाऱ्यांच्या कर्तव्यनिष्ठेचे कौतुक केले आहे.

पानशेत शाखेच्या अंतर्गत येणाऱ्या घोडखल येथे मोठ्या प्रमाणावर दरड कोसळल्याची दुसरी मोठी घटना घडली आहे. या नैसर्गिक आपत्तीत घोडखल येथील बोराळकर रोहित्र त्याच्या व त्याच्या वीज वाहिन्या संपूर्ण यंत्रणा मातीच्या ढिगाऱ्याखाली पूर्णपणे गाडली गेली आहे. शिवाय दरड कोसळल्यामुळे या भागातील मुख्य रस्ता देखील वाहतुकीसाठी पूर्णपणे बंद झाला असून, तिथपर्यंत पोहोचण्यात मोठ्या अडचणी येत आहेत.

त्यामुळे कशेडी गावाच्या पुढील घोडखल, गोंडेखल, दापसरे, कुर्तवडी घोल, टेकपोळे, माणगाव, खानू, चांदर आणि गरजाईवाडी या नऊ गावांचा वीज पुरवठा पूर्णपणे खंडित झाला आहे. यामुळे या दुर्गम भागातील सुमारे ३५० ग्राहक अंधारात असून, महावितरणचे पथक रस्ता खुला होताच युद्धपातळीवर दुरुस्तीचे काम सुरू करण्यासाठी सज्ज आहे.

आपत्तीची आणखी एक भीषण घटना ११ केव्ही मुळशी ताम्हिणी फिडर अंतर्गत दुपारी दावडी परिसरात घडली. येथे संपूर्ण दरड कोसळून त्याचा मोठा भाग थेट बॅकवॉटरपर्यंत वाहून गेला. या भूस्खलनात महावितरणच्या पायाभूत यंत्रणेचे प्रचंड नुकसान झाले असून, उच्चदाबाचे १५ आणि लघुदाबाचे १० वीज खांब, एक रोहित्र व त्याचा सांगाडा मातीच्या ढिगाऱ्याखाली पूर्णपणे गाडले गेले आहेत.

या मोठ्या नुकसानामुळे परिसरातील एकूण ६ गावे अंधारात बुडाली असून, यामध्ये ३७५ घरगुती, २५ व्यावसायिक आणि २ औद्योगिक अशा एकूण ४०२ ग्राहकांचा वीजपुरवठा खंडित झाला आहे. वीजपुरवठा पूर्ववत करण्यासाठी महावितरणला सततच्या कोसळणाऱ्या पावसामुळे व भूस्खलनात वाहून आलेल्या राडा-रोड्यामुळे मर्यादा येत असल्याचे मुळशीचे कार्यकारी अभियंता देविदास बैकर यांनी सांगितले.

## गड-किल्ल्यांवर छत्रपती शिवाजी महाराज व मावळ्यांच्या कर्तृत्वाचा उल्लेख असलेले नामफलक लावावेत

### सुनील राजे भोसले यांची मागणी

सुपे (दै. संध्या)

जगाच्या इतिहासात अद्वितीय स्थान असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाची आणि त्यांच्या शूर मावळ्यांच्या बलिदानाची माहिती भावी पिढ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचावी,तसेच त्यांच्या स्मृती कायमस्वरूपी जतन व्हाव्यात यासाठी राज्यातील गड-किल्ले व इतर ऐतिहासिक स्थळांवर छत्रपती शिवाजी महाराज व मावळ्यांच्या कर्तृत्वाचा उल्लेख असलेले नामफलक उभारण्यात यावेत,अशी मागणी खासदार श्रीमंत छत्रपती उदयनराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली आहे.

जोगवडी येथील शिवाजी राजे प्रतिष्ठानचे अध्यक्ष,पुरंदर उत्सव समितीचे अध्यक्ष तसेच खासदार श्रीमंत छत्रपती उदयनराजे भोसले यांचे सुपे परगणा प्रमुख सुनील राजे भोसले यांनी पुणे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष वीरधवल जगदाळे यांना निवेदन देऊन ही मागणी केली आहे.



सुनील राजे भोसले यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की,छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य स्थापनेसाठी केलेले कार्य,त्यांचे दूरदर्शी नेतृत्व,युद्धनीती,प्रशासन व्यवस्था आणि त्यांच्या मावळ्यांचे अतुलनीय शौर्य हे संपूर्ण जगासाठी प्रेरणादायी आहे.महाराजांच्या विचारांचा आणि कार्याचा वारसा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचणे ही काळाची गरज आहे.यासाठी राज्यातील ऐतिहासिक गड-किल्ले, स्मारके आणि पर्यटनस्थळांवर माहितीपर नामफलक उभारल्यास पर्यटक,विद्यार्थी आणि इतिहासप्रेमींना स्वराज्याच्या इतिहासाची सविस्तर माहिती मिळण्यास मदत होईल.

तसेच अनेक पर्यटक गड-किल्ल्यांना भेट देत असतात. मात्र,अनेक ठिकाणी इतिहासाची सविस्तर माहिती उपलब्ध नसल्याने छत्रपती शिवाजी महाराज आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या पराक्रमाबाबतची माहिती नव्या पिढीपर्यंत प्रभावीपणे पोहोचत नाही.त्यामुळे प्रत्येक महत्त्वाच्या ऐतिहासिक स्थळी महाराजांच्या कार्याचा,मावळ्यांच्या शौर्याचा आणि त्या ठिकाणाच्या ऐतिहासिक महत्त्वाचा उल्लेख असलेले आकर्षक व माहितीपूर्ण नामफलक उभारण्यात यावेत,अशी मागणी करण्यात आली आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास हा महाराष्ट्राची अस्मिता आणि देशाचा अभिमान आहे.हा इतिहास अजरामर राहावा,त्यांच्या स्मृती मनामनांत कायम तेवत राहाव्यात आणि स्वराज्याचा प्रेरणादायी वारसा पुढील पिढ्यांना ज्ञात व्हावा,या उदात्त हेतूने ही मागणी करण्यात आल्याचे सुनील राजे भोसले यांनी सांगितले.

या मागणीला इतिहासप्रेमी,शिवभक्त आणि विविध सामाजिक संघटनांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळत असून,संबंधित प्रशासनाने याबाबत लवकरात लवकर कार्यवाही करावी,अशी अपेक्षाही व्यक्त करण्यात येत आहे.

श्री संत सोपानकाका महाराज पालखी सोहळ्यानिमित्त वाहतूक बदलाबाबत

## वडगाव निंबाळकर पोलीसांचे जनतेस आवाहन

पुणे (दै. संध्या)



मा. जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी,पुणे यांनी मोटार वाहन कायदा, १९८८ चे कलम ११५ तसेच शासन गृह विभागाच्या दि. १९/०५/१९९० रोजीच्या अधिसूचनेनुसार प्राप्त अधिकारांचा वापर करून श्री संत सोपानकाका महाराज पालखी सोहळा – सन २०२६ निमित्त बारामती तालुक्यातील निरा–बारामती मार्गावरील वाहतुकीत तात्पुरता बदल करण्याचे आदेश निर्गमित केले आहेत.

श्री संत सोपानकाका महाराज पालखी सोहळ्याचे बारामती तालुक्यात दि. १४/०७/२०२६ ते दि. १६/०७/२०२६ या कालावधीत आगमन व मुक्काम असल्याने पालखी मार्गावर भाविकांची मोठी गर्दी होण्याची शक्यता आहे.त्यामुळे वाहतूक कोंडी टाळणे,अपघातांना प्रतिबंध करणे तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणे या उद्देशाने पुढीलप्रमाणे वाहतुकीत बदल करण्यात आला आहे.

वाहतूक बदल पुढीलप्रमाणे राहील : १) दि. १४/०७/२०२६ व दि. १५/०७/२०२६

निरा कॉर्नर – निंबूत येथून जाणारी वाहतूक मोरगाव रोड – चौधरवाडी फाटा – चौधरवाडी – करंजेपूल या पर्यायी मार्गाने वळविण्यात येईल.

२) दि. १६/०७/२०२६

निरा–बारामती रोडवरील वाहतूक कटिणपूल – बजरंगवाडी – कोन्हाळे खुर्द – होळ – वाणेवाडी – करंजेपूल – निरा या पर्यायी मार्गाने वळविण्यात येईल.

जनतेस आवाहन : वाहनचालकांनी व नागरिकांनी संबंधित वाहतूक बदलाची नोंद घेऊन पर्यायी मार्गांचा वापर करावा. वाहतूक पोलीस व बंदोबस्तावरील अधिकारी/ अंमलदार यांच्या सूचनांचे पालन करून प्रशासनास सहकार्य करावे.पालखी सोहळा शांततापूर्ण, सुरक्षित व सुरळीत पार पडण्यासाठी सर्व नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन वडगाव निंबाळकर पोलीस स्टेशनतर्फे करण्यात येत आहे.